शब्द रुची


परंपरा आणि
आधुनिकतेमधील
विवेकाचे भान?


साहित्यसंमेलन विशेषांक

एप्रिल २०१५ मूल्य १० रु. पृष्ठसंख्या ५२


# GRATITUDE





KRUTADNYATA

## 'ग्रंथाली' आणि 'तुलसी आर्ट्स ग्रुप' यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे वाचकदिन क्षणचित्रे १५ मार्च २०१५



सुहास बहुळकर यांच्या शिल्पाचे प्रात्यक्षिक दाखवताना प्रा. प्रमोद कांबळी




दि.बा. मोकाशी जन्मशताब्दी परिसंवादात सहभागी – अजित आचार्य, प्रा. रूपाली शिंदे, डॉ. ज्योती कानिटकर आणि डॉ. गजानन अपिने




सुहास बहुळकर लिखित 'बॉम्बे स्कूल : आठवणीतले, अनुभवलेले' पुस्तक प्रकाशनसमयी निवेदन करताना प्रभाकर भिडे



दिवाण यांचे पोर्ट्रेट चितारताना सुहास बहुळकर




प्रा. प्रमोद कांबळी पोर्ट्रेट रेखाटताना




दि.बा. मोकाशी जन्मशताब्दी परिसंवादात सहभागी – अजित आचार्य, डॉ गजानन अपिने प्रा. रूपाली शिंदे, डॉ. रेखा इनामदार–साने



वाचकदिनी उपस्थित रसिक

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची

एप्रिल २०१५, वर्ष तिसरे
अंक पहिला, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
मुखपृष्ठ : **रंजन जोशी**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**
पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

४१ ॥ग्रंथाली॥

# संपादकीय...

पंजाबात साहित्य संमेलन होत आहे. त्याला शुभेच्छा. संमेलन कोणासाठी, हा प्रश्न गेल्या काही वर्षांत जाणवू लागलाय. वेगळेच वाद झडताहेत. त्याबाबत भूमिका मांडताना साहित्यिकांची पंचाईत होते आहे. ज्या ग्रंथकारांसाठी आणि त्यांच्या वाचकांसाठी अशी संमेलने व्हावीत, त्यांना गृहीत धरून अन्यच वाद चिघळवत राहतात हा ताजा इतिहास आहे. मराठी साहित्याचा दर्जा, मराठी वाचक कमी होतोय; मुळात मराठी टिकेल का, अशा शंकांना केवळ संमेलन उत्तरदायी आहे, व्यासपीठ म्हणून, असे चित्र निर्माण होताना लेखक, प्रकाशक, वर्तमानपत्रे आणि दूरदर्शन वाहिन्या त्यासाठी काय करतात हे पाहणे उद्‌बोधक ठरेल. मराठीबाबतची आस्था म्हणजे मराठी माणसाला देवनागरी इंग्रजी शब्दांचा खुराक असेही चित्र दिसू लागले आहे. 'म'मराठी 'टा'ळा असा मंत्र घेऊन एक 'स्मार्ट मित्र' वावरतो आहे. आजच्या तरुणाईची भाषा म्हणून त्यांना ती किती 'ज्ञान'भाषा वाटते आणि ज्या भाषेतून व्यवहार केल्यास धनप्राप्ती होऊ शकेल अशी 'धन'भाषा वाटते, हे त्या स्मार्ट मित्रालाच माहीत!

मराठी भाषेबाबत चिंताग्रस्त झालेला दिसतो तो ब्रह्मवृंद. भाषाशुद्धतेचा बाऊ करताना बहुजनांच्या लिखाणाबाबत प्रबोधनाऐवजी हेटाळणी अधिक दिसते. 'शुभेच्छा'मधला 'शु' दीर्घ (शू) लिहिलेले बॅनर पाहिले की मस्तकशूळ उठणाऱ्यांनी समस्त ब्रह्मवृंदाची हस्तलिखिते पुढे ठेवावीत, म्हणजे 'शुद्ध' येईल. भाषेला प्रमाणीकरण असावे हे म्हणणे योग्य असले तरी त्यात बहुजन बोलतात–लिहितात ते शब्द स्वीकारण्याचे उमदेपण दाखवण्याची मानसिकता हवी. इंग्रजीत अन्य भाषांतील शब्द कसे समाविष्ट केले आहेत याबद्दल कौतुकाने बोलणाऱ्यांनी याचेही भान ठेवायला हवे.

परंपरेला किंवा आधुनिकतेला चिकटून राहणे, त्याचे समर्थन अभिनिवेशाने करणे यात विवेकाची आहुती पडते. तो जोपासला तर सौहार्दातून समंजस स्वीकाराकडे जाता येऊ शकते. मात्र परंपरा आणि आधुनिकता यातील द्वंद्व 'सनातन' राहताना दिसते. तरी आपण 'पुरोगामी' असल्याचा टेंभा मिरवतो. मंत्रभाषा आणि तंत्रभाषा यात आता ज्ञानभाषा आणि धनभाषा शोधली जात आहे. हा घोळ जे घालतात त्यांना मराठीच्या अस्तित्वाची भीती वाटत असावी.

गुजराती-मारवाडी-कच्छी व्यापारात गुंतले. ते विदेशात पोचले नाहीत का, की फक्त मराठीच परदेशात जातात? तंत्रज्ञानाची भाषा फक्त मराठीच जाणतात का? धनाचे वावडे असणाऱ्या मराठी समाजात आता अर्थजागृती होत आहे हे उत्तमच आहे, मात्र त्याच वेळी व्यापारात मुरलेले मूळ समाज कुठेही गेले तरी आपली भाषा, निदान स्वभाषकाशी, बोलताना संकोचत नाहीत हे स्मार्ट मराठीजनांना का कळू नये? मोदी महाराष्ट्रात आले आणि एक वाक्य मराठीत बोलले किंवा ओबामा हिंदीत बोलले (तशा सोनियाही बोलतात) आपला ऊर भरून येतो, मग आपण आपल्याच भाषेबद्दल ऊर बडवावा, हे अनाकलनीय आहे. अन्य भाषकांनी बोललेल्या एखाद्या वाक्याचे आपल्याला इतके अप्रूप वाटते की ते वाक्य पुन्हा पुन्हा दाखवले जाते. ओबामा 'केम छो' म्हणाले यात विशेष नाही; त्यांनी तसे म्हणावे असे वाटणाऱ्यांना त्यात न्यूनगंड वाटत नाही, यात विशेष आहे. 'लिधो-दिधो' या दोन शब्दांवर शेअर बाजार चालतो तेव्हा त्या शब्दांची अडचण नसते. ती धनज्ञान भाषा असते. सगळेच व्यवहार काही तंत्रज्ञानावर वा त्याच्या भाषेवर होत नाहीत, इथे प्रश्न असतो तो त्या भाषेतून व्यवहार करत आलेल्या नवश्रीमंत वर्गाचे अंधानुकरण किती करावे हा.

ब्रिटिश भारतात आले तेव्हा व्यापाराची व व्यवस्थापनाची गरज म्हणून स्थानिक भारतीय भाषा शिकले, इथल्या चर्चचा व्यवहारही त्या त्या स्थानिक भाषेतून करून मिशनऱ्यांनी प्रसार केला, जो प्रघात आजच्या स्मार्ट युगातही चालूच आहे. आजही स्थानिक भाषेतच चर्चमधल्या प्रार्थना-प्रवचने चालतात. मुंबईसारख्या ठिकाणीही सिद्धिविनायकाची आरती इंग्रजीत रचल्याचे ऐकिवात नाही. जो तो आपल्या मातृभाषेतच प्रार्थना करतो. यात स्मार्ट पिढीही असतेच की, मग या पिढीला देवाला इंग्रजीत केलेली विनवणी कळणार नाही असे वाटते का?

घुमान येथे साहित्य संमेलन घेण्याचे जाहीर झाले आणि ज्या चर्चा, वाद-विवाद घडल्या त्या सर्वश्रुत आहेत. जिथे ग्रंथोत्सव तिथे 'ग्रंथाली' ही आमची भूमिकाच नाही; तर 'ग्रंथाली'नेच जिथे साहित्य पोचत नव्हते तिथे पोचवण्यासाठी आद्य चळवळ उभारली. त्यामुळे 'ग्रंथाली' घुमानमध्येही सहभागी होणार यात वेगळे वाटण्याचे कारण नाही.

मागील संमेलनात, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना आदरांजली वाहताना, विचारस्वातंत्र्याची गळचेपी ज्या अभद्र प्रकारे चालली आहे त्याबद्दल चीड व्यक्त होऊनही या संमेलनाआधी कॉ. गोविंद पानसरे यांची हत्या होऊन तीच चीड व अस्वस्थता व्यक्त करण्याची पाळी यावी याहून दुर्दैवी काही नाही. परंपरा आणि आधुनिकता यावर विवेकी विचार मांडणारे डॉ. दाभोलकर आणि कॉ. पानसरे संपवले जातात हे लांच्छनास्पद आहे. त्याच परंपरेचा, इतिहासाचा आणि समाजमनाचा वर्तमानाशी सम्यक् विचार मांडणारे सदानंद मोरे या संमेलनाचे अध्यक्ष झाल्याने, त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा देताना मनात संमिश्र भावना दाटतात. कुठे नेऊन ठेवलाय हा महाराष्ट्र हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात वादळ निर्माण करतोय. डॉ. दाभोलकर आणि कॉ. पानसरे यांचे खुनी सापडत नाहीत, त्यांचा अंदाजही बांधता येत नाही हे क्लेशकारक आहे. ही केवळ सरकारी अनास्था म्हणून चालणार नाही. रूढींचा पगडा ठेवून, आधुनिक शस्त्रांनी सारासार विचारबुद्धी मारली जात असेल तर ते अधिक चिंतेचे आहे. याविरुद्ध सर्वांनी जमेल तसे व्यक्त झाले पाहिजे.

मोदी सरकारला पुढील महिन्यात एक वर्ष होईल. त्याचा लेखाजोखा पुढील अंकात. त्याचे संपादन प्रवीण बर्दापूरकर करत आहेत. ●

# चलो घुमने, चलो घुमान!

## संजय भास्कर जोशी

नेमेचि येतो साहित्यसंमेलन– सोहळा, साहित्यक्षेत्राची ही मौज जाण बाळा... असे कुणी म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही. इथे ‘मौज’ या शब्दात अनेक प्रकारची मौज सामावली आहे. त्यात ‘वादविवाद, चर्चा इथपासून उखाळ्यापाखाळ्या, चिखलफेक’ इथपर्यंत सारे सामावलेले आहे. उत्सव, सोहळा, समारंभ इथपासून जेवणावळी, न संपणारी कवीसंमेलने आणि रटाळ परिसंवाद सामावले आहेत. वर्तमानपत्रांनी धगधगत ठेवलेले प्रादेशिक, धार्मिक, जातीय वाद आहेत आणि करोडोंनी होणारी पुस्तकांची विक्रीही आहे. एकूणात हौशे, गवशे आणि नवशे यांना ही एक वार्षिक पर्वणी असते. गेली काही वर्षे अनेक ठिकाणी मी या विषयावर माझे विचार मांडत आलो आहे, तेच मुद्दे नव्या चिंतनासह आणि संदर्भांसह पुन्हा एकदा ठामपणे मांडणार आहे. (याच विषयावर काही वर्षांपूर्वी ‘बेळगाव तरुण भारत’मध्येही मी दीर्घ लेख लिहिलाच होता. त्यातलेही काही मुद्दे इथे येतीलच.) मुळात या विषयावर खरे तर इतक्या वेळा, इतक्या लोकांनी; इतक्या बाजूंनी सकारात्मक आणि नकारात्मक लिहिलेले आणि बोललेले आहे, की पुन्हा त्यावर नव्याने काय लिहावे असा प्रश्नच आहे. त्यात पुन्हा अनेक ज्येष्ठ लोक सातत्याने साहित्यसंमेलनाची यथेच्छ टिंगल करत असतात. यात अर्थात नुकतेच ज्ञानपीठ हा साहित्यक्षेत्रातील सर्वोच्च सन्मान प्राप्त झालेले भालचंद्र नेमाडे आघाडीवर असतात. खरे सांगायचे तर ते सार्थ, साधार आणि पटणारी टीकाही करत असतात. त्यांची अनेक मते मलाही पटणारीच असतात. सध्या ज्या प्रकारचे साहित्यसंमेलन साजरे होते त्यात अनेक दोष आहेत यात संशयच नाही. वाजतगाजत होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचा विचार केला तर आदर्श साहित्यसंमेलनापासून आपण दूरच आहोत हे खरेच आहे. त्यामुळे आता माझ्यासमोर साहित्यसंमेलनावर खरमरीत शब्दांत आणि सडकून टीका करणारा लेख लिहिणे हा एक सेफ आणि सोयीस्कर मार्ग आहे खरा. अशा भडक आणि प्रक्षुब्ध लेखाला हमखास टाळ्या मिळतात. लक्षही वेधले जाते. लेख भडक करणे हा साधा आणि सोपा मार्ग आहे, पण एकूणातच साधे, सोपे आणि सुरळीत मार्ग मला पचनी पडतात असा इतिहास नाही. त्यामुळे तो मार्ग मला वर्ज्यच. बरे त्या मार्गाच्या विरुद्ध म्हणून भाबड्या मनाने साहित्यसंमेलनाचे गोडवे गाणारी आरती लिहावी तर तेही सुजाण मनाला पटण्यासारखे नाही. त्यामुळे झालेय काय, की गेल्या काही वर्षांत आमच्यासारख्या मध्यममार्गी लोकांची साहित्यसंमेलनाबाबत चांगलीच गोची झाली आहे खरी. पाठिंबा द्यावा तरी अडचण आणि टिंगल करावी तरी गोची. त्यात पुन्हा माझी केस विचित्रच आहे. मी स्वत: कधी साहित्यसंमेलनाला जात नाही, पण पुण्यात भरलेल्या ८३व्या साहित्यसंमेलनात मात्र चार महिने मी संमेलनाचा सीईओ म्हणून काम पाहिले आणि ते संमेलन दिवसरात्र सर्वार्थाने भोगले आणि उपभोगले. जमेल तेवढे चांगले करायचा मनापासूओन प्रयत्नही केला. त्यामुळे देखील कोणत्याही बाजूने टोकाची आणि एकांगी भूमिका घेणे मला जमण्यासारखे नाही.

> साहित्यसंमेलनाबाबत खर्चिकतेचा आणि प्रायोजकत्वाचा मुद्दा देखील नेहमी चर्चेत असतो. त्या बाबतीत माझा कल ‘साधनशुचिते’पेक्षा ‘प्रयोजनशुचिते’कडे जरासा जास्त आहे. जो पैसा सिगारेट किंवा दारू तयार करायला इन्व्हेस्ट केला जाऊ शकतो तोच एखाद्या सामाजिक कार्याला वापरला जऊ शकतो. रंग पैशाला नसतो तर प्रयोजनाला असतो.

आता हे फक्त साहित्यसंमेलनाबाबत होते असे नाही, खरे तर आयुष्यातल्या बऱ्याच गोष्टींबाबत असेच होते. बऱ्याचशा बाबतीत एका टोकाची भूमिका घेणे पटतही नाही आणि जमतही नाही. जवळच्या नात्यात असे होते बघा. कितीतरी दोष तर दिसतात पण प्रेमही असतेच. नेमके तसेच साहित्यसंमेलनाबाबत माझेही होते आहे. एक संकल्पना म्हणून मला साहित्यसंमेलन

नुसतेच आवडते असे नव्हे तर महत्त्वाचेदेखील वाटते. साहित्यक्षेत्रात अनेक सकारात्मक गोष्टी अशा साहित्यसंमेलनाने घडू शकतात असे मला प्रामाणिकपणे वाटते. गंमत अशी आहे, की आपण अशा संमेलनाकडून नेमक्या काय अपेक्षा ठेवतो त्यावर सारे अवलंबून असते.  चुकीच्या अपेक्षा ठेवल्या तर मात्र सगळाच भंपकपणा वाटायला लागतो.

आता साहित्यसंमेलनाची सुरुवातच ज्याने होते ते अध्यक्षीय भाषणाचेच घ्या. मुदलात मला तो संमेलनातला महत्त्वाचा भाग वाटतच नाही, एक निरुपद्रवी पण निरुपयोगी उपचार तेवढा वाटतो. (हार्मलेस अँड युसलेस) त्यामुळे इतकी गाजणारी ती अध्यक्षपदाची निवडणूक, त्यातले अचाट गोंधळ, त्या निमित्ताने होणारी गटबाजी, चिखलफेक, वर्तमानपत्रांमध्ये चालणारा धिंगाणा वगैरे माझ्या दृष्टीने एकदम बिनमहत्त्वाचे होऊन जाते त्याला मी काय करणार? ज्या पदाला खास काही अधिकारच नाहीत किंवा ठोस उत्तरदायित्व नाही ते मला बिनमहत्त्वाचे वाटते. त्यावरून चाललेले गोंधळ मला निरर्थक वाटतात. हां जर हे साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद सरकारच्या कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याएवढे अधिकार धारण करणारे असते तर गोष्ट निराळी. मला सांगा, काय हरकत आहे, वर्षापुरता हा अध्यक्ष राज्य सरकारचा साहित्यविश्वासाठीचा औपचारिक प्रतिनिधी असायला? त्याला वाड्मयीन कार्यक्रमासाठी दहा-वीस कोटींचे बजेट असावे. एक कार्यालय असावे. स्वीय साहायक असावा. ठोस कार्यक्रम राबवण्याची जबाबदारी हवी. तर मग या पदाला आणि त्या निवडणुकीला काही एक मोल आहे. अर्थ आहे. पण आता आहे त्या स्वरूपात साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात कृतिशील कालबद्ध असा काही ठोस कार्यक्रम असतो का, की ज्याच्या अंमलबजावणीसाठी कुणी जबाबदार धरला जातो? कुणी अकाउंटेबल असतो? तसे नसेल तर त्याला विशेष महत्त्व द्यायचे कारणच मला दिसत नाही. मान-सन्मान वगैरे ठीकच आहे. त्याचे हिरिरीने समर्थन वा विरोध करणाऱ्यांनी जरूर ते असोशीने करत राहावे, फक्त माझ्या दृष्टीने ते बिनमहत्त्वाचे असते इतकेच. कमी उपलब्धता आणि अनेक इच्छुक असल्यावर कोणत्याही क्षेत्रात जे राजकारण होते ते इथे होणारच. त्यामुळे 'अध्यक्षीय भाषण' या घटनेकडून मी अपेक्षाच शून्य केल्याने माझी त्याबद्दल काही ठळक अपेक्षाभंग, दु:ख, संताप वगैरेची भावना होत नाही. असे अनेक निरर्थक उपचार आपण आजूबाजूला बघत असतोच, त्यापैकीच एक हा. नाही म्हणजे काही बरे, वाईट, चांगले किंवा भंपक विचार या व्यासपीठावरून ऐकायला माझी काही हरकत नाही, पण त्याच्याकडून काही ठोस अपेक्षा करण्यात अर्थ नाही. बरे या व्यासपीठावरून काही आश्वासने वगैरे देण्याचा प्रश्न उद्भवत नाही, कारण ती आश्वासने पुरी कशाच्या बळावर करणार? तेव्हा एकूणात हा बिनमहत्त्वाचा प्रकार आहे खरा. तसे बघायला गेले तर आपल्या समाजात इतक्या विविध लोकांना उगाच म्हणून इतके काही मिळत असते, की या निमित्ताने एखाद्याला शे-दीडशे शाली आणि दोनशे नारळ मिळाले तर माझी काही हरकत नाही. पण म्हणून त्या माणसाने मराठी भाषा आणि साहित्यासाठी काही करावे अशी अपेक्षा मी करत नाही.

यातला कळीचा मुद्दा असा आहे, की इतर बाबतीत पद आणि पुरस्कार यात नेमका फरक असतो. पद म्हटले की काही अधिकार, काही जबाबदाऱ्या, काही कामे असतात. मुख्य म्हणजे अकाउंटेबिलिटी असते. आणि पुरस्कार म्हटले, की त्याच्यामागे काही एक कर्तृत्व असते आणि रसिकांची कृतज्ञता असते. हे दोन्ही बऱ्यापैकी 'म्युच्युअली एक्स्लुजिव्ह' असतात. असावे. साहित्यसंमेलनाच्या बाबतीतच हा एक गोंधळ आहे, की पुरस्कार म्हणून हे पद दिले जाते. हा संकल्पनात्मकच गोंधळ आहे. मुळातच ही एक चूक आहे. खरे तर साहित्यसंमेलनाला एक अध्यक्ष असायला हवा आणि एक सन्मानमूर्ती असायला हवी. मुख्य म्हणजे हे दोन्ही निराळे असायला हवे. अध्यक्षाला रीतसर निवडणुक पद्धतीने, गुणवत्तेनुसार आणि कार्यक्षमतेनुसार निवडावे आणि त्याला जबाबदाऱ्या आणि अधिकार द्यावेत आणि त्याच वेळी दुसऱ्या एका सन्मानमूर्तीचा निरपेक्षपणे सन्मान करावा. सध्याच्या पद्धतीत गेली अनेक वर्षे जे अध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत ते खरे म्हणजे सन्मानमूर्ती आहेत. आणि सन्मानमूर्ती होण्यासाठी निवडणूक लढवावी लागणे हे अपमानस्पदच आहे. एखादे पद मिळवण्यासाठी आणि त्या अनुषंगाने काही अधिकार आणि रिसोर्सेस मिळवण्यासाठी निवडणूक असणे योग्य आहे. तेव्हा सर्वप्रथम साहित्यसंमेलनाचे हे तथाकथित अध्यक्षपद, अध्यक्ष आणि सन्मानमूर्ती या दोन भागांत विभाजित करायला हवे. मला खात्री आहे द.भि.कुलकर्णी, अरुण साधू, हातकणंगलेकर वगैरे अध्यक्ष झालेले लोक आणि महानोर, पाडगावकर हे इच्छुक लोक अध्यक्षपद नाही तर सन्मानमूर्ती होऊ इच्छित होते किंवा आहेत. त्यांना काही आता कोणत्या कृतिशील जबाबदारीच्या पदाची आस नाही. संकल्पनेतच गोंधळ असल्याने पुढे सगळा सावळा गोंधळ होईल त्यात नवल नाही. तो तसा होतोच. स्वत: अध्यक्ष होऊन गेल्यावर हे लोक, खरे म्हणजे ही निवडणुकीची पद्धतच नको, वगैरे शेरे मारतात. असो. तेव्हा याचे सोल्युशन संकल्पनात्मक सुस्पष्टतेत आहे. अध्यक्ष आणि सन्मानमूर्ती असे वेगळे करण्यात आहे.

साहित्यसंमेलनाबाबत खर्चिकतेचा आणि प्रायोजकत्वाचा मुद्दा देखील नेहमी चर्चेत असतो. बहुतेकांचा विरोध दिखाऊपणा, जेवणावळी, अतिभव्य मंडप, सेलेब्रिटी वगैरे खर्चिक बाबींना, आणि त्यासाठी राजकीय किंवा औद्योगिक क्षेत्रातून घेतलेल्या प्रायोजकत्वामुळे येणाऱ्या मिंधेपणाला असतो. मुख्यत: साहित्याचा गंध नसलेल्या राजकीय किंवा कॉर्पोरेट व्यक्ती आपल्या लाडक्या आणि आदरणीय साहित्यिकांच्या मांडीला मांडी लावून बसतात याचा बहुतेकांना राग येतो. सगळे संमेलन या राजकीय किंवा सेलेब्रिटीजच्या तालावर हलते, त्यांच्या भोवतीच फिरते असा आरोप केला जातो. या झगमगाटात साहित्य हरपते असे बऱ्याच जणांचे म्हणणे असते. एक सांगतो, कॉर्पोरेट क्षेत्रात दोन दशके काढल्यामुळे झगमगाटाने माझे डोळे दिपत नाहीत. 'कामाचा बोजा

वेळेच्या उपलब्धतेच्या प्रमाणात वाढत जातो' या मर्फीच्या नियमाला समांतर असा एक नियम म्हणजे, 'खर्चाचा आकडा उपलब्ध जमेच्या प्रमाणात वाढत जातो.' अशा संमेलनाला मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होतो म्हणून खर्चाचे आकडे वाढत जातात हे त्यामागचे सत्य आहे. कुणी याचा व्यत्यास मांडला तरी हरकत नाही म्हणा. पण तात्पर्य म्हणजे ही संमेलने खर्चिक होतात आणि त्यासाठी भरपूर निधी उपलब्ध होतोय असे दिसते. त्यामुळे यात मग आपोआपच प्रायोजकत्वाचा मुद्दा येतो. त्या बाबतीत माझा कल 'साधनशुचिते'पेक्षा 'प्रयोजनशुचिते'कडे जरासा जास्त आहे. लक्षात घ्या, सज्जनहो, सफरचंद कापायच्या सुरीने खून केला जाऊ शकतो आणि बॉंबस्फोट घडवणारी दारू सुरुंग लावून बोगदे खणायलाही वापरता येते. जो पैसा सिगारेट किंवा दारू तयार करायला इन्व्हेस्ट केला जाऊ शकतो तोच एखाद्या सामाजिक कार्याला वापरला जऊ शकतो. रंग पैशाला नसतो तर प्रयोजनाला असतो. सात खून केलेल्या रामपुरी चाकूने सफरचंद कापले तरी त्या सफरचंदातून लगेच रक्ताची चिळकांडी उडत नाही हे समजून घ्या. हेतू आणि प्रयोजन स्वच्छ असेल तर प्रायोजकाची दादागिरी सहज हाणून पाडता येते. कॉर्पोरेट क्षेत्रातले प्रायोजक असावेत का, यावर माझे नि:संदिग्ध उत्तर, होय असेच असेल. टोकाचे उदाहरण घ्यायचे तर एखाद्या तंबाखू बनवणाऱ्या कंपनीने देणगी दिली म्हणून लगेच येणाऱ्या साहित्यिकांना आणि रसिकांना प्रवेशद्वारातच एकेक तंबाखूची पुडी द्यायची गरज नसते. बरे अशा तंबाखू किंवा सिगारेट बनवणाऱ्या कंपनीच्या मालकाला सरकार तुरुंगात टाकत नाही याचा अर्थ त्यांना समाजात राहायचा अधिकार आहे, आणि वाचायचा किंवा साहित्यसंमेलनात सामील व्हायचा अधिकार आहेच ना? आपण सार्वजानिक बागेत असा बोर्ड लावतो का, की इथे तंबाखू उत्पादकाने येऊ नये. फिल्मफेअर, क्रिकेटचे सामने वगैरे कार्यक्रमांना असे प्रायोजक चालतात ना? मग साहित्यिकांच्याच कार्यक्रमावर हा सामाजिक सुधारणेचा अजेंडा का? आपल्या या समाजाने कायमच साहित्यिक आणि शिक्षकांना आधी पैशाने लुबाडले आणि वर असे सामाजिक आदर्शाचे ओझे त्यांच्या खांद्यावर टाकून त्यांचे कंबरडे मोडले आहे. करोडो रुपये एरवी देखील कमावणाऱ्या क्रिकेटच्या सामन्यात रन आऊटचा निर्णय मोठ्या स्क्रीनवर दिसण्याआधी 'रॉयल चॅलेंज'ची जाहिरात दिसते, पण साहित्यसंमेलनात माणिकचंद प्रायोजकत्वाच्या बदल्यात सर्व रसिकांना थंडगार मिनरल वॉटरच्या बाटल्या पुरवणार होते, ते मात्र चालत नाही! जोवर असा प्रायोजक त्याच्या तंबाखू किंवा तत्सम उत्पादनाची जाहिरात तिथे करत नाही तोवर त्याचा पैसा अस्पृश्य मानायचे काय कारण? व्यसनमुक्ती, सामाजिक आरोग्य वगैरे सर्व समाजाचे अजेंडे आहेत. त्याची धुरा फक्त शिक्षक आणि साहित्यिक यांच्यावरच लादण्याची आपली पुरातन दांभिक परंपरा आहे. इथे खरे तर प्रयोजनशुचितेचा मुद्दा जास्त महत्त्वाचा आहे. मिळालेल्या निधीच्या विनियोगाबाबत आयोजकांची कडक आणि स्वच्छ नियमावली असेल तर प्रायोजकांच्या ताटाखालचे मांजर व्हायची काहीच गरज नसते. हां, आता आयोजकांचे हेतूच जर संशयास्पद असतील तर मात्र प्रायोजकांना रान मोकळे मिळून संमेलन भरकटले जाऊ शकते. कित्येकदा जातेच. किंबहुना अशा भरकटलेपणाची उदाहरणे जास्त असल्याने आज 'प्रायोजकच नको' आणि म्हणून मग 'खर्चच कमी करा' असा विचार पुढे आला आहे. (एक गमतीचा मुद्दा मांडतो : माणिकचंद, शॉ वॅलेस, आयटीसी वगैरे साहित्यसंमेलनाला निषिद्ध आणि तुमच्या दृष्टीने चोर कंपन्या जो इन्कम टॅक्स भरतात तो मात्र सरकार घेते आणि त्याच पैशांतून रस्ते आणि पूल वगैरे बांधते ते मात्र आपल्याला चालते. आपण फूटपाथवरून चालताना मध्येच एखादी फरशी उडी मारून ओलांडतो का? अरे बापरे! ही फरशी माणिकचंदने भरलेल्या करातून बांधलेली दिसते, नको रे बाबा ही वापरायला, असे म्हणतो का आपण? मला म्हणायचेय ते इतकेच, की तंबाखू आणि दारू बनवणाऱ्या कंपन्या सरळ बंद कराव्या म्हणून आंदोलन करा, आम्ही नक्की त्यात भाग घेऊ. पण त्यासाठी फक्त साहित्यसंमेलनाला वेठीला धरू नका.)

आता तंबाखू वा सिगारेटवाल्या कंपन्या नाही तर एकूण कॉर्पोरेट क्षेत्राचेच प्रायोजकत्व नको असाही एक सूर असतो. त्यात माझा अनुभव सांगतो. आयडिया कंपनीत असताना मी कंपनीतर्फे अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांना लाखो रुपयांची देणगी दिली होती, पण आमचा दृष्टिकोन काही फक्त पैसा फेको असा नव्हता तर त्यातल्या अनेक कार्यक्रमांत मीही भाग घेतला, अगदी कलाकार म्हणून, आणि दर वेळी शुद्ध मराठीत भाषण देऊन मराठी संस्कृतीला उत्तेजन देण्याची आमची सकारात्मक भूमिका मांडली होती. कॉर्पोरेट क्षेत्रातला प्रायोजक हा अरसिक अणि बिनडोक पैसेवालाच असतो हे काही सत्य नव्हे. एकूणातच आपल्या समाजात आर्थिक प्रगतीविषयी जे नकारात्मक चित्रण केले गेले आहे त्याचा हा महाभयंकर साइड इफेक्ट आहे.

दुसरा प्रश्न राजकीय आणि इतर सेलेब्रिटीजच्या उपस्थितीचा. तिथेही आयोजकांच्या मानसिकतेचा आणि प्रयोजनशुचितेचाच मुद्दा येतो. सवाईगंधर्व संगीतमहोत्सवात एकदा कर्नाटकचे मुख्यमंत्री प्रेक्षकांत बसले होते. त्यांचा स्टेजवरून सन्मानाने उल्लेख केला गेला, पण ते प्रेक्षकांतच बसून आस्वाद घेत राहिले. पुण्याचा 'सवाईगंधर्व संगीतमहोत्सव' देखील काही कमी देखणा आणि भव्य प्रकार नाही, पण तिथल्या आयोजकांच्या स्वच्छ आणि स्पष्ट प्रयोजनामुळे तिथे असले वाद होत नाहीत हे लक्षात घ्यायला हवे. आक्षेप खर्चाला किंवा देखणेपणाला घेऊ नये तर चुकीच्या प्रयोजनाला आणि विनियोगाला घ्यावा असे मला वाटते. कारन देखणेपणामुळे आणि भव्यपणामुळे लाखा-लाखांची गर्दी जमून करोडोंची पुस्तकविक्री होणार असेल तर ते स्वागतार्हच आहे.

अशा प्रकारच्या अखिल भारतीय साहित्यसंमेलनात साहित्यिक मुद्यांवर काही गंभीर विचारमंथन व्हावे, किंवा ते होत नाही हा देखील एक चिरंतन आक्षेप आहे. खरे तर तसे काही

होईल किंवा व्हावे यावरच माझा विश्वास नाही. तशी अपेक्षाच मी ठेवत नाही. इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि इतक्या विविध प्रकारचा प्रेक्षकवर्ग उपस्थित असताना अशी अपेक्षा ठेवणेच मला गमतीचे वाटते. गंभीर विचारमंथनाला जे पर्यावरण लागते ते अशा उत्सवात कसे असणार? विद्यापीठातले चर्चासत्र वेगळे आणि साहित्यसंमेलन वेगळे, याची खूणगाठच मी मनाशी बांधल्याने मला याही बाबतीत काही खास टीका करावी असे वाटत नाही. ज्याबद्दल मला राग, संताप किंवा अपेक्षाभंगाचे दु:ख नाही. I am perfectly okay, so long as it does not harm me. साहित्यसंमेलने हा विद्यापीठीय चर्चासत्राला पर्याय आहे असा दावा कुणी केला आहे काय? मी काही रोहित शेट्टी किंवा राजू हिंगोरानी यांच्या चित्रपटांचा फार मोठा फॅन नाही. पण मला इतके कळते, की रोहित शेट्टी हा दिग्दर्शक सिंघम आणि गोलमाल हेच सिनेमे बनवणार. राजू हिंगोरानी मुन्नाभाई आणि पीकेच बनवणार. त्याने धोबी घाट किंवा पथेर पांचाली का बनवला नाही, हा आक्षेपच भंपक आहे. सत्यजित रे, मृणाल सेन, किरण राव, देव बेनेगल, अनुराग कश्यप यांना त्यांचे काम करू द्यावे. पण समाजातला मोठा वर्ग सिंघम आणि पीके बघू इच्छितो त्याला सारखे हेटाळण्यात काय अर्थ आहे? स्पष्ट शब्दात सांगू का? सुहास शिरवळकर, बाबा कदम, व.पु. काळे आणि विश्वास पाटील, शिवाजी सावंत वगैरे लेखकांना तुमच्या विद्यापीठीय चर्चासत्रात स्थान देता का तुम्ही? पण जर बहुसंख्य वाचकांच्या मनात त्यांना स्थान आहे तर त्यांच्या साहित्याचा असा भव्य सोहळा होऊ दे ना इथे. तुमच्या तथाकथित गंभीर समीक्षेची पुस्तके किती सर्वसामान्य रसिक विकत घेऊन वाचतात? उगाच साहित्यसंमेलनातल्या रसिकांना वीस-पंचवीस हजार प्रेक्षकांच्या क्षमतेच्या मंडपात, जिथे द.मा. मिरासदारांचे कथाकथन ऐकायला रसिक जमतात तिथे तुम्ही जर हरिश्चंद्र थोरात आणि मिळतील ते पाटील आणि मिळतील ते कुलकर्णी नावाचे समीक्षक बोलावून त्यांची विद्वज्जड समीक्षकीय भाषणे ऐकवणार आहात का? संमेलनाला येणाऱ्या लाखो रसिकांची संख्या कितीवर उतरेल? त्या श्रेष्ठ समीक्षकांचे विचार ऐकायला आमच्यासारखे रसिक जिवाचा आटापिटा करून विद्यापीठातच काय कुठेही छोट्या संमेलनात येतातच की. पण अशा मोठ्या संमेलनात देखील ती अपेक्षा करणे अनाठायी आहे. लक्षात घ्या, देअर इज रूम फॉर ऑल अँड एव्हरीवन.

आता मी पूर्वी देखील अनेक वेळा सांगितलेले माझे आग्रही मुद्दे पुनर्विचार करून नव्या चिंतनासह पुन्हा एकदा मांडतो. माझ्या मते साहित्य संमेलने चांगली होण्यासाठी फक्त ही चार ठळक प्रयोजने समोर ठेवावीत-

अ. दर वर्षी प्रामुख्याने ज्या गावात संमेलन असेल त्या गावात, आणि संपूर्ण महाराष्ट्रात एकूणच साहित्यविषयक, ग्रंथव्यवहारासंबंधी उत्साहाचे वातावरण निर्माण व्हावे आणि त्या निमित्ताने वाचनसंस्कृतीमध्ये भरीव वाढ व्हावी हे संमेलनाचे मुख्य प्रयोजन असावे. प्रयोजनाबबत सुस्पष्टता हे कोणत्याही प्रकल्पाचे निम्मे यश असते. या निमित्ताने लेखन, वाचन, ग्रंथव्यवहार काही काळ तरी केंद्रस्थानी यावा आणि त्याला जास्तीत जास्त शेअर ऑफ माइंड मिळावा ही मुख्य इच्छा असावी.

आ. हे संमेलन सर्वसमावेषक असावे. म्हणजे अशा उत्सवी संमेलनामध्ये श्रेष्ठ आणि महान लेखकांबरोबरच लोकप्रिय लेखकांचा देखील जाहीर सन्मान व्हावा आणि वाचकवर्गाला त्यांचे दर्शन आणि भेटीची संधी मिळावी हे दुसरे प्रयोजन. पुरस्कार, समीक्षा आणि सन्मान या बाबतीत नेहमीच सापत्नभावाने ज्यांना वागवले जाते त्या (खऱ्या अर्थाने न वाचणाऱ्यांना वाचनाकडे वळवणाऱ्या) लोकप्रिय लेखकांना इथे तरी अत्यंत मन:पूर्वक सन्मानाने वागवले जावे. अशा सन्माननीय लेखकांबरोबरच त्या गावच्या लेखक-कवींना एकामेकाला भेटण्याचीही ही संधी असेल. लक्षात घेतले पाहिजे, की संमेलन फक्त व्यासपीठावर घडत नाही.

इ. अशा देखण्या, उत्साही उत्सवात मोठ्या प्रमाणावर वाचक यावेत आणि मोठ्या प्रमाणावर ग्रंथखरेदी व्हावी हे तिसरे प्रयोजन. खरे तर हे तर सर्वात महत्त्वाचे प्रयोजन. कारण शेवटी वाचकांनी मोठ्या प्रमाणावर पुस्तके विकत घ्यावीत आणि वाचावीत हे तर उद्दिष्ट असते ना?

ई. संमेलनात रीतसर लोकशाही मार्गाने एक अध्यक्ष आणि एक कार्यकारिणी एका वर्षासाठी निवडावी. त्यांना राज्य सरकारकडून अधिकार आणि रिसोर्सेस मिळावेत. सांस्कृतिक खात्याच्या मंत्र्यांच्या समवेत या अध्यक्षाचे वर्षभराचे कार्यक्रम आणि जबाबदाऱ्या ठरवाव्यात आणि अध्यक्षाने त्या वर्षात पूर्ण कराव्यात. अध्यक्षाला त्याबद्दल रीतसर भत्ता आणि गाडी, कार्यालय वगैरे सुविधा मिळाव्यात. दर वर्षी भाषा आणि साहित्याच्या संवर्धनासाठी अध्यक्षाला एक प्रकल्प हाताळायला द्यावा.

(मराठी भाषिक समूहाची भाषा आणि साहित्याचे उन्नयन किंवा साहित्यविषयक दिशा ठरवणे वगैरे महान पण ठोस कार्यक्रमाअभावी निरर्थक ठरणारी प्रयोजने यात सामील नाहीत याची नोंद घ्यावी.)

आता ही तीन प्रयोजने साध्य करायची तर काही ड्रॅस्टिक पावले उचलायला लागतील, जी बहुधा बहुतेकांना अशक्य आणि इम्प्रॅक्टिकेबल वाटतील. पण तरीही सांगतोच-

पहिली गोष्ट, वर म्हटल्याप्रमाणे 'साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष' ही संकल्पनाच बाद करून टाकावी. त्याऐवजी अध्यक्ष आणि सन्मानमूर्ती वेगळे असावेत. सन्मानमूर्ती निवडण्यासाठी एक समिती नेमावी. त्या समितीत हयात असलेले ज्ञानपीठ, साहित्य अकादमी, जनस्थान, नागभूषण यासारख्या महत्त्वाच्या पुरस्काराचे विजेते असावेत. या समितीने निवडलेल्या सन्मानमूर्तीला घसघशीत थैली वगैरे देऊन सत्कार करावा. अध्यक्षीय भाषण बाद झाले तर मग उद्घाटन कसे करावे? त्यावर सोपा उपाय म्हणजे ग्रंथदिंडी गावातून उत्साहाने फिरत संमेलनस्थळी यावी आणि त्या गावातील लेखक-कवींपैकी इच्छुकांनी आणि सन्मानमूर्तीने ग्रंथप्रदर्शनातून ग्रंथखरेदी

करावी हेच साहित्यसंमेलनाचे उद्घाटन. त्यानंतर त्या गावातल्या पाच सर्वोत्तम वाचकांच्या हस्ते संमेलनाचे औपचारिक उद्घाटन करावे. त्या पाच वाचकांनी सन्मानमूर्तीचा सत्कार करावा. त्यासाठी महिनाभर आधीपासून त्या गावात वाचकांच्या वाचनविषयक स्पर्धा घ्याव्यात आणि त्यातले पाच सर्वोत्तम वाचक हेच संमेलनाचे उद्घाटक असावेत. उद्घाटनाच्या वेळी स्टेजवर फक्त सूत्रसंचालक, सन्मानमूर्ती आणि हे पाच वाचक असावेत आणि सन्मानमूर्तीसह या पाच वाचकांनी दीपप्रज्वलन करून मग आपले वाचनाविषयीचे अनुभव सांगावेत.

राजकारणी, अभिनेते, खेळाडू यांना संमेलनात मुक्त प्रवेश असावा, मात्र उद्घाटनाचा कोणताच तथाकथित औपचारिक कार्यक्रम नसल्याने त्यांच्या भाषणाचा वगैरे प्रश्नच उद्भवत नाही. हां, एखादा स्थानिक राजकारणी त्या वाचकस्पर्धेत विजयी झाला तर तो उद्घाटन करू शकेल, पण त्याने फक्त आपल्या वाचनाविषयीच बोलायचे असेल. मुख्य म्हणजे गंभीर वाङ्मयीन, राजकीय, सामाजिक परिसंवादांना पूर्णपणे फाटा देऊन साहित्यविषयक करमणुकीचे कार्यक्रम फक्त असावेत. उदाहरणार्थ, कथाकथन, कवितावाचन, कथांचे अभिवाचन/नाट्यरूपांतर, वाचकांचे अनुभवकथन वगैरे वगैरे. संमेलनात एकच मंडप असाव, जिथे दिवसभर हे कार्यक्रम चालावेत, मात्र संमेलनाचा परिसर अतिशय देखणा करावा. (त्यासाठी अगदी थेट नितीन देसाईसारख्या प्रोफेशनल माणसांची मदत घ्यावी.) जागोजागी वाङ्मयीन प्रदर्शने, साहित्यिक इन्स्टॉलेशन्स, साहित्यिकांची छायाचित्रे, पुतळे, कृत्रिम बागा, कारंजी, झाडे आणि त्यांचे पार असा जंगी मामला हवा. एकच मंडप असल्याने भरपूर जागा उरेल. तिथे जागोजागी शेड्स करून त्यात मध्यभागी एखाद्या लेखकाने बसून इतरांनी भवताली बसून गप्पा मारायची सोय असावी. लक्षात घ्या, संमेलनातील हा भाग सर्वात मोलाचा असेल. त्या गावातील लोकांना मोठमोठे साहित्यिक भेटावेत हे महत्त्वाचे. आणि भेटावेत म्हणजे फक्त स्टेजवर नव्हे तर अनौपचारिकपणे त्यांच्याशी गप्पा मारता याव्यात. त्याचबरोबर त्या गावातील साहित्यिकांना इतर गावांतल्या लेखक, प्रकाशक, वाचकांशी संपर्क साधता यायला हवा. इथे सर्वात कौशल्याची गोष्ट म्हणजे 'प्लॅन्ड अनौपचारिकपणा'. चर्चिल म्हणत असे, की त्याची हजरजबाबी उत्तरे आणि शेरे भरपूर सराव केलेले असत. त्याचप्रमाणे लेखक-वाचक आणि लेखक-प्रकाशक यांच्या 'अनौपचारिक' भेटी रीतसर नियोजित करता यायला हव्या. त्या कृत्रिम तर वाटू नयेत पण निसटून जाऊ नयेत.

संमेलनाचे आर्थिक नियोजन असे करावे- एखाद्या किंवा अनेक कंपन्यांकडून देणगी घ्यावी, पण त्यांच्या समाजनिषिद्ध उत्पादनांची जाहिरात करण्यास ठाम नकार द्यावा. इतकेच नव्हे, तर कार्यक्रमांचे आयोजन, वेळापत्रक वगैरे बाबतीत अशा कंपन्यांचा काहीही सहभाग नसावा. जाहीर कार्यक्रमात आणि बॅनरद्वारे अशा कंपन्यांबद्दल कृतज्ञता जरूर व्यक्त करावी. मुख्य म्हणजे संमेलनात येणाऱ्या प्रत्येकास (शब्दश: प्रत्येकास, लेखक, वाचक, राजकारणी, सेलिब्रिटी या सर्वांना.. म्हणजे फक्त सन्मानमूर्ती, पोलीस आणि फायर ब्रिगेड वगैरे सोडता सगळे) तिकीट काढणे सक्तीचे असावे. हे तिकीट पन्नास-शंभर रुपये इतके अल्प असावे, पण सक्तीचे असावे. मात्र प्रत्येकास अतिशय अल्प दरात उत्कृष्ट दर्जाच्या चहा, नाश्ता आणि जेवणाची सोय असावी. (उदाहरणार्थ, एक रुपयात चहा, पाच रुपयांत नाश्ता आणि दहा रुपयांत जेवण.) इतर बऱ्याच खर्चांना फाटा दिल्याने हे जेवण वगैरे सब्सिडाइज करणे सोपे जाईल. ते अतिशय दर्जेदार असावे. भले काहीजण केवळ या जेवणाकरता संमेलनास आले तरी हरकत नाही.

ग्रंथप्रदर्शनाला एकाच ठिकाणी मोठी जागा न देता संपूर्ण परिसराच्या भवताली गाळे असावेत. (त्यामुळे पहिला स्टॉल, मोक्याच्या जागी स्टॉल वगैरे प्रकार होणार नाहीत.) संमेलनस्थळाच्या चहूबाजूला भिंतींना लागून सरळ रेषेत असे स्टॉल असावेत. त्यांच्या रांगा नसाव्यात. मुख्य मंडपच नव्हे तर पूर्ण संमेलन परिसरच आच्छादित असावा. जमिनीवर सर्वत्र कार्पेट असावे. जागोजागी मोफत थंड पाण्याची व्यवस्था असावी आणि जागोजागी सुगंधी जलतुषारांच्या फवाऱ्याची सोय असावी.

खरे तर अशा अनेक सूचना करता येतील. पण भव्यता, देखणेपणा ठेवूनही हा वाचक आणि लेखकांचा आनंदसोहळा व्हावा हे तत्त्व केंद्रस्थानी ठेवायला हवे इतकाच मथितार्थ. एकूणात, संमेलनाचा खर्च कमी करण्यावर नव्हे तर खर्च योग्य दिशेने व्हावा यावर भर असावा. हे सगळे अशक्य, अव्यावहारिक वगैरे वाटते का? वाटू दे. आज प्रचलित असणाऱ्या कित्येक गोष्टी एके काळी अशाच अशक्य वाटत होत्या हा इतिहास आहे. मात्र त्यासाठी अशा भव्य संमेलनांना केवळ लांबून खडे मारण्यापेक्षा आणि शिव्या घालण्यापेक्षा थोडा अधिक सकारात्मक विचार करून कृतिशील व्हायला हवे. लहान आणि गंभीर संमेलने तर व्हायलाच हवीत, पण त्यासाठी मोठ्या संमेलनांवर राळ उडवायची गरज नाही. पुण्याच्या संमेलनात श्याम मनोहर यांच्या मुलाखतीला दहा-बारा हजार श्रोते दाद देताना मी पाहिले आहेत. आणि त्याचे म्हणून काही एक मोल आहेच. घुमान या संमेलनस्थाळाची निवड वादास्पद आहे, किंवा चुकीची आहे असे प्रतिपादन करणे सहज शक्य आहे. पण त्या प्रकरणात आपल्या पदरचे दहा हजार रुपये खर्च होणार असतील तर सर्वांनी मिळून त्या चुकीला देखील देखणे करण्यात काही गैर नाही. याच ग्रंथविश्वात आपण लाखो रुपये कमावले आहेत हे विसरून कसे चालेल?

घुमने तर घुमने ... चलो घुमान, असे म्हणायलाही काही हरकत नसावी.

**– संजय भास्कर जोशी**

भ्रमणध्वनी ९८२२००३४११

sanjaybhaskarj@gmail.com

# चार ज्ञानपीठकार

## यशवंत पाठक

मराठीस ज्ञानपीठाचा श्रेष्ठ सन्मान चार लेखकांनी मिळवून दिला. त्यांच्या लेखनाची व्यापकता आणि त्यांचे व्यक्तित्व यांचा या लेखात थोडक्यात विचार करावयाचा आहे. नुकताच नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार लाभला. या निमित्ताने एकूण या चार लेखकांच्या लेखनाविषयी आपण थोडेसे संवादुया.



पहिला ज्ञानपीठ पुरस्कार वि.स. खांडेकरांना मिळाला. खांडेकरांनी प्रामुख्याने कादंबरीक्षेत्रात आपली स्वतंत्र मुद्रा उमटवली. ते ज्या काळात लिहीत होते तो स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळ होता. या काळात गांधीवाद साहित्यात आला. या तत्त्वज्ञानावर श्रद्धा असणाऱ्या चारित्र्यसंपन्न, त्यागी व्यक्तिमत्त्वांचा समूह होता. याने खांडेकर भारावले. त्यांना गांधीवाद आणि मानवतावाद आपला वाटला. त्यांनी स्वप्नरंजनाची किनार दिली. त्यात आपली स्वप्ने मिसळून टाकली. खांडेकरांची भाषाशैली सुभाषितप्रधान आणि अलंकारिक होती. याशिवाय ते कादंबरीतून (आपल्या सर्व लेखनातून) वाचकांशी बोलत. 'खरे की नाही?' 'हो की नाही?' असे प्रश्न विचारीत. त्यांची निसर्ग- वर्णने संस्कृतनिष्ठ होती. म्हणजे संस्कृत साहित्यातील वर्णनांची आठवण करून देणारी होती. त्यामुळे त्यांची पात्रे हुकमी पाठांतरासारखी बोलत. उदाहरणार्थ, 'बाबा, नदीचा उगम जरी डोंगराच्या पोटात होत असला तरी तिला सागराचीच ओढ वाटावी हे रास्तच नाही का?' असे ते बोलत. मधूनमधून त्यांचे नायक आणि नायिका मनसोक्त पत्रे लिहीत. ती विशाल स्वगते असत. मनातले सारे त्यांचे नायक आणि नायिका तपशिलाने सांगत. त्या साऱ्या परसटपणाला खांडेकरी स्पर्श होता. त्यांच्या कादंबरीतला किंवा कथेतला किंवा पटकथेतला किंवा त्यांनी लिहिलेल्या विविध प्रस्तावनांमधला ध्येयवाद लोकप्रिय ठरला. त्यांचे राजकीय चिंतन त्यांच्यापुरते मर्यादित होते. ते स्वतःला जीवनवादी म्हणून घेत. तथापी त्यांचे लेखन उद्‌बोधनाकडे वळणारे होते. वाचकाला आकृष्ट करण्याचे खांडेकरांचे तंत्र काहीसे वेगळे होते, जरी ते ना.सी. फडके यांच्या तंत्रापेक्षा वेगळे होते. खांडेकरांची मोहिनी वाचकमनावर पडली.


खांडेकरांच्या एकूण लेखनात बोध दिसतो. त्यांच्या लेखनप्रकृतीवर कोल्हटकरी संप्रदायाचा प्रभाव आहे. त्यामुळे खांडेकरांना रूपकात्मक शैलीचा छंद आहे. रूपकाच्या आडून ते सतत काही सांगतात. गांधीवाद, समाजवाद, क्रांती, मानवता हे सगळे त्यांच्या लेखनात येते. त्यांनी खलील जीब्रानच्या कथांचा अनुवाद केला. खांडेकरांना 'ययाती' कादंबरीसाठी ज्ञानपीठ मिळाले. ही कादंबरी खूप गाजली. यातील कथानक आणि स्वभावरेखन वेगळे आहे. अर्थात ते खांडेकरी पद्धतीचे आहे. ही कथा महाभारतकार व्यासांनी सांगितलेली आहे. या कादंबरीत ती तशी नाही. ययाती हा विसाव्या शतकातील भोगवादी संस्कृतीचा प्रतिनिधी आहे. तो पुराणकालीन ययाती असल्याने काहीसा पराक्रमाशी निगडीत आहे. यातील पौराणिक वातावरण कल्पनारम्य आहे. असे का घडले, असे येथे विचारायचे नाही. कारण पौराणिक ययाती कादंबरीत पूर्ण बदललेला आहे. त्यातून त्यांना रंजन करायचे आहे. वैराग्य आणि त्याग ही मूल्ये दाखवण्यासाठी यती आला म्हणजे पुरे. अशी वेगवेगळी रूपके या कादंबरीत खांडेकर बसवतात. मन हे उधळलेल्या घोड्यासारखे आहे. त्याला संयमाचा लगाम लागतो. हे मानवतेला योग्य आहे. हे सांगण्यासाठी ययाती आहे. ययाती न आवरणारा घोडा आवरतो. असा या कादंबरीत सुरुवातीला उल्लेख येतो. खांडेकरांनी पौराणिक कथेची चौकट मोडली आहे.

महाभारतातल्या ययातीबद्दल खांडेकरांना काहीही सांगायचे नाही. ययाती हे निमित्त आहे. यातून त्यांना वर्तमानातील भोगवादाचा अतिरेक स्पष्ट करावयाचा आहे. या कादंबरीवर उलट-सुलट चर्चा झाल्या. परंतु १९६० ते १९६५ या कालखंडातील कादंबरीच्या खपाचे सर्व उच्चांक ययातीने मोडले. वास्तविक या

काळात 'स्वामी' कादंबरी गाजली, तरीही ययातीने वाचकांच्या मनावर अधिराज्य केले. शर्मिष्ठेच्या प्रेमातील करुणेचे स्वप्नरंजन वाचकांना भावले. देवयानीचा अहंकार प्रभावी ठरला. यामध्ये ययातीचे व्यक्तित्व लक्षात राहण्यापेक्षा शर्मिष्ठेचे व्यक्तित्व लक्षात राहिले. या कादंबरीचा प्रभाव मान्य करून वि.वा. शिरवाडकरांनी 'ययाती-देवयानी' हे संगीत नाटक लिहिले. इथे ययातीची मूळ कथा सांगायचे कारण नाही. ती परिचित आहे. ययातीचे व्यक्तित्व मुळात वेगळे आहे. परंतु खांडेकरांनी शर्मिष्ठेला उदात्त प्रेमिका केले आहे. त्यांना देवयानीच्या व्यक्तित्वात खोल जाता आले असते. देवयानीशी संसार करणारा ययाती असमाधानी नव्हता, शर्मिष्ठेने ययातीला आपलेसे केले. देवयानी दोषी नसताना पराभूत ठरली. तिचे कचावर प्रेम असणे हा दोष नव्हता. तिचे प्रेम कचाने संजीवनी विद्या मिळवण्यासाठी एक साधन म्हणून वापरले. देवयानीची वंचना केली. हे खरे आव्हान कादंबरीकाराला होते. परंतु खांडेकर यात फारसे रमले नाहीत. कारण त्यांना कसेही करून ययाती भोगलंपट दाखवायचा होता. वैराग्याची विफलता खांडेकरांना कळली नाही या संदर्भात प्रा. नरहर कुरुदकरांचे विधान महत्त्वाचे आहे. ''इंद्रियनिग्रह म्हणजे वैराग्य नव्हे. तर वैराग्य हे विषयोपभोगातून मन निवृत्त होणे आहे. अशी आमच्या परंपरेची भूमिका आहे. या भूमिकेप्रमाणे संयम म्हणजे विषयोपभोगाचे मर्यादित प्रमाणात पण सातत्य. या संयमाला तो वैराग्यात रूपांतरित होणार नसेल तर केवळ संयम म्हणून प्रतिष्ठा नाही. आमची मांडणी 'भोग विरुद्ध वैराग्य' आहे, 'भोग विरुद्ध संयम' अशी नाही.'' तरीही खांडेकरांचा ययाती लक्षात घ्यावा लागतो. कारण खांडेकरांनी केलेल्या स्वभावलेखनाने तो वाचकप्रिय ठरला.

प्रौढ वाचकांना खांडेकर आवडले. कारण कल्पकता, कोट्या, सुभाषिते, ध्येयवाद आणि स्वप्नरंजन यांचा समन्वय होता. उदात्त ध्येयवादाचा आभास होता. यामुळे कादंबरी लेखन वेगळे ठरले. ययातीचे सामर्थ्य पात्रांच्या प्रभावी निवेदनात आहे. खांडेकरांना भाषेचे वरदान आहे. ध्येयाचे पाठबळ आहे. शिक्षकी पेशा असल्याने त्यांच्यातला लोकशिक्षक सदैव जागा असतो. म्हणून त्यांना नेहमीच लोकांना काहीतरी आनंदबोध द्यावा असे वाटते. त्यांचा व्यासंग विचक्षण आहे. त्यांच्या लेखनात आलेले विविध संदर्भ याची साक्ष देतात. या संदर्भात एक उदाहरण स्मरते. ते म्हणजे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाला त्यांनी लिहिलेली दीर्घ प्रस्तावना होय. हा संग्रह त्यांनी स्वतः आधी प्रसिद्ध केला. या कवीची वाङ्मयातली पावले त्यांनी ओळखली. त्यांना कुसुमाग्रजांचा काव्यप्रवास आणि नाट्यप्रवास लक्षणीय वाटला. म्हणून त्यांनी ज्ञानपीठ मिळाल्यावर एक दीर्घ मुलाखत दिली. त्यातील एका प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले. प्रश्न असा होता की, 'तुमच्यानंतर मराठी साहित्यात दुसरे ज्ञानपीठ कोणाला मिळावे?' यावर क्षणाचाही विलंब न करता भाऊसाहेब खांडेकर आपुलकीने उद्गारले, 'कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ मिळावे.' खांडेकरांचे हे शब्द सार्थ ठरले.

मराठीत ज्ञानपीठाचा दुसरा सन्मान वि.वा. शिरवाडकर तथा कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांना मिळाला. लेखकाला पुढले जाणवते ते याबाबतीत खरे ठरले. मराठीला दुसऱ्यांदा ज्ञानपीठाचे भाग्य लाभले. खांडेकरांच्या दीर्घ लेखनप्रवासाची यशस्वी सांगता ज्ञानपीठाच्या निमित्ताने झाली.



दुसरा ज्ञानपीठ पुरस्कार वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांना 'विशाखा' या काव्यसंग्रहाबद्दल मिळाला. 'जीवनलहरी' ते ङ्मारवाफ हा त्यांचा काव्यप्रवास लक्षणीय आहे. त्यांची नाटके वाङ्मयीनदृष्ट्या महत्त्वाची आहेत. त्यांच्या 'नटसम्राट' या नाटकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला. त्यांचे ललितलेखन चिंतनाचे लेणे आहे. त्यांनी 'कल्पनेच्या तीरावर', 'वैष्णव', 'जान्हवी' या कादंबऱ्या लिहिल्या. कुसुमाग्रजांना मानवतेचे कवी म्हटले जाते. मराठी काव्यात त्यांचे स्थान विशेष आहे. कुसुमाग्रजांची स्वातंत्र्यपूर्व काळातील 'गर्जा जयजयकार' ही कविता चिरंजीव ठरली. चीनने भारतावर जेव्हा आक्रमण केले तेव्हा त्यांच्या 'आवाहन' या कवितेने मराठीस वेगळे चैतन्य दिले. अन्यायाविरुद्धची चीड, सामाजिक समता, बंधुता, स्वातंत्र्य ही मूल्ये त्यांच्या लेखनात आढळतात. त्यांनी आपल्या कवितेला 'समिधा' म्हटले आहे. यात त्यांनी आपल्या लेखनाचे प्रयोजन स्पष्ट केले आहे. ते म्हणजे, 'तव आंतर अग्नी क्षणभर तरी फुलवावा'. समिधेसारखी जीवनयज्ञात प्रकाशणारी कुसुमाग्रजांची कविता अखेरपर्यंत तेजाच्या शलाका निर्माण करणारी ठरली. कुसुमाग्रज प्रखर आशावादी होते. 'अनंत अमुचि ध्येयासक्ती । अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला।।'' 'कोलंबसाच्या गर्वगीतातील' नाविक जगाला प्रदक्षिणा घालू पाहतो. नवे जग निर्मू पाहतो. नव्या वर्तमानाची स्पंदने टिपू बघतो. त्याची इच्छा आणि आकांक्षा दुर्दम्य आहे. तो नवी नवी क्षितिजे धुंडाळतो. त्याला 'मातीची दर्पोक्ती' जाणवते. 'पृथ्वीच्या प्रेमगीतातली'

वैश्विक प्रेमाची जाणीव अवाक् करते. पृथ्वी सूर्याला म्हणते–

अमर्याद मित्रा तुझी थोरवी अन्।
मला ज्ञात मी एक धूलिकण।
अलंकारण्याला परी पाय तुझे।
धुळीचेच आहे मला भूषण।।

ही विराटता वैश्विक भानाला यशस्पर्श देते. स्वप्नाची समाप्ती या कवितेत कुसुमाग्रज लिहितात–

काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्यांचे हात।
क्षितिजाच्या पलीकडे उभे दिवसाचे दूत।।

ही व्यापक भावना वेगळी जाणीव निर्माण करते. प्रेमाला उदात्त भान येते.

ध्येय, प्रेम, आशा यांची होतसे का कधी पूर्ति।
वेड्यापरी पूजतो या आम्ही भंगणाऱ्या मूर्ती।।

ही प्रखर जाणीव येते. या कविमनाला वैश्विकतेचे आकर्षण आहे. उच्च ध्येयाने कविमन भारलेले आहे. गोरगरिबांवरील अन्यायाला वाचा फोडणारे आहे आणि मायमराठीवर नितांत प्रेम करणारे आहे. 'मराठी मातीत' या प्रसिद्ध कवितेत याचा प्रत्यय येतो.

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यातील शिळा.
रत्नजडित अभंग
ओवी अमृताची सखी
चारी वर्णातुनि फिरे सरस्वतीची पालखी

कुसुमाग्रजांना मराठीचा सार्थ अभिमान आहे. भाषेविषयी त्यांची स्पष्ट मते आहेत. ते एका भाषणात म्हणाले,

''इंग्रजीवर एक संपन्न भाषा म्हणून माझंही प्रेम आहे. जगातील ज्ञानविज्ञानाशी संपर्क साधणारी ती एक खिडकी आहे, हे सुभाषित मलाही मान्य आहे. पण खिडकी म्हणजे घर नव्हे. आपण घराच्या चार भिंती न बांधता, फक्त खिडक्याच उभ्या करत आहोत. आपल्या भाषा मागासलेल्या आहेत, ही तक्रारही खरी नाही. कोणतीही भाषा माजघरात किंवा बाजारात वाढत नाही. ज्ञानविज्ञानाच्या, राज्यकारभाराच्या, आर्थिक व्यवहाराच्या प्रांतात तिचा प्रवेश झाला तरच ती वाढू शकते आणि तशी ती वाढते हे अनेक राष्ट्रांनी सिद्ध केलेलं आहे. आपण कल्पनेची कुंपणं निर्माण करत आहोत आणि एका परस्थ भाषेच्या पायावर डोकं ठेवून 'तूच आम्हाला तार', म्हणून तिला विनवणी करीत आहेत.''

कुसुमाग्रजांच्या मते भाषा म्हणजे संकलन नसते. ती समाजाची वैचारिक भूक असते. ते जाणिवात्मक संचित असते. ते काळातून पुढे जाते. समाजाच्या बदलत्या जीवनाला अखंडता आकार आणि आशय देते. भाषा ही महाशक्ती आहे. समाजजीवनाच्या साऱ्या धारणा आणि विकासाच्या प्रेरणा तिच्यात असतात. समाजाची प्रगती आणि क्रांती मातृभाषेतून करता येते. यातून माणसाची संस्कृती कळते. संस्कृती म्हणजे प्रकाश आणि अंधार यांच्यातील एक चिरंतन संग्राम आहे. त्यात सत्यासत्याची, सुंदर–असुंदराची आणि शिवाशिवाची जाणीव आहे. जगातील सर्व प्रगल्भ भाषांना हे साधले आहे. ते मराठीला साधता येईल. आपला विश्वास हवा. ज्ञानभाषा आणि जगाचे सर्व व्यवहार मातृभाषेत करण्याइतकी भाषिक क्षमता असावी.

कुसुमाग्रजांची विश्वात्मक सर्वेश्वराची भावना अखेर मानवतेत सामिलते. ते 'मी काय तुला वाहू' या कवितेत सांगतात.

एकच आहे माझी दौलत
नयनी जो हा अश्रु तरंगत
दुबळे माझे ज्यात मनोगत
तोच पदी वाहू?


कुसुमाग्रजांच्या कवितेतील वैश्विक मानवता आणि सखोल कारुण्य उद्याच्या प्रकाशाला आपलेसे करते. जीवनाला अखंड ऊर्जा देते. जगण्याला परिमाण देते. हे या ज्ञानपीठकारांचे विलक्षण सामर्थ्य आहे. ङ्गथेंबफ ही कविता माणसातील दिव्यत्वाची प्रचिती देते.

अनंततेचे गहन सरोवर
त्यात कडेला विश्वकमल हे
फुले सनातन
त्या कमळाच्या
एक दळावर
पडले आहे
थोडे दहिवर
थरथरणाऱ्या त्या थेंबाला
पृथ्वीवरचे आम्ही मानव
म्हणतो जीवन.

कुसुमाग्रजांनी केलेला कविकुलगुरु कालिदासाच्या 'मेघदूताचा' अनुवाद मननीय आहे.

'नटसम्राट' हे नाटक मराठी मनामनात वसले आहे.

मराठीतील तिसरे ज्ञानपीठ कवी विंदा करंदीकरांना मिळाले. करंदीकर हे महत्त्वाचे कवी आहेत. 'स्वेदगंगा' ते 'अष्टदर्शने' हा त्यांचा अलौकिक काव्यप्रवास आहे. त्यांच्या अष्टदर्शनेचा विचार ज्ञानपीठ पुरस्कारावेळी झाला. 'पोएम्स ऑफ विंदा', 'त्रिमूर्ती', 'सम मोअर पोएम्स ऑफ विंदा', 'ओंकार' हे त्यांचे इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध आहेत. त्यांनी ज्ञानदेवांच्या अमृतानुभवाचे अर्वाचीनीकरण केले आहे. ते मान्यता पावले आहे. त्यांचे बारा बालकवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'स्पर्शाची पालवी', 'आकाशाचा अर्थ' हे लघुनिबंध आहेत. त्यांचे 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र', 'फाउस्ट भाग १ राजा', 'लियर' हे अनुवाद गाजले. 'परंपरा आणि नवता', 'उद्गार', हे समीक्षासंग्रह आहेत. त्यांची इंग्रजी समीक्षा 'लिटरेचर ॲज अ व्हायटल आर्ट अ क्रिटिक ऑफ लिटररी व्हॅल्यूज' या नावाने मान्यताप्राप्त आहे. हा करंदीकरांचा लेखनसंचार थक्क करणारा



आहे. त्यांनी लेखनात नवनवीन प्रयोग केले.

करंदीकरांच्या भावकाव्यातील उत्कटता आणि विविधता वेगळी आहे. विश्ववास्तवाशी जुळलेली अंतिम भयाची ओढ व प्रत्यक्ष जीवनाची अपरिहार्य ओढ ही द्वंद्वे त्यांच्या कवितेत आहेत. संवेदना भावना आणि विचार यांचे काव्यात्म भावरूप त्यांची कविता साधते. त्यातील भावलय वेगळी निर्माण होते. नवा आशय सक्षम होतो. नवे वास्तव कळते. श्रमशक्तीचा नवा अर्थ लागतो. 'ती जनता अमर आहे' हे वेगळे भान येते. नवा आशय अभंगातून व्यक्त करण्याची करंदीकरी घाटातली प्रतिभा अस्सल जाणवते. कवितेतील सखोलता आगळेपणाने व्यक्त करणाऱ्या करंदीकरांच्या कवितेने नवी दृष्टी दिली. नवा वाचक घडवला. कवितेतील चिंतनशीलता अधोरेखित केली. वसंत बापट, विं.दा. करंदीकर, मंगेश पाडगावकर या कवित्रयींनी आपल्या खास ढंगातल्या काव्यवाचनाने महाराष्ट्र गाजवला. बापटांचा लयदार स्वर, पाडगावकरांचा नाट्यमय शब्द, करंदीकरांचा रोखठोक सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील स्वर मिळून होणारे काव्यवाचन रसिकांना हवेहवेसे वाटले. काव्यसादरीकरणात तिघे अव्वल होते. कुठला शब्द नेमका कसा व्यक्त करावा याचे तालबद्ध भान करंदीकरांना होते. शब्दाला नेमका स्वर बापट देत. शब्दातले भावनाट्य पाडगावकर खुलवत. करंदीकरांच्या कवितेने काव्यातील सखोलतेला एक वेगळा आयाम दिला. त्यांनी 'विरूपिका' हा नवा काव्यप्रकार रूढ केला. एखादा भावलेला अनुभव, विचार किंवा अवस्था विरूपाच्या आधाराने काव्यरूप दिसली की ती विरूपिका होते. जीवनातील विविध कुतूहलांचा जाणीवपूर्वक शोध घेता येतो. छंद आणि मुक्तछंद यातून भाषेच्या लयीचा वेध घेता येतो. करंदीकरांना संगीताची उत्तम जाण होती. बापट संगितातले मुरब्बी होते. संगीत आणि चित्रकला यांचा करंदीकरांचा व्यासंग होता. शिवाय करंदीकर तबला वाजवत. त्यांचे तबलावादन अनेकदा ऐकले आहे. 'धृपद' या काव्यसंग्रहात त्यांनी जी विविध तालचित्रे लिहिली आहेत ती त्या तालाच्या लयमात्रांतल्या रूपात बध आहे. पण तालातून व्यक्त होणारा भाव त्यांनी लयीतून अचूक टिपला आहे. ज्यांना दीपचंदी, झपताल, दादरा, झुमरा, रूपक, आडाचौताल, आदिताल या तालांचे प्राथमिक ज्ञान आहे, त्यांना याचा नेमका आस्वाद घेता येतो. हे ताल ज्या रसिकांना माहीत नाहीत त्यांना तालचित्रातल्या भावलयीतून जे भावचित्र उभे राहते ते त्या तालाचे आणि अनुभवाचे आत्मघर असते. या घरात गेल्याचा आनंद नक्की मिळतो. बालगीतातून करंदीकरांचा संवाद अचूक बालमन टिपतो. त्यांची कविता व्यापक समाजजीवनाचे वेगळे अंग आहे. मराठी अभंगातून त्यांनी परंपरा आणि नवता यांचा सांधा जुळवला. माणसाचे अंती गोत्र एक आहे. हे त्यांनी ठासून सांगितले.

रक्तारक्तांतील। कोसळोत भिंती;  
मानवाचें अंतीं। एक गोत्र.  
छप्पन भाषांचा। केलासे गौरव  
तोचि ज्ञानदेव। जन्मा येवो.  
जागृतांनो फेका। प्राणांच्या अक्षता  
ऐसा योग आतां। पुन्हा नाहीं!


करंदीकरांची 'पुतळा' ही विरूपिका अवश्य वाचावी.

माझ्याच उंचीचा एक पुतळा,  
माझेच नाक,  
माझेच डोळे,  
आणि छाताड पुढे झुकवण्याची पद्धतही माझीच.  
त्या तोतयाला मी माझे कपडे चढवले.  
पँटची बटणे लावली,  
डोक्यावर टोपी ठेवली.  
हातामध्ये काठी दिली.  
आणि मग जोडासुद्धा त्याच्या पायापुढे नीट मांडून  
मी सर्वस्वी विधिमुक्त झालो. हसलो.  
माझा जोडा पायात घालून तो झपाझप निघून गेला.  
शेवटी अटळ ते करावेच लागते.  
त्याच्या चबुतऱ्यावर मी मख्खपणे उभा राहिलो.

यंदा डॉ. भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार घोषित झाला आहे. नेमाड्यांनी कादंबरी हा वाङ्मयप्रकार समृद्ध केला. मराठी कादंबरीला वेगळे वळण दिले. त्यांनी विविध विद्यापीठांमध्ये इंग्रजीचे अध्यापन केले. ङ्गवाचाफया अनियतकालिकाचे संपादनही केले. रंजनवादी मूल्यांना त्यांनी नाकारले. परंपरेची चिकित्सा केली. मराठीवरील इंग्रजी साहित्याचा प्रभाव, शैलीशास्त्रीय दृष्टीने अभ्यास या वैशिष्ट्यांनी युक्त अशी नेमाडेंनी इंग्रजीतून साहित्यनिर्मिती केली. साहित्याची भाषा हे त्यांचे एक वेगळे पुस्तक मानले जाते. काही काळ ते लंडनच्या स्कूल ऑफ ओरिएन्टल ॲन्ड आफ्रिकन स्टडीमध्ये प्राध्यापक होते.

इ.स. १९६३ मध्ये नेमाड्यांची 'कोसला' ही वेगळ्या वळणाची पहिली कादंबरी आली. त्यावेळी ते पंचविशीत होते.

# मौज प्रकाशनाची नवीन प्रकाशने




भिन्नधर्मीय आईवडिलांच्या पोटी जन्म घेतलेल्या एका बुद्धिमान आणि संवेदनशील तरुणाने धर्म आणि संस्कृती यांचा अर्थ शोधण्यासाठी केलेल्या विचक्षण प्रवासाचे, मन हेलावणारे कथन

## इतिहासाचा अनभिज्ञ यात्री

### आतिश तसीर अनुवाद शारदा साठे

किंमत ३०० रुपये




ग्राफिक डिझाइनच्या मूलतत्त्वांची, संकल्पनांची, रचनातंत्राची कलेच्या चौकटीपलीकडे जाऊन दिलेली ही व्यापक ओळख! जाणकारांना ग्राफिक डिझाइनकडे पाहण्याची वेगळी दृष्टी देता देता, डिझायनर्सना अधिक आत्मविश्वासाने डिझाइन साकार करण्यासाठी दिशाही देणारी....

## ग्राफिक डिझाइनचं गारुड

### यशोदा भागवत

किंमत ५०० रुपये    आर्टपेपरवर संपूर्ण चार रंगात छपाई





शहर वसण्याआधी, फक्त तू जागी हो, माझ्याच थारोळ्यात रुतलेली मुलगी, झोपू दे मला निवान्त माझ्याच थारोळ्यात, मृत्यू या दीर्घ कवितांचा समावेश असलेला नीरजा यांचा नवीन काव्यसंग्रह.

## मी माझ्या थारोळ्यात

### नीरजा

किंमत १०० रुपये





महानुभाव पंथाचा आद्य ग्रंथ असणाऱ्या 'लीळाचरित्र' या ग्रंथाची सर्वस्पर्शी आणि तलस्पर्शी अशी विस्तृत संशोधनकेंद्री समीक्षा करणारा तसेच महानुभावी साहित्याच्या अभ्यासक-संशोधकांनाच नव्हे तर, वाचकालाही एक मर्मदृष्टी देण्याचे कार्य विवेकनिष्ठ संवेदनशीलतेने करणारा ग्रंथ

## महानुभावीय निवडक वाङ्मय : एक अभ्यास

### डॉ. र. बा. मंचरकर

किंमत २०० रुपये

**मौज प्रकाशन** गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ ☎२३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com



हा काळ आधुनिक मूल्यांचा होता. याचवेळी अस्तित्ववाद आणि जीवनातील निरर्थकता दिसत होत्या. यातून वर्तमानात विसंगती जाणवत होती. स्वातंत्र्यानंतर ज्या अपेक्षा देशवासीयांनी केल्या त्या पिढीचे नेमाडे हे प्रतिनिधी आहेत. 'कोसला'तील पांडुरंग सांगवीकर हा खेड्यातून आलेला तरुण पुण्याच्या फर्गसन कॉलेजात येतो तेव्हा त्याच्या भावविश्वाला जे काही तडे जातात ते या कादंबरीत आहेत. हा मूल्यव्यवस्थेचा वेगळा संघर्ष आहे. उत्तर आधुनिकतेचा संस्कार आणि बंडखोरी यातून सूचित होते. हे जगणे एकाच वेळी अस्वस्थ करते आणि एकाच वेळी समृद्ध करते. ही कादंबरी एक सफल कादंबरी मानली जाते. यानंतर नेमाड्यांनी बिढार, झूल, जरीला आणि हिंदू या कादंबऱ्या लिहिल्या. यातून त्यांनी देशीवादाचे समर्थन केले आहे. हिंदुत्वाच्या समृद्ध अडगळीचा हा एक प्रवास आहे. रूढींविरुद्धची समृद्ध निरर्थकता यात आहे. 'हिंदू'मधला खंडेराव हा नायक आपल्या संवेदना समर्थपणे मांडतो. कादंबरीच्या शेवटी खंडेराव आपल्याला सांगतो–

होऽ देवाऽऽ
ह्या घराची वेल मांडवावरे चढू दे, देवाऽऽ
होऽ देवाऽऽ
थोरल्या बायेच्या पुताला हळद लागू दे, देवाऽऽ
होऽ देवाऽऽ
आत्या बायेच्या भाच्याला हळद लागू दे, देवाऽऽ
होऽ देवाऽऽ
धाकट्या बायेच्या दीराला हळद लागू दे, देवाऽऽ
होऽ देवाऽऽ
थोरल्या बायेच्या पुताच्या घरात काकनं वाजू दे, देवाऽऽ
होऽ देवाऽऽ
आत्याबायेच्या भाच्याच्या घरात काकनं वाजू दे, देवाऽऽ
होऽ देवाऽऽ
धाकट्या बायेच्या दीराच्या घरात काकनं वाजू दे, देवाऽऽ
होऽ देवाऽऽ
थोरल्या बायेच्या पुताच्या उंबरात लेकरं रांगू दे, देवाऽऽ
होऽ देवाऽऽ

भालचंद्र नेमाडे हे मुळात कवी आहेत. त्यांचा 'मेलडी' हा काव्यसंग्रह १९७० मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'देखणी' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. 'मेलडी'तली कविता नव्या भाषेतून आली. परंतु तिने मानवी सनातन दुःखाचे संवेदन रेखाटले. नेमाडेंना निर्मिती क्षमतेचे सूक्ष्म भान आहे.

'दुःखाचा अंकुश असो सदा माथ्यावर,
हलाहल पचवल्यावर माथ्यावर चंद्र असो,
चांगली माणसं मोजायला हाताला हजार बोटं असोत,
सापडत नाही बिचारी.'

हे नेमाडेंचे सनातन दुःख आहे.

''दिवसाकाळी रोजच्या जगण्याचे उर्ध्वपातन होऊन त्याची निदान एक ओळ व्हावी'' असे नेमाडे जेव्हा लिहितात तेव्हा जगण्यातला हुंदका आणि सच्चा अनुभव स्पष्ट होतो. नेमाड्यांची निर्भिडता प्रसिद्ध आहे. ज्ञानपीठ पुरस्कार देणारी समिती संकुचित आहे की व्यापक आहे या चर्चेला अर्थ नाही. नेमाड्यांचे चिंतन नक्कीच मोलाचे आहे. ज्ञानपीठाने नेमाडे अधिक भारतीय मराठी साहित्यकार म्हणून प्रसिद्ध झाले.

हे सारे ज्ञानपीठकार चिंतनशील आणि अभ्यासू आहेत. त्यांची व्यापक मानवतेची दृष्टी सध्या गरजेची आहे. या साऱ्यांमध्ये एक महत्त्वाचे जीवनसूत्र आहे. ते म्हणजे करुणा आणि उत्कटता हे होय. कुसुमाग्रजांच्या शब्दात हे मराठीपण स्वच्छ होईल.

माझं मराठीपण
मी शोधलं सह्याद्रीच्या डोंगरात,
संतांच्या शब्दात,
इतिहासाच्या पानात,
तेव्हा सारीजणं हसून म्हणाली,
''आम्ही शोधलं आमचं मराठीपण
या भूमीवरील माणसांच्या मनात,
त्यांच्या जखमांत, त्यांच्या रक्तात,
ज्यातून उसासतात
सूर्याचे किरण
मराठीपण ओलांडून साऱ्या आकाशाला
गवसणी घालणारे''
(कवितासंग्रह–छंदोमयी–कुसुमाग्रज)

**– यशवंत पाठक**
भ्रमणध्वनी : ९४०४४१५२८२
yashwantpathak3@gmail.com


# परंपरा व आधुनिकतेचा मेळ

**रंजन रघुवीर जोशी**

घुमान (पंजाब) येथे होणाऱ्या ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने खूप महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. त्यामुळे मराठीला गोठलेल्या मानसिकतेतून बाहेर येता येईल असे वाटते. महेंद्र मुंजाल व प्रकाश पायगुडे लिखित 'महाराष्ट्र साहित्यपत्रिके'तील 'नामदेवांच्या तीर्थक्षेत्री' हा लेख वाचल्यावर घुमानची माहिती मला कळली व मला माझ्या आजच्या ६४ वर्षांच्या वयाच्या अज्ञानाची कीव करावीशी वाटली. इतकी महत्त्वाची माहिती मला कशी नव्हती? बाराव्या शतकात संत नामदेव प्रवास करत पंजाबपर्यंत कसे गेले असतील? त्यावेळेस मनात विचार आला की बौद्धतत्त्वज्ञान शोधातील चिनी प्रवाशांची प्रवासवर्णने किंवा गोडसेभटजीचे एकशे पन्नास वर्षांपूर्वीचे प्रवासवर्णन ही पुस्तके जशी आज उपलब्ध आहेत व त्यामुळेच त्यावेळचा वर्तमानकाळ कसा होता हे समजते व त्यानंतरच्या सर्व स्थित्यंतराचा अर्थ आज लावत आपल्याला पुढील काळाचा अंदाज घेणे सोपे होते, तसे संत नामदेवांचे प्रवासवर्णन असे काही साहित्य उपलब्ध आहे का? त्यांनी त्यावेळचे जग कसे पाहिले असेल? व त्यातून वारकरी अहिंसक तत्त्वज्ञान तेथे कसे नेले गेले याची नोंद आहे का? घुमान गाव वसवताना कोणत्या सांस्कृतिक अडचणींना सामोरे जावे लागले असेल? याचा तपशील व आजची स्थिती ह्यातील तफावत शोधत अभ्यासातून भाषा, परंपरा, कला, चालीरीती, रूढी त्या इष्ट किंवा अनिष्ट, व त्यावेळची एकूणच जीवनशैली हे सर्व कळू शकेल काय? शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक ह्यांच्यावर नामदेवांचा कसा प्रभाव पडला? नामदेवांचे हे प्रवासधाडस आजचा मी 'मराठी' म्हणून घेणारा कसा विसरला? असो...

माझ्या चित्रकार वडिलांनी दादरच्या समुद्रालगत ज्ञानेश्वर मंदिरासाठी पन्नास वर्षांपूर्वी (१९६०) नामदेव, तुकाराम अशी चित्रे केली होती. या निमित्ताने हे सर्व आठवले. मात्र विविध चित्रकारांनी काढलेल्या ज्ञानेश्वरांच्या चित्रंप्रतिमेचं मला कधीच आकर्षण वाटलं नाही जरी ती चित्र म्हणून उत्कृष्ट दर्जाची होती. त्या प्रतिमा मनात सतत विसंगत असल्याचे वाटत राही. १९६९ मध्ये मानवाचे चंद्रावरील पाऊल अनुभवणारी माझी मानसिकता शुद्ध वैज्ञानिक हेतूने प्रेरित. त्यामुळे विज्ञानाने प्रत्येक मिथकाचा खरेखोटेपणा तपासावा असे माझे मन घडत गेले. आईवडील प्रागतिक विचारांचे होते त्यामुळे मोकळेपणाने सर्व शिकताना नम्रपणाने वागणे हा त्यांचा संस्कार सतत जमिनीवरून चलण्यास प्रवृत्त करणारा ठरला. श्रद्धा/अंधश्रद्धाच्या सीमारेषा तेव्हाच स्पष्ट होत गेल्या.... माझ्यावर चार्वाकाच्या विचारांचा प्रभाव असल्यामुळे आजच्या 'मॉडर्न'चा अर्थ उमगला. चार्वाक ही एक त्या काळात आधुनिक विचारसरणी होती. जी आजही आहे. वैज्ञानिक विचारांनी तयार झालेला चार्वाकविचार आपण दुर्लक्षिला व युरोप आपल्या पुढे निघून गेला.

इ.स.२००० मध्ये 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल यांनी डॉ. रवीन थत्ते यांच्या इंग्रजीतील 'ज्ञानेश्वरी' पुस्तकासाठी चित्रे रेखाटण्याचे काम मला करण्यास सांगितले. त्या निमित्ताने मला ज्ञानेश्वर डॉ. रवीन थत्ते यांच्या इंग्रजीतून वाचण्यास मिळाले. 'ज्ञानेश्वरी' मी मराठीतलीही वाचलेली नाही. आध्यात्मिक नसल्यामुळे अनेक प्रश्नांनी नास्तिकता मनात रुजली आहे. अशा मनोभूमिकेतून त्या पुस्तकासाठी मी चित्रे रेखाटणे हे मोठेच आव्हान होते. त्यांच्या घरी भेटायला गांगल घेऊन गेले. भेटीत डॉ. थत्तेंनी पुस्तकाची संकल्पना सांगितली. डॉ. थत्ते वयाची साठी ओलांडताना ज्ञानेश्वरांचा भावविचार त्यांच्या चार दशकांच्या प्लास्टिक सर्जन म्हणून अनुभवाच्या जवळपास जाणारा वाटला व तो आपल्या ब्रिटिश डॉक्टर मित्रांशी संवादरूपाने करावा तसेच आजच्या नव्या दमाच्या तरुणांना देखील जागतिक मान्यता असलेल्या इंग्रजीतून व्हावा अशा दुहेरी हेतूने हे पुस्तक योजले होते. थोडक्यात, जागतिक संवादात ज्ञानेश्वरांचे भावविचार प्रकट व्हावेत, परंतु ते आध्यात्मिक अंगाने न होता सर्वसामान्य लौकिक पद्धतीने असावेत अशी त्यामागची संकल्पना. हे त्यांनी सांगितल्यावर हळूच मला त्यांनी त्यांच्या संकल्पनेप्रमाणे रेखाटलेले छापील ज्ञानेश्वरांचे (ते बहुतेक चित्रकार दलालांचे असावे) चित्र मला दाखवले व तू असे काहीसे करावे असे सुचवले. मी म्हणालो, ''मला असे जमणार नाही. दुसरा वास्तववादी चित्रकार पाहावा, मी प्रामाणिकपणे सांगतोय की मानवी देह शरीरशास्त्रानुसार मी काढू शकत नाही. त्यातून असे ज्ञानेश्वरांनचे चित्र तर अजिबात करता येणार नाही. ह्याचे मुख्य कारण मी, तुम्ही किंवा गांगल ह्यापैकी कुणीच प्रत्यक्षात




रंजन जोशी यांच्या कल्पनेतील व्हिज्युअल ज्ञानेश्वरी


ज्ञानेश्वरांना पाहिलेले नाही किंवा ते माझ्या स्वप्नातदेखील मानवी रूपात दिसण्याची श्यक्यता नाही. दिसले तरी मी काढणार नाही. त्यांचे अमूर्तपण गेली ७०० वर्षे त्यांच्या संजीवन समाधी घेण्यातूनच अधोरेखित असताना आपण का म्हणून त्यांना आपल्या कल्पनेच्या मानवी देहात अडकवावे? मला स्वतःलाच हे पटत नाही.'' हे सर्व दोघे ऐकत होतेच. मी मनाशी घाबरलो. वाटले ह्या दोघांना बहुतेक मी अपमानास्पद बोललो. दोघे हसले. डॉ. थत्तेंनी टाळी दिली व गंगालांना म्हणाले, योग्य चित्रकार आणलास. माझ्या हातात पुस्तकाचे हस्तलिखित (टाइप केलेले) डॉ. थत्तेंनी ठेवले व म्हणाले, मित्रा कामाला लाग. तुला जे योग्य वाटेल ते कर.


घरी आलो व लक्षात आले की आता माझी खरी परीक्षा सुरू झाली आहे. दोघे आपापल्या क्षेत्रातील दिग्गज असल्याने मनातून घाबरलो. हस्तलिखित रात्री सहज वाचून पाहावे म्हणून वाचू लागलो. इंग्रजी वृत्तपत्रातून काम केल्याचा अनुभव असल्याने वाचन सोपे होते. ह्या कामाकरता मी माझी चित्रकार म्हणून भूमिका प्रथम माडतो. मुळात मी कोणत्याच चित्रशैलीचा पुरस्कर्ता नाही. विषयाला न्याय देणे हे माझे उपयोजित चित्रकार म्हणून प्रथम कर्तव्य आहे. त्यानुसार ज्ञानेश्वरांचे अमूर्तरूप कायम ठेवत हे काम करावे हे मनात स्पष्ट केले. त्यामुळे विषयाला न्याय देता येईल असे वाटले.


डॉक्टरांचा मूळ हेतू हा विषय आजच्या विज्ञान व लौकिक भाषेतून मांडणे असा असल्याने मला येथे मुक्तपणे काम करण्यासाठी संधी मिळाली. नेहमीप्रमाणे हातात काळ्या रंगाचे स्केच पेन व स्केच पॅड होतेच. डॉक्टरांच्या गतिशील लिखाणाने मनाची पकड नकळत घेतली व त्यानुसार स्केच पेन डूडल रेखाटत चालू लागले. वाचन संपतानाच ५० डूडल तयार झाली. हा काही चमत्कार नव्हता, पण उस्फूर्ततेचा अनुभव होता. माझ्या मनाची घडण चित्रकार वडिलांनी दृश्यकलेचे मूलभूत घटक नीट समजून दिलेले असल्यामुळे पक्की होती, माझे उपयोजित चित्रकलेतील गुरू चित्रकार –कवी षांताराम पवार ह्यांचे काम – विशेषतः त्यांनी रेखाटलेली कवी विंदा करंदीकरांच्या 'आदिमाया' कवितासंग्रहकरताची चित्रे, सुप्रसिद्ध जर्मन चित्रकार पॉल क्लीच्या

**बाहौसच्या प्रेसचे चिन्ह व खालील चित्रात आर्ट डेकोचा प्रभाव उजव्या बाजूकडील रंजन जोशींनी काढलेल्या चित्रावर दिसून येतो.**







**षांताराम पवार यांची 'आदिमाया' कवितासंग्रहाकरता केलेली चित्रे**



**रंजन जोशी यांच्या मनातील अर्जुन प्रतिमा**

'थिंकिंग आय' ग्रंथाचा प्रभाव, त्यांच्याच बाहाऊस स्कूल व युरोपातील आर्ट नोव्हा चित्रशैलीचा प्रभाव अशा एकत्रितपणे ती उत्स्फूर्तता येण्यास कारणीभूत ठरली. स्वतःबद्दलची चित्रकलेतील वास्तवतेची प्रामाणिक जाणीव मनात कायम होती. त्यामुळे दुसऱ्या दिवशी ही चित्रे (डूडल) दिनकर गांगल यांनी डॉ. रवीन थत्तेना दाखवण्यास सांगितले व त्यांचे मत घेऊन अंतिम काम करावे असे सुचवले. डॉ. थत्तेंनी त्यांचा शब्द पाळला व आहे तसेच आपण हे पुस्तकांत वापरू असे सुचवले. मला उपयोजित चित्रकार म्हणून स्वर्गीय आनंद मिळाला, कारण आम्हाला बऱ्याचदा गृहीत धरले जाते.


'आदिमाया' कवितासंग्रहाकरता केलेली चित्रे, सुप्रसिद्ध जर्मन चित्रकार पॉल क्लीच्या 'थिंकिंग आय' ग्रंथाचा प्रभाव, त्यांच्याच बाहाऊस स्कूल व युरोपातील आर्ट नोव्हा चित्रशैलीचा प्रभाव ह्या विषयीच्या संकल्पना काय आहेत ते पाहू. त्यामुळे उपयोजित चित्रकारांवर प्रभाव पडतो म्हणजे काय व नक्कल करतो म्हणजे काय ह्यातील फरक आपणास लक्षात येईल.

सोबतचे चित्र चित्रकार कवी षांताराम पवार ह्यांचे आहे. शेजारील मी केलेल्या डूडल पैकी एक. 'आदिमाया'ची चित्रे बारकाईने पाहिल्यास फरक दिसेल. रेषेची, आकृतिबंधाची मांडणी सरांची घट्ट व नेमकी आहे. त्यांचा कला-आकृतिबंध अभिजाततेतून उत्क्रांत होत आल्याने परिपूर्णपणे घडलेला असा तो उत्कृष्ट व कोठेही निसटताना अथवा कमकुवत दिसत नाही. माझ्या डूडलमध्ये गतिमानता आहे परंतु पवारसरांप्रमाणे ती उत्क्रांत झालेली नाहीत. उत्स्फूर्तता त्यात नक्कीच आहे. मी पवारसरांच्या ह्या कला-आकृतिबंधाची घोटून नक्कल करू शकलो असतो. त्यामुळे तो आकर्षक नक्कीच झाला असता, पण त्यांतील रेषेची उत्स्फूर्तता नाहीशी झाली असती. तसेच ५० डूडल अशा तऱ्हेने घोटताना नक्कल उघडी पडली असती. मला ह्या कला-आकृतिबंधाचा आधार नक्की मिळाला, चित्रसंकल्पना साकारण्यासाठी. आजपर्यंत चित्रकार-कवी षांताराम पवार ह्यांचे काम मी जे अभ्यासले त्यातून त्यांनी अजिंठा चित्रशैली पचवत (त्यावर त्यांची कवितादेखील आहे.) ती स्वतःच्या चित्रशैलीत विकसित केली असे मला जाणवले. त्यामुळे आम्ही त्यांचे अनेक विद्यार्थी त्यांच्या चित्राची अंधपणे नक्कल करू शकत नाही आणि म्हणूनच त्यांचा पंथ नाही पण स्कूल ऑफ थॉट जरूर आहे, जो आपण स्वीकारा अथवा न स्वीकारा त्यामुळे त्यांना कॉपीराईटची गरजच लागत नाही. विचार करण्यास प्रवृत्त करणारी त्यांची चित्ररेषाच त्यांची सही ठरते.


माझ्या वडिलांनी पूर्वीच दृश्यकलेचे मुलभूत घटक जसे बिंदू, रेषा, आकार, पोत, रंग इत्यादींची संकल्पनेसहची बैठक कलाशाळेच्या आधीच व्यवस्थितपणे करून घेतली असल्याने पवारांच्या सान्निध्यातील पुढील काळात विद्यार्थीदशेत मला विचारलेल्या प्रश्नांना सामोरे जाता आले. त्यांनी विचारले तुला रेषा काढता येते? त्याला तुझा अर्थ देता येतो? तो इतरांना कळू शकतो? जर हे सर्व घडत असेल तर त्याप्रमाणे काम करत राहा. ही चित्रे रेखाटताना हा मंत्र आत्मविश्वास वाढवण्यास उपयोगी ठरला.


सुप्रसिद्ध जर्मन चित्रकार पॉल क्लीच्या 'थिंकिंग आय' ग्रंथाचा प्रभाव, त्यांच्याच बाहाऊस स्कूल व युरोपातील आर्ट नोव्हा चित्रशैलीचा प्रभाव ह्या विषयीच्या संकल्पना म्हणजे काय? प्रथम पॉल क्लीच्या 'थिंकिंग आय' ग्रंथाचा प्रभाव समजून घेऊ. स्विस-

**डाव्या बाजूची चित्रं पॉल क्ली ह्यांची असून उजव्या बाजूंची रंजन जोशींनी डॉक्टर थत्तेंच्या पुस्तकाकरताची केलेली आहेत. पॉल क्लींच्या चित्राचा प्रभाव कसा असू शकतो हे दिसून येते.**












जर्मन असलेल्या पॉल क्लीची कर्मभूमी जर्मनीच्या बाहाऊस स्कूलमध्ये द्रष्टा कलाशिक्षक, अभिजात चित्रकार म्हणून गाजली. त्यांच्या स्वतंत्र चित्रशैलीमुळे क्युबिझम, एक्स्प्रेशनिझम, सिरियालिझम असे विविध चित्र प्रकार विकसित होण्यास मदत झाली. त्यांना आशियाच्या ओरियनटीलिझममध्ये देखील गती होती. त्यांची रंगभाषा, चित्ररेखाटनात लहान मुलासारखी निरागसता, सहजपणे प्रकट होणारी विनोदाची झाक हे सर्वं आजपर्यंत अनेकांना प्रेरक ठरले. दृक्कलेतील अवकाश, काळ, गती ह्यावर त्याचा भर असे. लिओनार्डो विंचीच्या योग्यतेचा कलाकार असे त्यांच्या बाबतीत म्हटले जाते. त्यांच्या दृक्कलाविषयक विचारांच्या 'थिंकिंग आय' ह्या ग्रंथांचे जगात खूप महत्त्व आहे. मराठीत 'विचार करणारा डोळा' हे शीर्षकच त्यांच्या कामाची महत्ता सांगतो. बाहाऊस स्कूलच्या जडणघडणीत पॉल क्ली महत्त्वाची व्यक्ती आहे. बाहाऊस स्कूलने गेल्या शतकात औद्योगिक क्रांतीच्या रेट्याला विज्ञान व कला एकत्रित बसवून समर्पक उत्तर दिले. त्यामुळे कलेची मानवी नाळ कायम राहिली. आजची टेक्नॉलॉजी व कला – अनेक सुंदर आकराच्या, रंगाच्या मोबाईलची डिझाईनस, दृश्यकला, विविध नित्याच्या वापरातील वस्तू, स्थापत्य रचनाशास्त्र, औद्योगिक अवजारे इत्यादी बाहाऊस स्कूलच्या प्रभावातून विकसित झाली. त्याचे मूळ ह्या बाहाऊस स्कूलच्या विचारधारेमध्ये आहे. मला ह्य अभ्यासाचा उपयोजित चित्रकलाशिक्षक म्हणून काम करत असताना खूप फायदा झाला. होलिॲस्टिक म्हणजे सर्वांगीण पद्धतीने आजूबाजूचे अवलोकन करत निर्मिती करणे हे शिकता आले. युरोपातील आर्ट नोव्हा चित्रशैलीचा प्रभाव हा की निसर्ग आणि माणूस हे परस्पर कसे एकमेकास पूरक आहेत ते ह्या पद्धतीतून



काम करणाऱ्या चित्रकारामुळे शिकता आले. हे सर्व मी ओढूनताणून जोडलेले नाही. येथे मला स्टीव्ह जॉब्स ह्या एकविसाव्या शतकात नव्या विज्ञानाची व्याख्या निर्माण करणाऱ्या– ज्याने टेक्नॉलॉजीतून त्याच्या 'ॲपल कम्प्युटर'ने नव्या जीवनशैलीला जन्माला घातले त्याची आठवण झाली. तो तरुणपणात (१९७०) भारतात हिप्पी म्हणून आला होता, परंतु त्यातून बाहेर पडत पुन्हा अमेरिकेत गेला. त्याने आत्मचरित्रात नमूद केले की भारताने मला INTIUITION (अंतःप्रेरणा) दिली व युरोपने RATIONALISM (वास्तवता) दिली. ह्या दोहोचा मी एकत्रितपणे वापर करून पुढचा इतिहास घडवू शकलो. थोडक्यात तो नुसताच अफूची गोळी खाऊन ध्यान करत बसला नाही.


आज घुमान (पंजाब) येथे होणाऱ्या ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि प्रत्यक्ष संत तुकारामांचे वंशज व त्यांची वैचारिक परंपरा पुढे नेणारे खरे वारसदार डॉ. सदानंद मोरे ह्यांनी अनेकदा व्यक्त केलेले 'परंपरा व आधुनिकतेचा मेळ घातला जावं' हे विचार नीट समजावून घेताना मला अनेक स्टीव्ह जॉब्स तयार होतील ह्याची खात्री वाटते.




**पॉल क्ली व त्यांची चित्रकला**

इंग्रजीतील 'ज्ञानेश्वरी' पुस्तकासाठी चित्रे रेखाटण्यास हे सर्व मला कामी आले. कारण माझ्यावर आध्यात्मिकतेचे ओझे नाही, तेव्हा आपल्याला हे केले म्हणजे पाप लागेल ही भीतीच नव्हती व आजही नाही. विवेक, नैतिकता ह्या जाणिवा फ्रीडम ऑफ एक्स्प्रेशन्समध्ये संयमाची जाण ठेवण्यास अपेक्षित असतात.

इंटरप्रिटेशन ह्याला मराठीत योग्यं शब्द मला माहीत नाही. इंटरप्रिटेशनच्या बैठकीत वरील चर्चिलेले सर्व थर मनाच्या मागच्या कप्प्यावर मात्र काम करत असावेत. INTERPRETचा माझ्याकडील 'सटूडण्स मॉडर्न डिक्शनरी'तील अर्थ कलात्मक कृतींत– चित्रात– दर्शवणे... इत्यादी. इंटरप्रिटेशनचाच उपयोग मी डॉ. रवीन थत्ते यांच्या इंग्रजीतील ज्ञानेश्वरी' पुस्तकासाठी चित्रे रेखाटण्यास केला. उपयोजित कलाकारांना अभिजाततेची जाणीव असावी कारण त्यांना कोणतेही संदेशवहन दृक्कलेद्वारेच करावे लागते. ह्या ठिकाणी प्रथमच मांडलेल्या माझ्या भूमिकेतून ती इंटरप्रिट होत गेली. हे चित्रे व त्यावरील माझे टिपण PERCEPTION ह्या इंग्रजीतून माझ्याकडे आलेल्या शब्दाचे आहे. त्याचा मराठीतील अर्थ विषयग्रहणशक्ती, इंद्रियाने ग्रहण करणे. येथे मला चित्रकार पॉल क्लीच्या 'थिंकिंग आय' ग्रंथाचा प्रभाव उपयोगी आला. आर्ट डेको व आर्ट नोव्हा चित्रशैलीचा नमुना. प्रत्यक्ष सोबतचे चित्रच





**पॉल क्ली यांच्या 'द थिंकिंग आय' या पुस्तकांची मुखपृष्ठे**

ह्या प्रयोगाच्या पार्श्वभूमीची कल्पना देईल. दोन चौकटी एकमेकावर, त्यांचे दंड मध्ये तुटलेले व ह्या सर्वात मध्ये एक बिंदू जणू घेरलेला असा आभास. हे इंटरप्रिटेशन पाहा 'विस्डम' इंग्रजी शब्दांचे आहे. डॉ. रवीन थत्ते  त्यांना ज्ञानेश्वरीतून समजलेल्या ह्या शब्दाविषयी म्हणतात, आपल्या गाढ झोपेतल्या घोरण्यातून शब्द निपजले. मी काय दाखवले? SPIRAL म्हणजेच शंखाकृती, मळसूत्राकार आकारातून पक्षी निघाले व आकाशात विहार करू लागले. पक्षी शब्दाचे प्रतीक बनले. शंखाकृती, मळसूत्राकारकृती ध्वनीचे प्रतीक बनले. थोडक्यात  डॉ. रवीन थत्तेंच्या निमित्ताने माझी नवीच दृक्‌भाषा तयार होत त्यातून त्यांना उमगलेल्या ज्ञानेश्वरीला मी अजाणतेपणा आजच्या चित्रभाषेत रूपांतरीत केले. पूर्वीच नमूद केल्याप्रमाणे माझ्यावर आध्यात्मिकतचे ओझे नाही. थोडक्यात, सातशे वर्षांपूर्वीच्या ह्या सुंदर काव्याला एकविसाव्या शतकाच्या परिभाषेत आणता आले. आदिमानवकालीन निरागसता मी केंद्रस्थानी ठेवतो. परंपरा व आधुनिकतेचा मेळ घातला तर 'हे विश्वची माझे घर' ही संकल्पना शांती व आनंद देणारी ठरेल. माझा हा प्रयोग नामदेव, तुकाराम, सावतामाळी इत्यादींसारख्या समतेचा व सौहार्दपूर्ण वातावरणाचा विचार देणाऱ्याच्या विचारांवरदेखील अशा किंवा अन्य पद्धतीने अन्य कलाकारांनी मांडला तर नव्याने परंपरा व आधुनिकतेचा मेळ अधोरेखित होईल असे वाटते. ज्ञानेश्वरांचा भावविचार त्या चित्रांमधून व्यक्त होतो असा अभिप्राय अनेकांनी दिला. त्यामुळे स्फूरण येऊन मी त्या चित्रांचे ठाणे येथे एका आर्ट गॅलरीत प्रदर्शन भरवले. ती माझी VISUAL DYANESHWARI IN MODERN WAY... ठरली. हा प्रयोग मला वाटते, परंपरा व आधुनिकता असा आहे.


**रंजन जोशी यांच्या कल्पनेतील व्हिज्युअल ज्ञानेश्वरी यांच्या प्रतिमा**



**– रंजन रघुवीर जोशी**
भ्रमणध्वनी : ९९६९५३०९४२
joranjanvid@gmail.com

# गोविंदराव पानसरे डोंगराला भिडणारा म्हातारा

**विजय चोरमारे**



घटना २००४ च्या मे महिन्यातली आहे. करवीर पीठाचे शंकराचार्य विद्याशंकर भारती निवृत्त होऊन त्यांच्या जागी श्री विद्यानृसिंह भारती हे सूत्रे घेणार होते. त्यानिमित्त आयोजित केलेल्या समारंभासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन सरसंघचालक के. सुदर्शन उपस्थित होते. यावेळी शंकराचार्यांनी भाषणात, लोकशाही ही या देशातली अंतिम व्यवस्था नसल्याचे म्हटले होते. स्वाध्याय आणि संस्कारांवर आधारित नवी घटना देशासाठी लिहिण्याची गरज असल्याचे तारेही मावळत्या शंकराचार्यांनी तोडले होते. समारंभाला सरसंघचालक पाहुणे असल्यामुळे शंकराचार्यांच्या भाषणाकडे कुणाचे लक्ष नव्हते. मी तेव्हा 'लोकमत'मध्ये काम करत होतो. मला शंकराचार्यांच्या भाषणाचे गांभीर्य जाणवले होते. त्यावर 'शाहूंच्या भूमीत परिवर्तनाचे चक्र उलटे फिरवण्याचा प्रयत्न' असे वृत्तविश्लेषण लिहिले. त्याचा समारोप करताना असे म्हटले होते की, कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही, त्याप्रमाणे कोल्हापूरच्या भूमीतली धगही पूर्वीसारखी राहिलेली नाही. त्यामुळेच शंकराचार्य असे घटनाविरोधी विधान करायला धजावतात वगैरे.

त्यादिवशी भल्या सकाळी पानसरेअण्णांचा फोन आला. म्हणाले, ''तू लिहिलं आहेस, ते बरोबर आहे. पूर्वी एकत्र लढणारी सगळी मंडळी निवडणुकीचं राजकारण आणि इतर काही कारणांमुळे असेल, पण वेगळी झाली आहेत. पुरोगामी मंडळींची एकजूट राहिलेली नाही. तरीसुद्धा ही चांगली संधी आहे, पुन्हा सगळ्यांना एकत्र आणण्याची. प्रयत्न करूया. काही अवघड वाटत नाही मला.''

माझ्यासारख्या पत्रकाराला हेच अपेक्षित होतं. मी जे लिहिलं होतं त्याचा आशय फक्त पानसरे अण्णाच समजून घेऊ शकतात, याची मला खात्री होती. त्यानुसार पुढचं सगळं घडत गेलं. अण्णांनी पुढाकार घेऊन माजी आमदार बाबूराव धारवाडे, शेकापचे प्रा. विष्णुपंत इंगवले, काँग्रेसचे महादेवराव आडगुळे, माजी महापौर भिकशेठ पाटील, माकपचे चंद्रकांत यादव अशी सगळी मंडळी एकत्र आणली, म्हणजे मधल्या काळात विस्कळित झालेल्या सगळ्या लोकांची मोट बांधली. कोल्हापूर शहरात शंकराचार्यांच्या विरोधात रान उठवलं. आठवडाभर कोपरासभा घेतल्या. शेवटी एक मोठ्ठा मोर्चा शंकराचार्य मठावर काढला. त्यासाठी पुण्याहून भाई वैद्य वगैरे मंडळीही आली होती. मोर्चा सुरू होण्याच्या थोडावेळ आधी भवानी मंडपात पानसरेअण्णांसोबत काही प्रमुख कार्यकर्ते मंडळी गप्पा मारत होती, तिथं मी पोचलो. तेव्हा माझ्याकडं निर्देश करून अण्णा सगळ्यांना म्हणाले, आज इथं जे काही आपण जमलो आहोत, त्याला हा कारणीभूत आहे. कुणीतरी डिवचल्याशिवाय आपल्याला राग येत नाही. यानं ते बरोबर केलं.

शंकराचार्यांच्या घटनाविरोधी वक्तव्याच्या विरोधात आंदोलन त्यांनीच संघटित केलं, परंतु आपल्या सर्व सहकारी मित्रांपुढे त्यांनी जाहीरपणे त्याचं श्रेय मला देऊन टाकलं. सार्वजनिक व्यवहारातला हा दुर्मीळ पारदर्शीपणा आहे.

पानसरेअण्णांचं वैशिष्ट्य म्हणजे ते कम्युनिस्ट पुढारी असले तरी कम्युनिस्टांसारखे सतत कारवादलेले किंवा वैतागल्यासारखे नसत. त्यांचं कामाचं आणि आस्थेचं क्षेत्र पक्षाच्या वर्तुळापुरतं मर्यादित नव्हतं. जातीयवादी पक्ष आणि संघटनांच्या संदर्भात त्यांची भूमिका अगदीच ठाम आणि स्पष्ट होती. सगळ्या पुरोगामी घटकांनी त्याविरोधात एकत्र लढायला पाहिजे, असा त्यांचा आग्रह असायचा. आपसातले किरकोळ मतभेद बाजूला ठेवून एकत्र यायला पाहिजे, असं ते म्हणायचे. केवळ म्हणून थांबायचे नाहीत, तर त्यासाठी वेळोवेळी पुढाकार घ्यायचे.

सगळ्यांना एकत्र आणण्यासाठी पक्षाचा रंग अडचणीचा ठरतो, असं लक्षात आल्यावर ते पक्ष, झेंडा, लाल रंग सगळं

बाजूला ठेवून वेगळाच मंच घेऊन पुढे आले. कोल्हापुरात स्थापन झालेलं 'आम्ही भारतीय' लोकआंदोलन हा असाच एक प्रयत्न होता. बाबरी मशीद पाडल्यानंतरच्या काळात 'आम्ही भारतीय' लोकआंदोलन अस्तित्वात आलं आणि वेळोवेळी त्या बॅनरखाली सगळे पुरोगामी घटक पक्ष-संघटनांचे झेंडे बाजूला ठेवून एकत्र आले.

श्रमिक प्रतिष्ठान हा आणखी एक असाच प्रयत्न होता. कामगार-कष्टकरीवर्गाच्या श्रमाच्या पैशातून त्यांनी 'श्रमिक प्रतिष्ठान'ची उभारणी केली आणि सांस्कृतिक मंच असं त्याचं स्वरूप ठेवलं. त्यामागेही त्यांची दूरदृष्टी होती. पक्षात कार्यकर्ते सक्रिय होते. विविध थरांतले कष्टकरी घटक होते. मूलभूत प्रश्नांसाठीच्या त्यांच्या लढाया सुरू असायच्या. कुठलंही सत्तेचं पद मिळणार नाही, याची खात्री असतानाही त्यांनी कधी हताशेचा सूर काढला नाही किंवा लढाई थांबवली नाही. या प्रवासात त्यांच्या लक्षात आलं की, पूर्वी डाव्या चळवळीत कवी, गीतकार, चित्रकार, साहित्यिक अशी वेगवेगळी कलावंत मंडळी असायची. आज अशा लोकांची वानवा आहे. कैफी आजमी, नारायण सुर्वे यांची उदाहरणं किती काळ देत बसायचं? नवी मंडळी तयार झाली पाहिजेत. श्रमिक प्रतिष्ठानच्या कार्याची दिशा त्यांनी तशी ठेवली. कार्यकर्त्यांचं सांस्कृतिक आकलन वाढलं पाहिजे, वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या कलावंत मंडळींनी चळवळीशी जोडून घेतलं पाहिजे यादृष्टीनं त्यांनी काम केलं. काव्यलेखन कार्यशाळा घेतली. स्वतःच्या अमृतमहोत्सवानिमित्त, कोल्हापूर आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान दिलेल्या लोकांच्या चरित्रपुस्तिका लिहवून घेतल्या, जेणेकरून त्या माणसांचं काम नव्या पिढीपुढं यावं. हे करताना त्यांच्या लक्षात आलं की चांगले मुद्रितशोधक नाहीत, तर त्यांनी त्यासाठीची कार्यशाळा घेतली. खरं तर मराठी भाषा, शुद्धलेखन, व्याकरण हे काही त्यांचे विषय नव्हते. मात्र अण्णांना कुठल्या क्षेत्राचं वावडं नव्हतं. याचा अर्थ, ते सगळ्या क्षेत्रांत लुडबूड करायचे असा नव्हे. नेते असूनही ते सतत कार्यकर्त्याच्या भूमिकेत असायचे. स्थानिक पातळीवरील त्या त्या क्षेत्रातल्या जाणत्या मंडळींना मोठेपणा देऊन काम करायचे. सामान्य कार्यकर्त्यांना मंचावर संधी द्यायचे. अवि पानसरे स्मृती व्याख्यानमालेत नव्या कार्यकर्त्यांना स्वागत-प्रास्ताविक, पाहुण्यांची ओळख आणि आभार मानण्याची संधी द्यायचे. मंचावर बोलण्यासाठी कार्यकर्ते तयार व्हावेत, असा त्यामागचा त्यांचा हेतू होता.

महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीत कोल्हापूरचं नेतृत्व फारसं ठळकपणे दिसत नाही. रत्नाप्पा कुंभार, बाळासाहेब देसाई अशी नावं चटकन लक्षात येतात. सत्तेच्या राजकारणात कोल्हापूर पिछाडीवर असलं तरी प्रबोधनाच्या चळवळीसाठी मात्र कोल्हापूरनं सातत्यानं महाराष्ट्राला नेतृत्व दिलं. राजर्षी शाहू महाराज, भाई माधवराव बागल, कॉम्रेड संतराम पाटील, कॉम्रेड यशवंत चव्हाण, प्रा. एन. डी. पाटील, कॉम्रेड गोविंदराव पानसरे, राजू शेट्टी या नावांवर नजर टाकली तरी प्रबोधनाच्या चळवळीसाठी, कष्टकऱ्यांच्या लढाईसाठी कोल्हापूरने महाराष्ट्राला काय दिलं आहे, याची कल्पना येते.

वयाची अमृतमहोत्सवी वाटचाल केलेल्या पानसरेअण्णांच्या आयुष्यातील सहा दशकं कोल्हापुरात गेली. अहमदनगर जिल्ह्यातील कोल्हार हे त्यांचं गाव. कोल्हार ते कोल्हापूर असा त्यांचा विलक्षण प्रवास आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेले अण्णा पंधराव्या वर्षी पत्की गुरुजींबरोबर अंगावरच्या कपड्यानिशी कोल्हापूरला आले. सुरुवातीच्या काळात कधी बिंदू चौकात कम्युनिस्ट पुस्तकांची विक्री करणाऱ्या दुकानात तर कधी फुले आणि आंबेडकरांच्या पुतळ्याखाली झोपून त्यांनी रात्री काढल्या. पुढे प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसमध्ये प्रवेश मिळाला आणि त्यांची शिक्षणाची गाडी रुळावर आली. शिक्षण घेत असतानाच अनेक लढे आणि चळवळींमध्ये त्यांनी भाग घेतला.

सोपं बोलणं आणि सोपं लिहिणं हे त्यांचं वैशिष्ट्य. कामगारांपुढे बोलताना कधी ते चीन, रशियाच्या बाता मारत नसत. कितीही अवघड विषय असला तरी त्यांना समजेल अशा भाषेत त्यांच्याशी संवाद साधतच मांडणी करत. कार्यकर्त्यांपुढे बोलताना मात्र काही जागा मुद्दाम रिकाम्या ठेवण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. त्याबद्दल ते म्हणायचे, कार्यकर्त्यांना प्रश्न पडले पाहिजेत, त्यांनी प्रश्न विचारले पाहिजेत, त्यासाठी अशा काही जागा मुद्दाम रिकाम्या ठेवायच्या असतात.

जागतिकीकरणाचे वारे वाहू लागल्यानंतर यासंदर्भातील एकूण चर्चेमध्ये त्यांनी 'खाऊजा धोरण' हा नवा शब्द दिला. 'खाऊजा' म्हणजे खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण.

अण्णांचा मुलगा अविनाश यचा २००३मध्ये अकस्मात मृत्यू झाला. अविनाश डाव्या चळवळीत सक्रिय होता. तरुण नेत्याच्या मृत्यूमुळे सगळेच हादरून गेले होते. अविनाशची अंत्ययात्रा बिंदू चौकातील 'रेड फ्लॅग बिल्डिंग'जवळ आली, तेव्हा सन्नाटा पसरला. काय करायचं कुणालाच कळेना, अशावेळी ७० वर्षांचे अण्णा पार्थिव असलेल्या गाडीवर चढले आणि पक्षाचा झेंडा अविनाशच्या पार्थिवावर अंथरून आपली मूठ आवळली. 'अविनाश पानसरे – लाल सलाम' असं म्हणून 'अविनाश का अधुरा काम कौन करेगा?' – अशी घोषणा दिली आणि पाठीमागून शेकडो लोकांनी 'हम करेंगे, हम करेंगे' असा प्रतिसाद दिला. उपस्थितांच्या अंगावर काटा आला आणि अनेकांच्या गळ्यात हुंदका दाटून आला.

अण्णा किती धीरोदात्त होते, याचं उदाहरण म्हणून या घटनेकडे पाहता येते. व्यक्तिगत आयुष्यात आणि सार्वजनिक जीवनातील वाटचालीत अशा धीरोदात्तपणाबरोबरच खंबीरपणा आणि व्यावहारिक शहाणपणाचं दर्शन त्यांनी अनेकदा घडवलं. त्याचमुळं डाव्या चळवळीचं संख्याबळ घटत गेले तरी चळवळीची ताकद कमी झाली असं कधी जाणवलं नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावावर राजकीय दुकानदारी आणि धार्मिक विद्वेष पसरवण्याचे उद्योग जोरदारपणे सुरू झाले, तेव्हा पानसरेअण्णांसारख्या लोकशिक्षकानं ते मूकपणे पाहणं शक्य नव्हतं. जातीयवादी राजकारण करणाऱ्या शिवसेना आणि तत्सम पक्ष-संघटनांच्या विरोधात त्यांनी अनेक सभांमधून तोफा डागल्या

आहेत. परंतु ते तेवढ्यावरच थांबले नाहीत. शिवाजी महाराजांच्यावर त्यांनी एक पुस्तिका लिहिली. 'शिवाजी कोण होता?' या नावाची. ही पुस्तिका शिवरायांनी सामान्य माणसांसाठी केलेलं कार्य सोप्या भाषेत उलगडून दाखवते. या पुस्तिकेच्या दीडेक लाख प्रती तरी आतापर्यंत विकल्या गेल्या असतील. या पुस्तिकेसंदर्भात एक गमतीशीर घटनाही घडली होती. पुस्तक न वाचता केवळ नावावरून गोंधळ घालणाऱ्यांची आपल्याकडे कमतरता नाही. तसंच या पुस्तकाबाबत घडलं. नावामध्ये शिवाजी महाराजांना एकेरी संबोधण्यामागे अण्णांची काहीएक भूमिका आहे. परंतु त्यावरून कुणीतरी कथित शिवप्रेमींनं पोलिसांमध्ये तक्रार केली आणि पोलिस अधिकाऱ्यांनीही या पुस्तिकेच्या प्रती जप्त करून आपल्या अगाध ज्ञानाचे दर्शन घडवलं होतं.

एकदा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठात आंदोलन करताना कुलगुरूंसमोर जरा जास्तीच आगाऊपणा केला होता. त्याविरोधात कोल्हापूर शहरात तीव्र प्रतिक्रिया उमटत होत्या आणि अर्थात त्याला राजकीय रंग होता. पानसरेअण्णांसारख्या डाव्या पक्षाच्या नेत्यासाठी तर अभाविपवर टीका करण्याची ही मोठी संधी होती. परंतु आयुष्यभर रस्त्यावरच्या लढाया करणाऱ्या अण्णांनी राजकीय भूमिका बाजूला ठेवून वेगळी भूमिका घेतली. ते म्हणाले होते, 'आंदोलनाच्या जोशात कधीतरी असं घडून जातं. ते विसरून जायचं असतं. मीही मागे एकदा तर्कतीर्थांच्या गळ्यात मेलेला साप घातला होता. माझी ती कृती चुकीची होती, हे आता माझ्याही लक्षात येतं, परंतु त्या त्या वेळी असं काहीतरी घडून जाते.'

पानसरेअण्णा नेहमी शाहू महाराजांच्या परंपरेचा उल्लेख करायचे. कोल्हापूरची ती परंपरा पुढे चालवली पाहिजे, यासाठी सतत काहीतरी करत राहायचे. त्यांच्या या चळवळ्या स्वभावामुळेच कोल्हापूर शहराचा जिवंतपणा टिकून राहिला. तिथल्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनात सतत काहीतरी घडत राहिलं. शाहू महाराजांबद्दल त्यांना कमालीची कृतज्ञता वाटत होती. या कृतज्ञतेपोटीच त्यांनी 'शाहू महाराज – वसा आणि वारसा' नावाची छोटीशी पुस्तिका लिहिली, जी शाहूंच्या कार्याची नेमकी ओळख करून देते.


राजर्षी शाहूंच्या नगरीत आयुष्य व्यतीत करणारे अण्णा शाहूंच्या विचारांचे पाईक आणि कृतिशील अनुयायी आहेत. पानसरे म्हणजे नेमके कुठल्या जातीचे, याचं कोडं अनेकांना उलगडत नसे. जाती-पातींच्या पलीकडे जाऊन ते रस्त्यावरच्या माणसांसाठी, कष्टकऱ्यांसाठी लढाया करतात. त्यात रंगारूपानंही ओबडधोबड. मराठा समाजातला माणूस असं काही करणं शक्य नाही, त्यामुळे ते दलित आहेत, धनगर समाजाचे आहेत, असे अनेकजण छातीठोकपणे सांगत. शाहू महाराजांनी आपल्या बहिणीचा होळकरांच्या कुटुंबात विवाह करून आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिलं. आजच्या काळात शेजारच्या घरी शिवाजी जन्माला यावा, अशी मानसिकता असताना पानसरे यांनी आपल्या दोन्ही मुलींचे आंतरजातीय विवाह आनंदानं स्वीकारले. त्यांचं सगळं कुटुंब चळवळीत सक्रिय राहिलं.

डाव्या चळवळीतल्या नेत्यांच्या एकूण व्यवहारातील रुक्षपणा पानसरेअण्णांकडे नव्हता. जगण्यातले आनंदाचे क्षण छानपैकी साजरे करावेत, अशी धारणा असलेले ते कम्युनिस्ट होते. 'अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन' हा असाच एक त्यांनी सुरू केलेला वेगळा उपक्रम आहे. तो सुरू करताना त्यांचा निश्चित असा एक विचार होता. अण्णाभाऊ साठे यांच्यासारख्या शाहिराला, साहित्यिकाला एका जातीपुरतं मर्यादित केलं जातं, हे पाहिल्यानंतर त्यांनी अण्णाभाऊंच्या नावानं जागर सुरू केला. साहित्य संमेलन सुरू करण्याच्या खूप आधीपासून अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त शाहिरी पोवाड्यांची स्पर्धा सुरू केली. त्यानिमित्तानं अठरापगड जातीच्या शाहिरांना अण्णाभाऊ साठे या शाहिराची नव्यानं ओळख करून दिली. स्वत: अनेक चांगल्या गोष्टी उभ्या केल्याच, शिवाय जिथे जिथे काही चांगलं उभं राहतंय, तिथे तिथे ते समर्थनासाठी उभे राहिले. आणि जिथे काही चुकीचं घडतंय त्याविरोधातही ठामपणे उभे राहताना त्यांनी कधी परिणामांची तमा बाळगली नाही. त्यासाठीची किंमत मोजली.

पानसरेअण्णांची वाटचाल पाहिली, की एक खंत सतत वाटत राहते, ती म्हणजे त्यांच्यासारख्या नेत्याला विधिमंडळात जाण्याची संधी मिळाली नाही. कोल्हापूरमधून त्यांनी विधानसभेची निवडणूक लढवली. त्यासाठी चांगली तयारीही केली होती. परंतु त्यामध्ये यश आलं नाही. पानसरेअण्णांचा पक्ष असा, की विधानपरिषदेसाठी कोणत्याही पातळीवरचं संख्याबळ त्यांच्याबाजूनं कधीच नव्हतं. ते विधिमंडळात गेले नाहीत, त्यामुळे त्यांचं काही नुकसान झालं असं वाटत नाही. नुकसान झालंच असेल तर ते विधिमंडळाचं झालं, असं म्हणता येईल. त्यांच्यासारखा कष्टकऱ्यांचा नेता, प्रभावी वक्ता विधिमंडळात गेला असता तर कष्टकऱ्यांचे अनेक प्रश्न त्यांनी धसास लावले असतेच, शिवाय त्यांच्यासोबत विधिमंडळात काम करणाऱ्या सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचंही शिक्षण झालं असतं.

डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि पानसरेअण्णा हे दोघंही संस्थात्मक जीवन जगत होते. दोघांकडेही कार्यकर्त्यांचं मोहोळ होतं, परंतु नेतृत्वाची सक्षम फळी नव्हती. दाभोलकर यांच्यानंतर पानसरे यांची हत्या का, याचं हेही एक कारण असू शकते. एखादी व्यक्ती संपवण्यापेक्षा संस्था संपवली तर आपल्या हल्ल्याचा परिणाम अधिक खोलवर होऊ शकेल आणि आपल्याविरोधात उठणारा आवाज क्षीण होईल, असंही कदाचित हल्ला करणाऱ्यांना वाटत असावे. परंतु त्यांना हे माहीत नसावं की गांधीजींना मारलं म्हणून त्यांचा विचार संपला नाही. दाभोलकरांना मारलं म्हणून जादूटोणा विधेयक लटकलं नाही किंवा अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ थांबली नाही. पानसरेअण्णांवरील हल्ल्यामुळे पुरोगामी चळवळीला ब्रेक लागणार नाही.

दाभोलकर काय किंवा पानसरेअण्णा काय – व्यक्तिगत



जीवनात ही अजातशत्रू माणसं होती. त्यांचे विरोधक होते ते वैचारिक पातळीवरचे. या वैचारिक विरोधकांची सहिष्णू म्हणून कधीच ख्याती नव्हती. त्यांना समाजात ज्या विषाची पेरणी करायची आहे, त्याची तीव्रता कमी करण्याचं काम दाभोलकर आणि पानसरेअण्णा करत होते.

डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि पानसरेअण्णा हे दोघंही केवळ व्यक्ती नव्हते तर संस्था म्हणूनच महाराष्ट्राच्या समाजकारणात वावरत होते. अंधश्रद्धा निर्मूलन समिती, साधना ट्रस्ट आणि एकूण समाजवादी चळवळ सोबत घेऊन दाभोलकरांची वाटचाल सुरू होती. पानसरेअण्णाही लोकवाङ्मयगृह, श्रमिक प्रतिष्ठान, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन, आम्ही भारतीय लोकआंदोलन अशा विविध संस्थांच्या माध्यमांतून कार्यरत होते. एकटेच कार्यरत नव्हते, तर आपल्या विचाराच्या सगळ्यांना सोबत घेण्याचा, कार्यप्रवण करण्याचा प्रयत्न करत होते. जातीयवादी शक्तींविरोधात सतत काहीतरी सुरू राहिलं पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. त्याअर्थानं पानसरेअण्णा अधिक व्यापक लढाई करत होते. एकाच वेळी अनेक शत्रूंशी लढत होते. शत्रुपक्षाला चौकात उभं राहून आव्हान देत होते. डोंगराला भिडण्याची हिंमत दाखवत होते. ऐंशी वर्षं उलटून गेलेला एक माणूस इतक्या आघाड्यांवर काम करू शकतो, हे विस्मयचकित करणारं होतं.

लोक शहाणे झाले पाहिजेत. त्यांना चांगलं आणि वाईट यातील फरक समजला पाहिजे, एवढीच त्यांची अपेक्षा होती आणि त्यासाठी त्यांचं काम सुरू होतं. वाईट काम करणाऱ्यांना त्यांचं हेच काम पसंत नव्हतं, हे अलीकडे अनेकदा दिसून आलं होतं. म्हणूनच तर ज्यांनी दाभोलकरांना मारलं त्यांनीच पानसरेअण्णांना मारलं, असं म्हणता येतं. दाभोलकरांनंतर पानसरेअण्णांनाच का, याचंही उत्तर त्यातच मिळते.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त पानसरेअण्णांनी कोल्हापुरात कम्युनिस्ट पक्षाच्या मित्रांचा मेळावा बोलावला होता. मंचावर त्यांच्यासह त्यांच्या पक्षाचे पदाधिकारी विराजमान होते. बहुतेक ज्येष्ठ मंडळी होती. त्यांच्याकडे निर्देश करून मी जाहीर भाषणात म्हणालो होतो, तुमच्या नेत्या–कार्यकर्त्यांची निष्ठा, चारित्र्य आणि सत्तेची शक्यता नसताना सतत सुरू असलेल्या लढाया याबद्दल आदरच आहे. परंतु अण्णा, तुमचा पक्ष म्हणजे वृद्धाश्रम बनलाय. तुमच्याकडे तरुण कार्यकर्त्यांना संधी नाही. तुमच्याकडे भगतसिंगासारखे मॉडेल असताना तुमची विद्यार्थी आणि युवक संघटना नीट कार्यरत नाही. तुमच्या कार्यकर्त्यांना नीट पत्रकं लिहिता येत नाहीत, प्रसिद्धीमाध्यमांकडे वेळेवर पोचवता येत नाहीत. पक्ष कसा वाढणार? वगैरे वगैरे.

जाहीरपणे कटू बोलण्याचा संस्कार खरं तर माझ्यासारख्याने पानसरेअण्णांकडूनच घेतला होता. मेळावा संपल्यानंतर ते म्हणाले होते, ''तू आमच्या नेमक्या बाबींवर बोट ठेवलेस. आम्ही दुरुस्तीचा प्रयत्न करू.''

एवढा मनाचा मोठेपणा पानसरेअण्णाच दाखवू शकतात.

**– विजय चोरमारे**
भ्रमणध्वनी : ९५९४९९९४५६
vijaychormare@gmail.com

# महाराष्ट्राचे पुरोगामीत्व प्रस्थापित करायला हवे!

**बाबूराव चंदावार**

''महाराष्ट्र पुरोगामी आहे, हे विधान चूक आहे'' असे दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी त्यांची हत्या होण्यापूर्वी म्हटले होते. २१/०२/२०१५ रोजी मराठी वृत्तवाहिनी 'माझा'ने पानसरे यांच्या निधनानंतर याचे वारंवार प्रसारण केले होते. यातून महाराष्ट्राचे सूज्ञ जन घ्यायचा तो बोध घेतीलच! पण, महाराष्ट्र पुरोगामी आहे, असेच जे आजवर म्हणत आले आहेत व अजून म्हणतच असतात, ते ज्या कारणामुळे हे म्हणत असतील त्याचा उलगडा मात्र करून घ्यायला हवा! महाराष्ट्राला इतिहास आहे व तो महाराष्ट्राच्या प्रगतिशीलतेचा द्योतक मानला जातो. कदाचित यातूनच महाराष्ट्राचे पुरोगामीत्त्व साकारले असावे, असे काहींचे मत असू शकते. पण यामुळे इतिहासावर विसंबून राहण्याची अनावश्यक मानसिकता मराठी माणसाची झाली असेल, तर त्याची अनेक अंगांनी चिकित्सा केली जाईलच. अर्थात, यातून ज्याला त्याला आपल्या स्वत:च्या दृष्टिकोनातून निष्कर्ष काढता येईल. पण अशा कोणत्याही निष्कर्षातून अंतिम असे काहीही साध्य करता येईल असे मात्र वाटत नाही. कारण चिकित्सा करून निष्कर्ष काढण्याच्या वृत्ती-प्रवृत्तीला सर्वमान्य अंतिम असे काहीही आजवर साध्य करता आलेलेच नाही व ते साध्य करता येतही नाही! पण याच्या काही परंपरा मानल्या जातातच! अर्थात, महाराष्ट्राची ही ऐतिहासिक परंपरा आहेच. याचे नायक शिवछत्रपती म्हणजे शिवाजी महाराज गणले गेले आहेत. 'स्वराज्य' हा शब्द सर्वप्रथम शिवछत्रपतींनी उच्चारला होता असे मानले जाते आहे. पण तो इस्लामी मोगल साम्राज्याच्या विरोधात उच्चारला गेलेला असल्यामुळे मोगल साम्राज्याला परकीय आक्रमणकारी मानूनच 'स्वराज्य' शब्द महाराष्ट्रात त्या काळी रूढ करण्यात आला होता. 'स्वराज्याचे तोरण बांधण्याचे' कर्तृत्व मानूनच पुरोगामीत्वाचेच त्याला द्योतक मानले गेले आहे. तेव्हा महाराष्ट्राचे पुरोगामीत्त्व स्वराज्याच्या संकल्पातून साकारले असावे असा निष्कर्ष काढता येऊ शकतो. अर्थात, महाराष्ट्रातल्या पुरोगामीत्त्वाची मूळ प्रेरणा 'स्वराज्य' या संकल्पातील आहे, असा याचा अर्थ करायला हवा.

**१. सुधारक व स्वातंत्र्याचे योद्धे यांतील फरक -**

'स्वराज्य' या शब्दाला मोगल साम्राज्याच्या विरोधात जो अर्थ शिवछत्रपतींनी प्राप्त करून दिला होता त्यापेक्षा वेगळा ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधात केल्या गेलेल्या स्वातंत्र्याच्या चळवळीत त्याला अर्थ प्राप्त झाला होता. 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे व तो मी मिळवणारच' या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जहाल राजकारणाच्या घोषणेतून तो अभिव्यक्त झाला होता. पण, लोकमान्यांच्या निधनानंतर भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीला महात्मा गांधींनी सत्याग्रह तत्त्वज्ञानाची दीक्षा दिली व सत्याग्रह चळवळीच्या परिणामातून भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले असे मानले गेले आहे. तेव्हा महाराष्ट्राला जे पुरोगामीत्व लाभले ते स्वातंत्र्याच्या चळवळीतूनच 'स्वराज्य' या संकल्पाला साकार करण्याच्या अनेकानेक प्रयत्नांचे फलित मानायला हवे. मोगल साम्राज्य व ब्रिटिश साम्राज्य या पारतंत्र्याच्या दोन शृंखला तोडण्याचा प्रयत्न व त्याच्या उपक्रमांनाच पुरोगामीत्व मानले गेले असल्यामुळे या प्रयत्न व उपक्रमांना नाकारणारे ते कोणीही असोत, पुरोगामी नव्हतेच हेच यातून स्पष्ट होत गेले आहे. यामुळे स्वातंत्र्य आणि स्वराज्याच्या संकल्पाव्यतिरिक्त ज्या काही अनेकानेक विविधांगी चळवळी या देशात व महाराष्ट्रातही झाल्या होत्या त्या निव्वळ सुधारणावादातच केंद्रित झाल्यामुळे त्यांना स्वातंत्र्याच्या वा स्वराज्याच्या भूमिकेशी समरस झालेल्यांपैकीच मानायचे किंवा काय असा एक प्रश्न जसा त्या काळी उपस्थित झाला होता, तसाच तो यावेळी ही उपस्थित आहेच! कारण महाराष्ट्रात बंगालसारखीच सुधारणावादाची एक प्रदीर्घ परंपरा आहे. महाराष्ट्राचे वैशिष्ट्य असे की, महाराष्ट्रातल्या अनेक जाति-धर्मातले भक्तिमार्गी संत, ज्यांना भागवत धर्माचे पुरस्कर्ते मानले गेले आहे ते सामाजिक सुधारणांचेही पुरस्कर्ते होते हे लक्षात घ्यायला हवे. ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधात जी स्वातंत्र्याची वा स्वराज्याची चळवळ झाली त्यात प्रामुख्याने बंगाल आणि महाराष्ट्र हे दोन प्रदेश अग्रेसर होते म्हणून 'अग्रेसर' या शब्दाचा अर्थ ही 'पुरोगामी' असाच केला जातो आहे. हिंदी भाषेत तरी 'पुरोगामी' या शब्दाचा अर्थ 'अग्रेसर' असाच केला गेला आहे! महाराष्ट्राचे पुरोगामीत्व हे स्वातंत्र्य चळवळीतल्या अग्रेसरत्वातून ही आलेले आहे. यामुळे हे विशेषत्त्वाने लक्षात घ्यायला हवे.

महाराष्ट्राच्या सुधारणावादाच्या चळवळींची परंपरा विशद

करून सांगताना अलिकडच्या काळात महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही तीन नावे प्रामुख्याने पुढे केली जातात. म्हणून पुरोगामी महाराष्ट्र म्हणजे शाहू-फुले-आंबेडकर यांचा महाराष्ट्र असेही म्हटले जाते. महाराष्ट्रात हे सर्वमान्य झाल्यामुळे यावर वाद केला जात नाही व वाद करूही नये असेच मानले गेले आहे. पण, यातून स्वातंत्र्य वा स्वराज्याची पार्श्वभूमी ही स्पष्ट करता यायला हवी! कारण समाजसुधारक म्हणून ज्यांना महाराष्ट्रात मान्यता मिळाली आहे. त्यांना खरे तर स्वातंत्र्यचळवळीचे योद्धे म्हणूनही मान्यता मिळायला हवीच असते. या संदर्भात सर्वच समाज-सुधारक हे स्वातंत्र्याचे योद्धे असतील वा आहेत असे मात्र म्हणता येत नाही. अर्थात, हे मानले जात नाही हे देखील स्पष्टच आहे म्हणून हा एवढा भेद मान्य करूनच सुधारकांचा योग्य तो सन्मान करायला हवा. पण राजकारणाच्या पातळीवर जाऊन ज्यावेळी विचार केला जातो त्यावेळी महाराष्ट्राची सध्याची राजकारणाची पातळी स्वराज्याच्या भूमिकेला व स्वातंत्र्याच्या भूमिकेला साजेशी आहे किंवा काय, हे अर्थातच तपासून घेणे क्रमप्राप्तच होऊन बसते.

**२. राजकीय स्थैर्य नाहीसे होऊ शकेल –**

उजवे प्रतिगामी (राइटिस्ट), डावे पुरोगामी (लेफ्टिस्ट) व मध्यमार्गी (सेंट्रिस्ट) असे तीन राजकीय प्रवाह या देशात असल्याचे मानले गेले आहे. यापैकी उजव्या प्रतिगाम्यांना स्वराज्याच्या वा स्वातंत्र्याच्या चळवळीची भूमिका यापूर्वीही नव्हती व आजही ती नाही. डाव्या पुरोगाम्यांना व मध्यमार्ग अनुसरणाऱ्यांना स्वातंत्र्याच्या वा स्वराज्याच्या चळवळीची भूमिका प्रारंभापासूनच होती व आजही आहे. पण या तीनही राजकीय प्रवाहांची सध्याची परिस्थिती जी काही प्रत्यक्षात दिसते आहे ती वस्तुत: कशी आहे हे लक्षात घेण्याचीच सध्याची परिस्थिती झालेली दिसते आहे.

उजवे प्रतिगामी स्वातंत्र्याचा व स्वराज्याच्या भूमिकेचा स्वीकार करणाऱ्यांपैकी कधीच नव्हते व नाहीत. म्हणून ते जे काही आहेत असे म्हणता येऊ शकेल त्यानुसारच ते धर्म-सांप्रदायिक सनातनी आहेत एवढेच लक्षात येऊ शकते. यात भिन्न धर्म-सांप्रदायिक आहेत म्हणून हिंदु-राष्ट्रवादी, मुस्लिम लीग, तालिबानी, शीख पंथीय उग्रवादी खालिस्तानी अशा सर्वांचीच गणना केली जाऊ शकते. या व अशा सर्वांनाच धार्मिक स्वातंत्र्याच्या नावानेच धर्म-राज्य स्थापावयाची आकांक्षा व महत्त्वाकांक्षा आहे. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्याच्या संघ परिवारातल्या सर्वांना तसेच तालिबानी, इस्लामिक राज्य (आय.एस.आय.एस.) मानणा यांनाही धर्म-राज्य अभिप्रेत आहे. इटलीचा मुसोलिनी व जर्मनीचा हिटलर या दोघांना हिंदु-राष्ट्रवाद्यांनी आपले आदर्श मानलेले आहेत. या दोनही आदर्शांचा पुरोगामीत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या बुद्धिप्रामाण्यवाद्यांकडून प्रखर विरोध दर्शवला जातो आहे. त्यामुळे उजव्या प्रतिगाम्यांना राष्ट्रवादी फॅसिस्ट संबोधिले जाते. यातूनच बुद्धिप्रामाण्यवाद्यांच्या वतीने स्वत:ची पुरोगामी भूमिका ठामपणे प्रतिपादिली जाण्याचा प्रयत्न केला जातो. पण याचा परिणाम राष्ट्रवादी फॅसिस्टांचा पराजय करण्याच्या दृष्टीने अथवा त्यांना नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने झाला, असे मात्र आढळून येत नाही. कारण, लोकशाहीच्या संसदीय कार्यपद्धतीतूनही राष्ट्रवादी फॅसिस्टांना राजकारणात सत्तास्थानावर जाण्यासाठी संधी उपलब्ध होऊ शकते याचाच प्रत्यय भारतात यावेळी आला आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणूक प्रचारातून भाजपा-शिवसेनेसारख्या उजव्या प्रतिगामी पक्षांच्या वतीने मते मिळवण्यासाठी मतदारांना जे आवाहन केले गेले त्यातल्या 'उन्मादी' अभिव्यक्तीला मतदारांनी अनुकूल प्रतिसाद दिला म्हणून ते बहुमत मिळवण्यात यशस्वी झाले! निवडणुकीत उजव्या प्रतिगाम्यांनी मते मिळवण्यासाठी केलेल्या 'उन्मादी' प्रचाराचा जो काही प्रत्यक्षात परिणाम झाला तो महाराष्ट्रात सत्तेवर राहिलेल्या मध्यमार्गी पक्षांपैकी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसला बहुमत न देता त्यांना नाकारण्याचाच. पुरोगामी डाव्या पक्षांचा पर्यायच मतदारांसमोर उपलब्ध होऊ न शकल्यामुळे प्रत्यक्षात उपलब्ध असलेल्या उजव्या प्रतिगाम्यांनाच मतदारांनी बहुमताने निवडून दिले आहे. याचे तर्कशुद्ध विश्लेषण करता येऊच नये अशी निर्माण झालेली वस्तुस्थिती मुळातच पुरोगामीत्वाची म्हणता येणार नाही. कारण स्वत:ला पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या दलित व बहुजन पक्षांनीही उजव्या प्रतिगाम्यांना बहुमत प्राप्त करून देण्यास सहाय्य करून त्यांना संधी उपलब्ध करून दिली आहे. यासाठी प्रतिगाम्यांशी अनिष्ट तडजोडी दलित व बहुजन म्हणवणाऱ्या पक्षांनी केल्या असेच प्रत्यक्षात दिसून आले आहे. या सर्व परिस्थितीत महाराष्ट्राचे पुरोगामीत्त्व हरवून गेले असल्यास ते स्वाभाविकच म्हणायला हवे! पण, यामुळे लोकशाहीची संसदीय कार्यपद्धती ज्या एका दिशेने जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे त्यावर विचार करायला हवा! कारण एकूणच संसदीय कार्यपद्धतीच्या मर्यादा पुरेशा प्रमाणात स्पष्ट झाल्या आहेत. यातूनच अराजकाला संधी उपलब्ध होऊ शकल्यामुळे यापुढच्या काळात राजकीय स्थैर्य नाहीसे होऊ शकेल याची कल्पना करायला हवी.

**३. संसदीय लोकशाही स्वीकारणारे व नाकारणारे डावे पुरोगामी –**

अराजकता आणि राजकीय अस्थिरता या दोन्ही संदर्भात डाव्या पुरोगाम्यांच्या बाबतीत त्यांच्या यावेळच्या परिस्थितीचे अवलोकन करून घ्यायला हवे. देशात व महाराष्ट्रातही कोणाला डावे पुरोगामी म्हणायचे असाही एक प्रश्न उपस्थित होऊ शकतो. कारण डाव्या पुरोगाम्यांच्या भिन्न राजकीय पक्षांच्या वतीने, त्यांच्या सोयीनुसार, वेगवेगळ्या पुरोगामीत्वाच्या व्याख्या केल्या जातात व त्या सर्वच काही प्रसंगी एकमेकांच्या गळ्यात गळा घालून राजकारणात मिरवतानाही दिसतात! म्हणून ते डावी पुरोगामी विचारसरणी संदिग्धावस्थेत किंवा शंकास्पद अवस्थेत नेऊन सोडतात याची त्यांना खंत वाटतच नसावी असेच काहीसे वर्तन डाव्या

पक्षांचे दिसते आहे! कम्युनिस्ट विचारसरणी स्वीकारणाऱ्यांचे अनेक राजकीय पक्ष आहेत. यातलेच काही रशियाच्या बोल्शेविक क्रांतीच्या समर्थनातून अस्तित्त्वात आलेले आहेत. चीनची लाल क्रांती ज्यांना आकर्षित करू शकली आहे, अशांचे ही काही डावे पक्ष आहेत. मार्क्स, लेनिन, माओ त्से तुंग या क्रांतिकारी द्रष्ट्यांच्या वैचारिकतेतून अशा सर्वच डाव्या पक्षांची मानसिक घडण झालेली आहे! पण भारतीय परिस्थितीत मार्क्स, लेनिन व माओ यांना का व कशा पद्धतीने पुरस्कृत करायचे याबाबत या सर्वांच्या वेगवेगळ्या धारणा आहेत. अर्थात, यात भिन्नता दिसून येते पण, संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करण्याच्या प्रश्नावर मात्र या सर्वात नुसतीच भिन्नता नाही, तर मतभेदही आहेत. व ते वेगवेगळ्या प्रसंगांतून प्रस्तुत होत असतात. कधी कधी या प्रस्तुतीतून हिंसक वळणही घेतले जाते! यांच्या मतभिन्नता उग्र रूप धारण करणाऱ्या म्हणूनच एकामेकांपासून वितुष्टाच्या वेगवेगळ्या वळणावर नेऊन ठेवणाऱ्या होतात. रशियाचा बोल्शेविझम् चीनच्या लाल क्रांतीच्या आधीचा आहे व त्याला जागतिक परिमाण मिळालेलेच आहे. तरीही चीनची लाल क्रांती ही माओच्या प्रतिभाशक्तीतून निपजलेली बोल्शेविक क्रांतीचा विकास-विस्तार करणारीच मानली जाते. असे असून देखील रशियाची बोल्शेविक क्रांती आणि चीनची लाल क्रांती या दोन्ही भिन्न संदर्भातल्या भिन्न प्रकृतीतल्याच मानल्या जातात. म्हणून, बोल्शेविझम ही जशी क्रांतीची स्वतंत्र संकल्पना आहे तशीच स्वतंत्र संकल्पना माओवादाची आहेच. १९५१ साली भारतातल्या (आंध्र) तेलंगणमध्ये बोल्शेविझमचा प्रयोग भारतातल्या बोल्शेविकांनी करून पाहिला होता, पण त्याचा विस्तार होऊ शकला नाही. पण, १९६७-६८ साली चीनच्या माओवादाचा प. बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यात नक्सलबाढी या गावात हिंसक उद्रेक घडवूनच प्रयोग केला होता, ज्यातून नक्सलवादाची निर्मिती झाली. यातूनच नक्सली-माओवादी क्रांतीची भारतीय आवृत्ती अस्तित्त्वात आली आहे. सध्या पूर्व आणि दक्षिण भारताच्या सात राज्यांतून याचा विस्तार झालेला आहे, व तो बोल्शेविझमला मागे टाकून पुढे निघून गेलेला आहे. महाराष्ट्र राज्यातही याचा गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांतून सघनपणे, तर यवतमाळ, अमरावती व मराठवाड्याच्या काही जिल्ह्यांतून तुरळक विस्तार झालेला आहे. म्हणून, महाराष्ट्राच्या डाव्या पुरोगामी चळवळीत नक्सली-माओवादाची जाणवण्याइतकी भर पडलेली असून अन्य डाव्या पक्षांचा विस्तर महाराष्ट्रात रोखून धरण्यास व त्यांचा प्रभाव सीमित करण्यस तो कारणीभूत झालेला आहे. छत्तिसगढ़ राज्यात नक्सली-माओवादाचा विस्तार होत असल्यामुळे व झाल्यामुळे, त्याला लागून असलेला गडचिरोली जिल्हा हा सर्वाधिक प्रमाणात महाराष्ट्रात चर्चेत राहू शकलेला आहे. म्हणून, महाराष्ट्रातही नक्सली माओवाद रूजतोच आहे, असेच मानले जाते. पण, महाराष्ट्राच्या नागरी अथवा शहरी भागातही नक्सली-माओवादाचा विस्तार होत असल्याचे म्हटले जाते आहे. चंद्रपूर, नागपूर, मुंबई व पुणे या नगर-महानगरांतून हे जाणवत असल्याचे म्हटले जाते व प्रसारणाच्या विविध माध्यमांतून याविषयी प्रतिपादन केले जात आहे. म्हणून महाराष्ट्रातल्या डाव्या पुरोगामी चळवळीत नक्सली-माओवादाची नवी भर पडल्यामुळे इतर डावे व नक्सली-माओवादी असे दोन भाग डाव्या पुरोगाम्यांचे झाले आहेत. यात भारतीय कम्युनिष्ट, मार्क्सवादी, लालनिशाण गट, शेतकरी-कामकरी पक्ष असे मार्क्सचा पुरस्कार करणारे डावे पुरोगामी पक्षही महाराष्ट्रात आहेतच. पण, या सर्वांसमोर एक नवे आव्हान उभे करून नक्सली-माओवाद पुढे जात असल्याचे आढळून येत असल्यामुळे, संसदीय लोकशाहीची कार्यपद्धती स्वीकारून असणारे डावे पुरोगामी पक्ष व संसदीय लोकशाहीच नाकारणारा नक्सली-माओवाद अशा एका विभेदात्मक स्वरूपात महाराष्ट्रात डावे पुरोगामी वावरताना दिसतात.

**४. मार्क्सवादी डावे पुरोगामी महाराष्ट्रात अग्रस्थानी -**

महाराष्ट्रातले समाजवादी स्वत:ला विशिष्ट संदर्भात डावे म्हणवून घेतात व ते रशियाच्या बोल्शेविक क्रांतीचे समर्थकही मानले जातात. पण ते बोल्शेविक क्रांती तसेच चीनची क्रांती अशा कोणत्याच संकल्पनेचे सक्रिय पुरस्कर्ते म्हणून अद्याप तरी स्वत:ची ओळख निर्माण करू शकलेले नाहीत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सर्व डाव्या पक्षांना एकत्रित ठेवण्याचा पुरुषार्थ समाजवाद्यांनी केला होता. प्रामुख्याने एसेम जोशी व अल्प प्रमाणात नानासाहेब गोरे या दोघांचे या दृष्टीने विशेष योगदान झाल्यामुळे महाराष्ट्रात समाजवादी प्रतिष्ठित होऊ शकले. स्वातंत्र्याच्या चळवळीत समाजवाद्यांनी महत्त्वाची भूमिका वठवलेली होती. म्हणून, त्यांना स्वातंत्र्य चळवळीची उज्ज्वल पार्श्वभूमी लाभलेली आहे. पण, त्या काळी समाजवाद्यांचे नेतृत्व आचार्य नरेंद्र देव व जयप्रकाश नारायण यांच्याकडे होते. डॉ. राममनोहर लोहियादेखील यातलेच एक महत्त्वाचे नेते होते. पण जवाहरलाल नेहरू यांच्या राजकारणात, समाजवादीविषयी जी काही धारणा झालेली होती, ती काँग्रेस पक्षाला समाजवादाकडे वळवण्याचीच मानली जात होती. महात्मा गांधीनाही समाजवाद्यांविषयी आपुलकी वाटत होती, म्हणूनच काँग्रेस पक्षाला समाजवादीच पर्याय ठरतात असाच अनेकांचा कल झालेला होता! जवाहरलाल नेहरूंनी समाजवादी समाज रचनेची भूमिका स्वीकारल्यामुळे नेहरूंकडे समाजवादी आकर्षित झाले होते. पण, नेहरूंच्या विस्तीर्ण वटवृक्षाखाली समाजवादी रोपटे वाढू शकले नाही. फक्त समाजवाद्यांना काँग्रेसकडे वळवण्यातच जवाहरलाल नेहरूंना रस होता, असेच यावेळी मानले जात होते. अशोक मेहतांसारखे समाजवादी नेते जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्त्व स्वीकारून काँग्रेसच्या समाजवादाला पुष्टी देऊ शकले. स्वत: नेहरूंना वाटले होते, की जयप्रकाश नारायण यांनी भावी पंतप्रधान या नात्याने आपल्याशी व काँग्रेस पक्षाशी सख्य साधावे. पण जयप्रकाश नारायण राजकीय सत्तेचा स्वीकार करण्याच्या मानसिकतेत नव्हते. ते शेवटपर्यंत कायम क्रांतिनिष्ठच राहू शकले. या निष्ठेतूनच जमिनीच्या समान वितरणाच्या प्रश्नावर विनोबांच्या भूदान कार्याकडे ते वळले व

समाजवाद्यांनी स्वत:ला भूदान कार्यात झोकून द्यावेसेही त्यांना वाटले. पुढे त्यांनी 'भूदानमूलक ग्रामोद्योगप्रधान अहिंसात्मक क्रांती' यशस्वी करण्यासाठी स्वत:चे जीवन घोषित केले. विनोबांनीही जीवनदान घोषित केले होते. अशा तऱ्हेने समाजवादाला सत्तेच्या राजकारणातून बाहेर काढून क्रांतिकार्यात स्थिर करण्याचा प्रयत्न जयप्रकाश नारायण यांनी केला होता. पण समाजवाद्यांनी राजकारणाचा त्याग केला नाही. अर्थात, ते त्यांना शक्य झालेच नाही! फक्त जयप्रकाश नारायण यांनीच राजकारणाचा त्याग केला. डॉ. राममनोहर लोहिया यांनी समाजवादी राजकारणाला बिगर काँग्रेसवादाकडे म्हणजे 'गैरकाँग्रेसवादा'कडे नेण्याचा प्रयत्न केला. पण हे महाराष्ट्रातल्या समाजवाद्यांना रूचले नव्हते. म्हणून महाराष्ट्रातले बहुसंख्य समाजवादी डॉ. लोहियांकडे वळले नव्हते. याला फक्त मधु लिमये, आचार्य श्रीपाद केळकर, इंदुमती केळकर, सदाशिवराव बागाईतकर अशांचा अपवाद म्हणता येईल. समाजवाद्यांनी महात्मा गांधींचे सत्त्याग्रह – तत्त्वज्ञान स्वीकारले होते. म्हणून जमिनीच्या प्रश्नावर व कष्टकरी भूमिहीन शेतमजूरांच्या प्रश्नांवर सत्याग्रहाच्या प्रभावी चळवळी समाजवाद्यांनी केल्या. पण डॉ. राममनोहर लोहिया यांनी बहुजन समाजातल्या दलित-मागासांना राजकीय नेतृत्वात व सत्तास्थानांवर नेऊन बसवण्याचा यशस्वी प्रयत्न उत्तर प्रदेश व बिहारात केला, त्यात महाराष्ट्रातले समाजवादी सहभागी झाल्याचे दिसले नव्हते. महाराष्ट्रात नानासाहेब गोरे यांचा प्रजा समाजवादी पक्ष व एसेम जोशी यांचा संयुक्त समाजवादी पक्ष अशा दोन तऱ्हेचे समाजवादी डॉ लोहियांशी अंतर ठेवूनच वावरत राहिले. फक्त मधु लिमयेच डॉ. लोहियांना मानणाऱ्यांपैकी व लोहियांच्या वैचारिक बैठकीला समर्पित राहिलेल्यांपैकी होते पण, महाराष्ट्र हे लिमयांचे कार्यक्षेत्र नव्हते. उत्तरप्रदेश-बिहार हेच त्यांचे कार्यक्षेत्र झाले होते. अशा तऱ्हेने समाजवादी चळवळीला डॉ. लोहिया यांनी उत्तरेकडे जी गतिशील सत्याग्रहातून नव्या राजकीय परिवर्तनाची दीक्षा दिली होती तशी दीक्षा महाराष्ट्रातल्या समाजवादी चळवळीला मिळाली नाही. पण डाव्या पुरोगाम्यांपैकी आदिवासी क्षेत्रात विशेषत: ठाणे-उंबरगाव, नाशिक या भागात डॉ. श्यामराव परूळेकर व गोदावरीताई परूळेकर या दोघांनी आदिवासींचे प्रश्न हाताळण्यासाठी समर्पित होऊन जी लढाऊ भूमिका घेतली होती ती बोल्शेविक क्रांतीच्या संदर्भात महाराष्ट्रात महत्त्वाचीच ठरली. समाजवाद्यांनी सत्याग्रह-तत्त्वज्ञानानुसार सत्याग्रहाचे लढे त्या काळात दिले होते त्यापेक्षा जास्त तीव्र लढे मार्क्सवाद्यांनी दिल्यामुळे समाजवादी चळवळीच्या पुढे गोदावरीताई परूळेकरांची मार्क्सवादी चळवळच निघून गेली. अशा तऱ्हेने डाव्या पुरोगाम्यांमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्टांचे कष्टकरी-दलित पीडित, आदिवासीमधले लढे महत्त्वाचे ठरले. याचे मुख्य कारण असे, की मार्क्सवादी कम्युनिस्टांनी फक्त संसदीय कार्यपद्धतीवर स्वत:चे लक्ष केंद्रित केले नव्हते. वर्ग लढ्यांवरच त्यांनी सर्वाधिक लक्ष केंद्रित केले होते. समाजवादी मात्र संसदीय कार्यपद्धतीतच केंद्रित झाल्यामुळे वर्ग लढ्यापासून दूर गेले! म्हणून सत्याग्रह तत्त्वज्ञानाचा स्वीकार करूनही त्यानुसार जे कष्टकरी, दलित, आदिवासींचे प्रश्न धसास लावण्यासाठी ज्या सत्याग्रही लढ्यांना उठाव आणून देणे शक्य व्हावयाला हवे होते तेवढे मात्र समाजवाद्यांच्या वतीने शक्य झाले नाही! शेवटी समाजवादी स्वत:ला डावे म्हणवतात तरी वर्ग लढ्यांच्या संदर्भात ते स्वत:चे डावेपण म्हणावे त्या प्रमाणात सिद्ध करू शकले नाहीत. ही जी काही समाजवाद्यांच्या बाबतीत वस्तुस्थितीजन्य पोकळी निर्माण झाली, त्यातूनच मार्क्सवादी कम्युनिस्टांना पुढे जाण्यास संधी उपलब्ध झाली व तेच महाराष्ट्रात डाव्या पुरोगामी चळवळीच्या अग्रस्थानी राहू शकले, असेच शेवटी म्हणावे लागते!

**५. गुन्हेगारीकरण टाळण्यासाठी सत्याग्रही-तत्त्वज्ञान**

महाराष्ट्राच्या राजकारणातील मध्यमार्गी काँग्रेस किंवा तत्सम जे स्वत:ला महात्मा गांधींचा वारसा चालवणारे म्हणवत होते, तरी राजकीय सत्ताप्राप्तीच्या आकांक्षेतच सदासर्वकाळ गढून-बुडून राहिले व निवडणुका जिंकून बहुमत मिळवण्याच्या प्रयत्नातच त्यांची सबंध हयात गेली. म्हणून सत्तेसाठी सतत अनिष्ट तडजोडी करून, महात्मा गांधींच्या सत्याग्रही-तत्त्वज्ञानाला मान्य नसलेल्या संकुचित भाषिक-प्रादेशिक अस्मिता जपणाऱ्यांचे साहाय्य घेऊन महाराष्ट्राच्या राजकारणात स्वत:चे स्थान अबाधित ठेवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. यातून उजव्या प्रतिगामी शक्तींना महाराष्ट्राच्या राजकारणात स्थान मिळू शकले. महाराष्ट्रातला मध्यमार्गी राजकीय प्रवाह हा डाव्या पुरोगाम्यांना सहाय्यभूत ठरलाच नाही. तो उजव्या प्रतिगाम्यांनाच सहाय्यभूत ठरला आहे! अशा सर्व परिस्थितीतच डाव्या पुरोगामी प्रवाहातूनच क्रांतीची अविचल निष्ठा बाळगून असणाऱ्या नक्सली-माओवादाचा उदय महाराष्ट्रातही झालेला आहे. हा उदय संसदीय कार्यपद्धतीचा पुरस्कार करणाऱ्या व स्वत:ला लोकशाहीच्या प्रवाहात ठेवून असणाऱ्या डाव्या पुरोगाम्यांच्याही अस्ताला कारणीभूत ठरतो किंवा काय हे या पुढचा येणारा काळच ठरवील.

कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येमुळे डाव्या पुरोगामी चळवळीत ज्या तऱ्हेची खळबळ माजलेली सध्या दिसून येत आहे, ती महाराष्ट्राच्या लोकजीवनाला एका दिशेने घेऊन जाण्याची शक्यता वर्तवणारी म्हणता येऊ शकते आहे, ती दिशा अर्थातच नक्सली-माओवादी प्रवाहाशी जवळीक साधणारी असेल किंवा काय याविषयी निश्चित व स्पष्ट असे काहीही यावेळी सांगता येण्यासारखे नाही. पण निर्माण झालेली खळबळ नक्सली-माओवादाचा दुस्वास करणारी असणारही नाही, असे मात्र वाटतेच. कारण महाराष्ट्रातल्या परिवर्तनाच्याच मानल्या गेलेल्या सर्वच सनदशीर चळवळी शिथिल व निस्तेज झाल्यामुळे तरूण पिढीला आपली ऊर्जा (शक्ती) त्याच त्या परंपरागत कर्मकांडी उपक्रमांची उजळणी करण्यात स्वाभाविकपणेच वाया घालवावीशी वाटणार

नाही. म्हणून परिवर्तनाला वेग देत पुढे जाण्याच्या इच्छा व आकांक्षेतून नक्सली-माओवादाचे क्षितिज खुणावत राहिल्यास महाराष्ट्रातली तरूण पिढी त्याकडे झेप घेण्याची शक्यता नाकारता येणार नाही. याची जी लक्षणे सध्या भारतातल्या अनेक राज्यांतून दिसून येत आहेत, तशी महाराष्ट्रातही दिसून येण्याची शक्यता ही आहेच! पण नक्सली-माओवादाच्या क्षितिजाकडे झेपावण्याच्या मानसिकतेतून अत्याचारी व हिंसक दुष्प्रवृत्तीना उत्तेजन मिळत गेल्यास ज्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच नक्सली-माओवादाचे गुन्हेगारीकरण होण्याची प्रक्रिया ही गतिमान होतच राहील. ती यावेळी प्रत्यक्षात काही प्रसंगातून दिसून येत आहे. तेव्हा, नव्या क्षितिजाकडे झेपावताना गुन्हेगारीकरणाच्या जाळ्यात महाराष्ट्राची तरूण पिढी अडकून पडू नये याची काळजी मात्र स्वातंत्र्यप्रिय वृत्तीच्या सर्वांनीच घ्यायला हवी! हे अर्थातच निव्वळ नक्सली-माओवादाचा दुस्वास करूनच जे त्यांच्या विरोधाची भूमिका वठवताना दिसतात, त्यांच्याही लक्षात यायला हवे! कारण महाराष्ट्रात नक्सली-माओवादाच्या विरोधात सर्वच पातळ्यांवर एक प्रकारची विरोधी मोहीम राबवली गेली आहे व याला उद्योग-प्रतिष्ठानांच्या (कार्पोरेटस्) वतीने उत्तेजन देऊनच प्रसारणांच्या सर्वच माध्यमांना राबवून घेतले जात असावे, असेच साधार वाटते आहे. पण यामुळे नक्सली-माओवाद अधिकाधिक चेकाळात जाण्याची शक्यता आहे. कारण प्रतिकार व प्रतिशोध घेण्याच्या भूमिकेतून नक्सली-माओवादाची मोहीम निर्माण होताना दिसू लागली आहे. याची झळ महाराष्ट्राच्या लोकजीवनाला अतिशय जाचक होऊन बसण्याची शक्यता ही आहे. म्हणून नक्सली-माओवादी चळवळीचे गुन्हेगारीकरण होऊ नये याचाच सूज्ञपणे उपाय करायला हवा आहे. हा उपाय फक्त महात्मा गांधींच्या सत्याग्रह-तत्त्वज्ञानाचा सक्रिय पुरस्कार करूनच केला जाऊ शकतो. कारण लोकशाहीच्या सध्याच्या भ्रष्ट संसदीय कार्यपध्दतीतून यापुढे नक्सली-माओवादाला आळा घालण्याच्या बाबतीत आशा करण्यासारखी परिस्थिती उरलेलीच नाही. म्हणून सत्याग्रह-तत्वज्ञानाचा प्रभावी पुरस्कार करणे हा एवढा एकच उपाय शेवटी उरलेला असल्यामुळे, तो अनुसरण्याचेच नवे परिशुद्ध उपक्रम राबवावे लागतील. अर्थात, याची कार्यपद्धती निश्चित करावी ही लागेल व हे शक्य आहे.

दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या संदर्भात महाराष्ट्रातल्या परिवर्तनाच्या चळवळींची नवी दिशा प्रशस्त करण्याची गरज निर्माण झालेली आहे. यामुळे दिवंगत पानसरे यांच्या म्हणण्यानुसार महाराष्ट्राचे हरवलेले म्हणूनच प्रत्यक्षात नसलेले पुरोगामीत्त्व प्रस्थापित करायला हवे आहे.


**– बाबूराव चंदावार**
दूरध्वनी – ०२०-२४२५०६९३

**ग्रंथाली**

**डॉ. दाऊद दळवी** लिखित

## लेणी महाराष्ट्राची

या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा
इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध झाला...




**Caves Shrines of Maharashtra**


**Dr. Dawood Dalvi**

There are 1200 caves in India. Out of these 800 are in Maharashtra! Around the beginning of the Christian era Buddhists came to Maharashtra and they found the mountain ranges of the Sahyadri and its black rock suitable for carving caves. That led to the birth of a new artistic manifestation in this land.
Later, in the next 1000-1200 years, along with the Buddhists, Hindus and Jains too carved excellent varied caves all over Maharashtra.

**मूळ किंमत १५०० रु.**
**सवलतीत ९०० रु.**

दिवस ढकलत जगण्यापेक्षा

दिवस समजून जगा...




सर्व धार्मिक व पुस्तक दुकानात उपलब्ध

मराठी महिन्यांनुसार असलेली एकमेव दिनदर्शिका

कोणत्याही पुस्तकासाठी संपर्क 'साधा'

प्रमुख विक्रेते : रसिक साहित्य प्रा.लि. अप्पा बळवंत चौक, पुणे २.

☎ : ०२०२४४५११२९

ONLINE PURCHASE : www.erasik.com


# पानसरेअण्णांना लाल सलाम

## सुरेश अ. खोपडे

> दुसरा असाच उच्च इच्छाशक्ती असलेला गोविंद पानसरे नावाचा माणूस धमक्यांना न जुमानता पुढे चालतच राहिला. त्या अगोदर नरेंद्र नावाचा डॉक्टर, त्या अगोदर शेट्टी नावाचा तरुण... अशी खूप मोठी यादी. 'आयुष्य ही लहान मेणबत्ती नसून एक मोठी मशाल आहे. नव्या पिढीच्या हातात सोपवण्याअगोदर प्रत्येकाने ती पूर्ण शक्तीने प्रकाशमान केली पाहिजे या सुभाषितातील संदेश या माणसांनी आपल्यासमोर ठेवलेला आहे. आपल्या आयुष्याच्या मशाली पूर्ण क्षमतेने प्रकाशमान झालेल्या आहेत का? नसल्यास त्या तशा करता येतील का? आणि दाटत चाललेल्या अंधाराशी मुकाबला करण्यासाठी भोवताली जळणाऱ्या मशालींचा ठेवा आपण कितपत व कसा सुरक्षित ठेवणार आहोत? हे व यासारखे व्यवस्थेबद्दलचे अनेक प्रश्न या घटनेने उपस्थित केलेले दिसतात.

आता नक्कीच वाचणार असे वाटत असतानाच पानसरेआण्णा गेले. तीन गोळ्या घुसल्यानंतरही ब्याऐंशी वर्षांचा हा पहाडी व्यक्तिमत्त्वाचा मानव उठून बसलेला पाहून रस्त्यावर पडलेल्या काडतुसाच्या पुगंळ्याही शरमल्या असतील. कॉम्रेड पानसरेंची हत्या थांबवता आली नाही हा पोलिसांचा दोष नाही अशा आशयाचे मुख्यमंत्र्यांनी केलेले विधान वाचनात आले. पोलीस हत्या थांबवू शकत नाहीत हे एकवेळ मान्य केले तरी कॉम्रेड पानसरे, डॉ. दाभोळकर व इतर सर्व उघडकीस न आलेल्या खुनांतील आरोपींना जेरबंद करण्याची सर्वस्वी जबाबदारी महाराष्ट्र पोलिसांची आहे. ज्या व्यवस्थेला ते दोष देतात ती परमेश्वर अगर निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. ती समाजाला पूरक बनवण्यासाठी स्टेटची निर्मिती केलेली आहे. ज्या व्यवस्थेने त्यांना व त्यांच्या पक्षाला सत्ता दिली आहे तीच व्यवस्था हुतात्म्यांना न्याय देण्यास असमर्थ का ठरते याचाही शोध घेऊन ती मुख्यमंत्र्यांना सुधरावी लागणार यात दुमत नाही. ९९ टक्के खुनांचे धागेदोरे पहिल्या दोन तासांतच पोलिसांच्या हाती लागतात. एक माणूस दुसऱ्या माणसाचा सूडभावनेने जीव घेतो त्यामागे ढोबळपणे मालमत्ता, बाई, बाटली, आकस्मित संघर्ष, पूर्ववैमनस्य अशी कारणे असतात. तपासअधिकारी प्रत्येक मुद्यावर शोध घेत, एकेक मुद्दा मागे टाकत ठरावीक मुद्यांवर तपास केंद्रीत करतो. अशा गुन्ह्यांना प्रतिबंध करून शोध घेण्यासाठी पोलीस महासंचालकांच्या दिमतीस अनेक पोलीस युनिटं आहेत. राजकीय हालचाली असंघटित कष्टकऱ्यांच्या चळवळी, टोलला विरोध, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, हिन्दू-मुस्लीम संघर्षावरील विचारधारा, अल्पसंख्याक व बहुसख्याक नथुराम गोडसे प्रवृत्ती अशा विषयांवर पानसरेअण्णा काम करत होते. या प्रश्नांवरील वैचारिक वैमनस्यातून सूडाची भावना निर्माण होऊ शकते. अशा हालचालींची सर्व विषयावरील खडान् खडा माहिती गोळा करून ती लेखी स्वरूपात जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयाला पाठवण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये कमीत कमी दोन साध्या वेशातील खास पोलीस नेमलेले असतात. जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयात पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली जिल्हा विशेष शाखा जिल्ह्यातील अशा सर्व विषयांवरील घटनांची माहिती जमा करून, विश्लेषण करून संभाव्य घटनांचे भाकीत करून राज्य पोलीस मुख्यालयाला अहवाल पाठवते. सबसीडिअरी इन्टेलिजीन्स डिपार्टमेन्ट ही तिसरी संस्था अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नियत्रंणाखाली प्रत्येक राजकीय, सामाजिक, कामगार, जातीय सुरक्षितता, नक्षलवाद अशा विषयांवरील हालचालींची माहिती जमा करते. या युनिटचे अधिकारी प्रत्येक जिल्ह्यात असून स्वंतत्रपणे आपली गुप्त माहिती गृहविभागाला पाठवतात. या तिन्ही विभागांतील अधिकारी स्वतः बैठकांना हजर राहून खास खबरे, सोर्सेस, वर्तमानपत्रातील कात्रणे यामार्फत माहिती काढून आपल्या अभिप्रायासह अहवाल तयार करतात. त्यासाठी सिक्रेट सर्व्हिस फंडातून मोठी रक्कम खर्च केली जाते. राज्य गुन्हे अन्वेषण विभाग हे चौथे युनिट अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नियत्रंणाखाली गुन्हेगारांच्या गुप्त हालचालींवर नजर ठेवून माहिती जिल्हा पोलिसांना कळवते. तसेच गुन्हेगारीच्या वेगवेगळ्या कार्यपद्धतीबद्दल संशोधन करण्यासाठी एक स्वतंत्र विभाग त्यामध्ये कार्यरत आहे. महाराष्ट्रातील सर्व गुन्हेगारांची अद्ययावत माहिती इथे एकत्र केली जाते व देशातील सर्व प्रकारच्या गुन्हेगारांची माहिती कम्प्युटरद्वारे काही मिनिटांत

उपलब्ध होते. एका खास मोहिमेनुसार महाराष्ट्रातील सर्व पोलीस स्टेशन कम्प्युटरद्वारे जोडल्याने भारतात सर्व गुन्हेगारांची माहिती क्षणार्धात उपलबध होते. तुरुंग या पाचव्या युनिटचे प्रमुख अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी असून राज्यातील सर्व तुरुंग यांच्या नियंत्रणात असतात. प्रत्येक जेल म्हणजे गुन्हेगारीच्या गुप्त माहितीचे आगार. गुडकॉप-बॅडकॉप या तपास पद्धतीनुसार एक बिडी किंवा सिगारेटच्या मोबदल्यात हवी ती माहिती मिळवता येते. नाशिक येथील डिटेक्टिव्ह ट्रेनिंग स्कूलमध्ये गुन्हेगारी तपासाचे प्रशिक्षण दिले जाते. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांच्या देखरेखीखाली सेंटर फॉर पोलीस रिसर्च, पुणे ही सातवी संस्था गुन्हेगारी व इतर विषयांवर संशोधन व प्रशिक्षण करत असते. अतिरिक्त पोलीस महासंचालक कायदा व सुव्यवस्था या आठव्या युनिटतर्फे राज्यभरातून सर्व माहिती गोळा करून गृहखात्याकडे पाठवली जाते. गुन्हेगारांच्या कार्यपद्धतीवर संशोधन करून तपासी अंमलदारांना मार्गदर्शन करणारी मोडस ऑपरेंडी ब्युरो ही नववी संस्था तेवढीच महत्त्वाची आहे. वर्षातून किमान दोनदा राज्यातील सर्व युनीट प्रमुखांची बैठक मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होते. त्यात घडलेल्या सर्व व संभाव्य घटनांबाबत चर्चा होते. शिवाय एसआयडी प्रमुख म्हणजे गुप्तवार्ता आयुक्त हे दररोज सकाळी मुख्यमंत्र्यांना राज्यातील हालचालींची माहिती देत असतात. पिस्तुलाचा ट्रिगर ओढणारी बोटे सामान्यांनाच काय पण पोलिसांनाही ओळखता आलेली नाहीत. पण ट्रिगर ओढणाऱ्या बोटामागील मेंदूबद्दल सामान्य कार्यकर्ता उघडउघड बोलत असतो. त्याबद्दल वर नमूद केलेल्या नऊ महत्त्वाच्या संस्थावर नियंत्रण करणाऱ्या पोलीस महासचांलकांची भूमिका काय?



नेहमीच्या पद्धतीने चोरीचा माल व चोर जनतेने हजर करण्याची अपेक्षा पोलीस महासंचालकांनी धरू नये व तपासही सीबीआयकडे देऊ नये. तपास करणाऱ्या सीबीआय अधिकाऱ्याला प्रत्येकवेळी दिल्लीतील सीबीआय डायरेक्टरच्या सल्ल्याशिवाय काम करता येत नाही. महाराष्ट्रातील समाजकारण, राजकारण, वैचारिक लढे यांची गंधवार्ता त्यांना नसते. परराज्यातून आलेला एक सीबीआय इन्स्पेक्टर व त्याचे तीन साथीदार यांच्यापेक्षा महाराष्ट्राचा पोलीस महासंचालक दुबळा कसा असू शकतो? खुनाच्या मागील डोक्याची व्यक्तिगत नावे नव्हे पण त्यांचे वर्णन, ठिकाण व हेतू अप्रत्यक्षपणे कोल्हापूरमधील राजारामपुरी पोलीस स्टेशन ते अतिरिक्त मुख्य सचिव, गृह, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयात लाल फडक्यात बांधून ठेवलेला अहवाल, वर्तमानपत्र कात्रणे, भाषणे, सोर्स रिपोर्ट यामध्ये आहे. या सगळ्या दस्तऐवजांचे विश्लेषण पृथक्करण करून खऱ्या आरोपीपर्यंत नक्कीच पोचता येईल. ते काम एकटे पोलीस महासंचालक तपासी अंमलदार या भूमिकेतून करू शकतील.

पानसरेअण्णांच्या खुनाचा तपास कोल्हापूर पोलिसांकडे दिल्याचे दिसते. तपासासाठी ते सर्वत्र जाऊ शकत असले तरी त्यांचा प्रशासकीय प्रभाव जिल्ह्याबाहेर पडू शकत नाही. गुन्ह्याचा हेतू वैचारिक मतभेदातून सूडभावनेने झालेला असल्यास गुन्ह्याचा भौगोलिक विस्तार फार मोठा असू शकतो.

शासनाने आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कितीही सारवासारव केली तरी राज्यातील जिल्हा युनिट प्रमुखांमध्ये एकोप्याची भावना नसते. युनिट प्रमुखाची नेमणूक करताना खूप रस्सीखेच आणि खात्याअतर्गत राजकारण चालते. त्याच्यामध्ये कोण कुठल्या प्रांतीय लॉबीचा, जातीचा, राजकीय गटाचा याचा विचार झालेला असतो. डायरेक्ट आयपीएस, प्रमोशनने आयपीएस बनलेले स्टेट केडरचे अधिकारी अशा बाबी विचारात घेतल्या जातात. पोस्टिंग मिळवण्यामध्ये अपयशी ठरलेली लॉबी दुसऱ्या यशस्वी झालेल्या लॉबीतील अधिकाऱ्यांचा दुस्वास करते. असा पोस्टिंग मिळवण्यात यशस्वी झालेला अधिकारी जास्त अडचणीत आला, बदनाम झाला की बऱ्याच वेळा नाराज गट खूष होत असतात. त्यामुळे एक जिल्हा युनिट प्रमुख प्रामाणिकपणे आणि पूर्ण क्षमतेने दुसऱ्या युनिट प्रमुखास मदत करेल याची शाश्वती नसते. अशा महत्त्वाच्या गुन्ह्यांचा तपास लावण्यासाठी आधी नमूद केलेल्या नऊ शाखांना कामाला लावू शकणारी एकमेव ऑथोरिटी म्हणजे महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक. कारण या शाखांच्या प्रमुखांचे वार्षिक गोपनीय अहवाल, जे त्यांच्या करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असतात, त्यावर ते प्रभाव पाडू शकतात. तसेच, पोलीस कार्यपद्धतीचे तंत्रज्ञान व कौशल्य त्यांना माहीत असल्याने ते या शाखाप्रमुखांना कामाला लावू शकतील.

त्यासाठी पानसरेअण्णांच्या गुन्ह्याचा तपास आता करतात तेच कोल्हापूरचे अधिकारी करतील, परंतु त्याचे प्रत्यक्ष सुपरव्हिजन

पोलीस महासंचालक यांच्याकडे सोपवले गेले तर पोलीस महासंचालकांना 'पुट फस्ट थिंग फस्ट' या नियमानुसार दररोज प्राधान्याने या केसचा आढावा घेण्याशिवाय पर्याय राहणार नाही. कुणीही शेजा–याच्या बेबीचा वाढदिवस साजरा करत नाही. त्या पद्धतीने पानसरेअण्णांची केस ही पोलीस अधिक्षक कोल्हापूर यांची बेबी न राहता पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांची बेबी ठरली पाहिजे. पोलीस महासंचालकांना अकाउंटेबल ठरवले की जनता, लोकप्रतिनिधी त्यांना जाब विचारतील. पानसरेअण्णांची केस ही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या व्यक्तिगत प्रतिष्ठेचा आणि आत्मसन्मानाचा प्रश्न ठरेल. आणि मग आत्मसन्मान जपण्यासाठी तरी पोलीस महासंचालक महाराष्ट्रातील अडीचशेपेक्षा जास्त आयपीएस अधिकारी, इतर १६००० अधिकारी आणि २००००० पोलीस कर्मचारी, तसेच सीबीआय, आयबी, एनआयए यांसारख्या सेन्ट्रल एजन्सी यांचा आवश्यकतेनुसार वापर करून घेऊ शकतात. पोलीस महासंचालक हे आयपीएस या प्रतिष्ठित सनदी सेवेचे नेते असल्याने, इतर सर्व आयपीएस अधिकारी व्यक्तींसाठी नव्हे तर आयपीएस सेवेच्या प्रतिष्ठेसाठी आपले गटतट विसरून, संघभावना निर्माण करून प्रयत्नांची पराकष्ठा करतील. जिल्हा घटक प्रमुख व सर्व पोलीस आयुक्तांच्या बदलीचे अधिकार गृहमंत्री व मुख्यमंत्री यांच्याकडे असले तरी निव्वळ बदलीची भीती दाखवून जिल्हा घटक प्रमुख काम करू शकणार नाहीत, तसेच योग्य आणि अचूक मार्गदर्शन करून योग्य काम करून घेण्यामध्ये त्यांना मर्यादा पडतात. कायदा–सुव्यवस्था परिस्थिती ढासळली. महत्त्वाच्या गुन्ह्यांचा तपास लागला नाही की गृहमंत्री–मुख्यमंत्री यांच्या राजीनाम्याची मागणी होते तशी ती पोलीस महासंचालकांची होत नाही. महासंचालक आपल्या अधिकाराबद्दल आग्रही असतात, पण जबाबदारी घ्यायला पुढे येत नाहीत. कितीही गंभीर घटना घडल्या तरी नोकरशहांची पगारवाढ, बढती, पेन्शन यावर काहीही परिणाम होत नाही. सीबीआयच्या तपासअधिका–यापेक्षा पोलीस महासंचालक खूप प्रभावी व अधिकारयुक्त असतात आणि त्यांच्याकडे कोणत्याही सीबीआय अधिका–याइतकी किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तिगत क्षमता आहे. पोलीस प्रशासन प्रभावी आणि परिणामकारक बनवण्याचे सुकाणू ज्या पोलीस महासंचालकांच्या हातात असते त्या पोलीस महासंचालकांवर पानसरेअण्णांच्या गुन्ह्याच्या व्यक्तिगत देखरेखीची जबाबदारी टाकली तरच खऱ्या अर्थाने महाराष्ट्र पोलीस दल खुनाचा तपास करत आहे असे दिसेल. भारतात पोलीसदलाची स्थापना करणारे इग्रंज लोक तराजू घेऊन व नंतर अधिकार गाजवण्यासाठी आले होते. त्यामुळे त्यांच्या खजिन्यांची लूट व क्रांतिकारकांकडून होणारे हल्ले थांबवण्यासाठी पोलीसदल तयार केले. त्यांना इथल्या 'नाही रे', अंधश्रद्धा, जातीय विषमतेतून शोषल्या जाणाऱ्याच्या प्रतिष्ठा–आत्मसन्मानाशी काही एक देणेघेणे नव्हते. त्यामुळे फक्त मालमत्तेचे गुन्हे महत्त्वाचे होते. तोच हेतू पोलीसदलात तसाच आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील समाजाचे प्रश्न हाताळण्याचा दृष्टिकोन दुर्दैवाने रुजवला गेला नाही. एखाद्या फुरफुरणाऱ्या अरबी घोड्यासारखी महाराष्ट्र पोलीसदलात प्रचंड क्षमता आहे. त्याच्यावर मांड मारून हवी ती शर्यत जिंकण्यासाठी पक्की मांड असलेल्या जॉकीची गरज आहे. टांगेवाल्याचे हे काम नव्हे. आता जर कॉम्रेड पानसरेंच्या खुनातील आरोपी पकडले गेले नाही तर त्याचे सामाजिक सुरक्षिततेवर गंभीर परिणाम. होतील याची जाणीव शासनव्यवस्थेला एव्हाना झालीच असेल.

# आबांना सॅल्युट

आबा गेले. घरातील माणूस गेला. २००३ साली मी 'पोलीस प्रशासनाची नवी दिशा' हे संशोधनात्मक पुस्तक प्रकाशित करून वरिष्ठ नोकरशहा हा देशाच्या प्रगतीतील पहिला मोठा अडथळा आहे हे समप्रमाण दाखवून दिले होते. नाराज झालेल्या आयपीएस लॉबीने आयपीएस असोसिएशनमधून बहिष्कृत करून, पोलीस शिपायांसाठी अकोला जिल्ह्यात सुरू केलेल्या पोलीस वेल्फेअर प्रयोगाबद्दल माझी लाचलुचपत विभागामार्फत उघड चौकशी करावी असा अहवाल गृहविभागाकडे पाठवला होता. येत्या काही दिवसांत खोपडेंना जेलमध्ये टाकतो अशी गर्जना लाचलुचपत विभागातील अती वरिष्ठ अधिकाऱ्याने केली होती. ह्यापण पुढे तोच अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली जेलमध्ये गेला हा भाग वेगळा होम डिपार्टमेन्टमधील कनिष्ठ कारकुनापासून मुख्यमंत्रीपर्यंत सर्वांना भेटून माझी बाजू मांडू लागलो. पहिल्या भेटीतच आबांनी सल्ला दिला, की खोपडे राजीनामा परत घ्या. पोलीस व्यवस्थेला वैतागून मी राजीनामा दिला होता हे खरे आहे. पत्नीच्या वैद्यकीय इलाजासाठी मी मुबंई मागितले. आश्चर्य म्हणजे तशी बदली झालीही. मलाच नव्हे तर अडगळीत फेकल्या गेलेल्या सर्वच अधिकाऱ्यांना योग्य त्या नेमणुका दिल्या. त्यापूर्वी, पाच महिन्यांत अकोल्याहून आकसाने बदली करणाऱ्या गृहमंत्र्यांच्या दारात पाच तास बसून होतो, पण साधी भेटही मिळाली नव्हती. पण इथे मात्र विचारणा करून योग्यतेनुसार नेमणुका देण्यास सुरवात झाली. जातपात, जवळचे–लाबंचे, लॉबिंग करणे व प्रसंगी लिलाव करणे या गोष्टींना शह देत आबांनी पोलीसदलात मेरिटवर सरकारी नोकरांना तोलण्याचा एक आदर्श मापदंड सुरू केला. भ्रष्टाचार विरहित व वशिलेबाजीला फाटा देत हजारो शिपायांची भरती करता येते हा आदर्श आबांनी देशापुढे मांडला. अशक्यप्राय वाटणारे गावठी दारू व मटका धंदे बंद केले. पगारवाढ, कुटुंब आरोग्ययोजना, घरे यासारख्या सुविधा देणारे देशातील अग्रगण्य पोलीसदल बनवले.

पोलिसांच्या संख्यावाढीबरोबरच कम्युनिटी पोलिसिंगची आवश्यकता आहे या माझ्या सुचनेनंतर आबांच्या शासकीय निवासस्थानी मी भिवंडी मोहल्ला कमिटीवर सादरीकरण केले. त्यावर आधारित तंटामुक्त गाव योजना मसुदा मी बनवून दिला. तंटामुक्त गाव योजनेवर गावातील इसमाऐवजी पोलीस कर्मचारी अध्यक्ष



नेमावा या माझ्या सूचनेवर आमच्यात मतभेद झाले. नोकरीत राहून पोलीस व्यवस्थेचे दोष मी जाहीरपणे दाखवू लागलो. त्यानंतरसुद्धा पुढे मला विचारून माझ्या पसंतीची नेमणुक दिली. तात्पर्य, या माणसाला आकस, खुनशीपणा शेवटपर्यंत शिवला नाही. राजकारणी या भूमिकेत  या माणसाने अनेक राजकीय विचारवंत खोटे ठरवलेले आम्ही पाहिले आहे. 'माणसाला भ्रष्ट करण्याकडे सत्तेचा कल असतो आणि पूर्ण सत्ता माणसाला पूर्ण भ्रष्ट करते.' असे ठामपणे प्रतिपादन करणाऱ्या लॉर्ड ॲक्टान या विचारवंताला आबांनी खोटा ठरवला. जगभरातील राजकारण्यांचा गुरू निकोलॉव मॅकिव्हेलीने 'द प्रिन्स' या आपल्या पुस्तकात राजपुत्रांनी राज्य कसे मिळवावे व ते कसे टिकवावे याबद्दल १६ व्या शतकात दिलेला सल्ला आजही आधुनिक राजपुत्र म्हणजे राजकारणी व सनदी अधिकारी तंतोतंत पाळताना आढळतात. 'राजपुत्रांनो, तुम्हाला सत्ता हवी असेल तर तुमच्यात सर्व मानवी सद्‌गुण असायला पाहिजेत, पण एका माणसात सर्व सद्‌गुण असणे शक्य नाही हे खरे असले तरी काळजी करू नका. तुमच्यामध्ये सद्‌गुण नसतील तरी ते आहेत असे ढोंग करा. पण हो, तुमच्यात सर्व सद्‌गुण असले तरी तुम्हाला राज्य मिळवता येणार नाही. त्यासाठी तुम्हाला काही प्राण्यांचे गुणही अंगी बाळगावे लागतील. तुमच्या विरोधकांचा काटा काढण्यासाठी तुम्हाला सिंहासारखे क्रूर बनावे लागेल. तेही पुरेसे नाही कारण सिंहाला आपल्या विरोधकांनी लावलेले सापळे ओळखता येत नाहीत म्हणून तुम्ही कोल्ह्यासारखे धूर्त बना.' यातले काही एक न करता, अंजनी गावातला शेतकऱ्याचा पोरगा राजसत्तेच्या शिखरावर चढला आणि राहिला. मॅकिव्हेलियन वे ऑफ पॉलिटिक्सला खोटे ठरवत आबांनी साध्याइतकेच साधनेही पवित्र असली पाहिजेत या गांधीयन मार्गाची दिशा अधोरेखित केली. आर.आर.पाटलांइतका योग्य, लायक, परिपूर्ण राजकारणी माणूस असूच शकत नाही व गृहमंत्रीपदाला मिळूच शकत नाही. मात्र असा माणूस नंतरच्या काळात काहींच्या दृष्टीने अप्रभावी ठरून जीवघेण्या व्यसनाचा बळी का ठरावा याचा शोध घेणे तितकेच महत्त्वाचे ठरेल. गृहमंत्री हे पद स्वीकारल्यावर आबांनी प्रभावी व परिणामकारक प्रशासनाला सुरुवात केली. योग्य नोकरशहा योग्य जागी नेमण्यास सुरुवात केल्याने प्रशासन व जनतेत प्रचंड उत्साह निर्माण झाला, पण अनेकांना तो जाचक ठरू लागला. कॅपिनेट मंत्री सर्वेसर्वा असतो व त्यांच्या मर्जीने नोकरशहा चालतात असा सार्वत्रिक गैरसमज आहे. मंत्रीच्या खिशात काही सनदी अधिकारी असतात हे जितके खरे आहे तेवढेच अनेक सनदी अधिकाऱ्यांच्या खिशात अनेक मंत्री असतात. सरकार कोणतेही असो, असे अधिकारी हवे ते शहर व पद मिळवतात. खोटी नाणी खऱ्या नाण्यांना चलनातून अदृश्य करतात या सिद्धांतानुसार अनेक नको त्या अधिकाऱ्यांनी आबांच्या नाकावर टिच्चून महत्त्वाच्या नेमणुका पटकावल्या. आघाडी सरकार व पक्षीय गटबाजीचा फायदा घेत साधा पोलीस इन्स्पेक्टर आबांना नामोहरम करू लागला. काहींनी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रिब्युनल अगर कोर्टाची मदत घेतली. जबाबदारीऐवजी बदलीचे अधिकार स्वतःकडे घेण्यासाठी पोलीस महासचांलक लॉबिंग करू लागले. नाराज लोकांची फळी व पक्षातील काही लोक यामुळे आबा एकाकी पडले. गृहखात्याचा गाडा प्रभावी व परिणामकारकपणे चालावा म्हणून जनता, प्रसारमाध्यमे, राज्यकर्ते व विरोधी पक्ष हे आबांकडे बोट दाखवत राहिले. सेक्रेटरी मंत्र्यांना जुमानत नाहीत, 'प्रत्येक गोष्टीला मीच कसा जबाबदार' असे उदगार आबा काढत पण त्याची दखल घेताना कुणी दिसत नव्हते. ते खरे आहे. गाडीचा नुसता ड्रायव्हर परिपूर्ण असून उपयोग नाही. गाडीचा ढाचादेखील अद्ययावत पाहिजे. ज्या पोलीसव्यवस्थेचे ध्येय, रचना, व्यूहरचना, कार्यपद्धती दिशाहीन आहे, जनसहभागाला थारा नसून नोकरशहा व राजकारणी आपल्या व्यक्तिगत स्वार्थासाठी हस्तक्षेप करतात ती कालबाह्य पोलीसव्यवस्था आबांसारख्या एकाच माणसाने भरधाव पळवावी ही अपेक्षा धरून त्यांच्यावर आपण फार अन्याय केला असे मला वाटते. बोधकथेतील लोभी माणसाने सोन्याचे अंडे देणाऱ्या कोंबडीची अवस्था केली तशी तर आबांची अवस्था झाली नाही ना?

उपयोग होत असता डोक्यावर घेणारी व कमी झाल्यावर दोष देणारी 'युटिलिटीरियानिझम' म्हणजेच उपयुक्ततावादावर भर देणारी भोवतालची सामाजिक संस्कृती पाहून आबा नक्कीच खिन्न झाले असतील.

छोट्या डबक्याऐवजी महापुरात उडी घेणाऱ्या व उच्च दर्जाची इच्छाशक्ती असलेल्या आबांसारख्या  समंजस माणसाने तंबाखू का सोडला नाही असा प्रश्न उपस्थित होतो. शेतकऱ्यांची पोरे न

सांगता विटीदांडू शिकतात तशीच तंबाखू खायलाही. कोणत्याही व्यसनापेक्षा तंबाखू सोडणे हे महाकठीण काम आहे सिद्ध झालेले आहे. तोंडात टाकल्याबरोबर सातव्या सेकंदाला त्यातील निकोटिन हे द्रव्य रक्तातून मेंदूपर्यंत पोचते. मेंदूत अनेक हार्मोन उद्दीपित झाल्याने तात्काळ उत्साही व शांत वाटते. तणाव कमी होतो. बुद्धी तल्लख होऊन एकाग्रता वाढते. उद्‌भवलेल्या परिस्थितीला पाहून पळून जायचे की सामना करायचा यासाठी प्रेरणा तयार करणारे हार्मोन उद्दीपित होते. आबांना शेवटपर्यंत साथ देण्याची क्षमता त्यामुळेच एकट्या तंबाखूत होती. दोन तासांत रक्तातील निकोटिन संपून जाते, मग पुन्हा बार भरावा लागतो. पण त्याच तंबाखूत ७० पेक्षा जास्त विषारी रसायने असतात. निकोटिनमुळे शरीरात अंजीओजेनेसिसह्या र्नेग्एिन्एस्स्हि प्रक्रिया सुरू होते. मूळ रक्तवाहिन्यांभोवती नवीन रक्तवाहिन्या निर्माण होऊ लागतात. रक्तवाहिन्यांच्या भिंती जाड बनायला लागतात. पेशींची वाढ अमर्याद होऊ लागते. ट्युमर वाढू लागते. तोच तो आबांना अकाली घेऊन गेलेला जीवघेणा कॅन्सर.


दुसरा असाच उच्च इच्छाशक्ती असलेला गोविंद पानसरे नावाचा माणूस धमक्यांना न जुमानता पुढे चालतच राहिला. त्या अगोदर नरेंद्र नावाचा डॉक्टर, त्या अगोदर शेट्टी नावाचा तरुण... अशी खूप मोठी यादी. ‘आयुष्य ही लहान मेणबत्ती नसून एक मोठी मशाल आहे. नव्या पिढीच्या हातात सोपवण्याअगोदर प्रत्येकाने ती पूर्ण शक्तीने प्रकाशमान केली पाहिजे या सुभाषितातील संदेश या माणसांनी आपल्यासमोर ठेवलेला आहे. आपल्या आयुष्याच्या मशाली पूर्ण क्षमतेने प्रकाशमान झालेल्या आहेत का? नसल्यास त्या तशा करता येतील का? आणि दाटत चाललेल्या अंधाराशी मुकाबला करण्यासाठी भोवताली जळणाऱ्या मशालींचा ठेवा आपण कितपत व कसा सुरक्षित ठेवणार आहोत? हे व यासारखे व्यवस्थेबद्दलचे अनेक प्रश्न या घटनेने उपस्थित केलेले दिसतात.

**– सुरेश अ. खोपडे**
(आयपीएस रिटायर्ड)
भ्रमणध्वनी : ७७४५००९९००
khopade.suresh@gmail.com

ग्रंथाली

# मादाम क्युरी

अनुवाद : अश्विनी भिडे-देशपांडे




**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**

पोलंड रशियन त्झारच्या जुलमी राजवटीखाली होता, त्या काळात पोलिश जनतेला मातृभाषेत बोलायचीही मोकळीक नव्हती, शालेय शिक्षण सक्तीनं रशियन भाषेत घ्यावं लागे, देवाची प्रार्थनादेखील परक्या रशियन भाषेतच म्हणावी लागे, अशा काळात, वॉर्सामधल्या एका शाळाशिक्षकाच्या घरी मारिया ऊर्फ मान्या या तेजस्वी मुलीनं जन्म घेतला. हुशार, तल्लख मान्या शालांत परीक्षेत पहिली आली, पण ज्ञानार्जनाच्या ध्यासानं झपाटलेल्या ह्या मुलीच्या पुढील शैक्षणिक वाटेवर अंधारच होता, कारण पोलंडमध्ये विद्यापीठात मुलींना प्रवेशच नव्हता! अशा परिस्थितीत, शाळेतून नुकतीच बाहेर पडलेली ही तडफदार मुलगी मोठ्या बहिणीला डॉक्टर बनण्यासाठी फ्रान्सला जाण्यास प्रेरित करते; परक्या घरी गव्हर्नेसची नोकरी करून बहिणीला उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत पुरवते; आणि पुढे बहिणीच्या आधारानं स्वतःच्या शिक्षणासाठी दूरदेशी फ्रान्सला प्रयाण करते. हलाखीच्या परिस्थितीत अत्यंत काटकसरीनं राहून, अपार परिश्रम करून आपल्या ध्येयाकडे वाटचाल करते.

वडिलांनी मुलांवर केलेले मूल्यवान संस्कार, भावंडांचे घट्ट प्रेमबंध, देशप्रेमाची प्रखर प्रेरणा, आणि पिएर-मारी, (नवरा-बायको आणि एकमेकांचे कार्यालयीन सहकारीदेखील) यांची परस्परपूरक व्यक्तिमत्त्वं, यांचा परामर्श घेणं आजच्या बदलत्या मूल्यांच्या काळात फार गरजेचं वाटतं.

कितीही मोठं आकर्षण समोर उभं राहिलं तरी क्युरी दांपत्यानं आपल्या मूल्यांवरची निष्ठा ढळू दिली नाही. श्रीमंती आणि काबाडकष्ट हे टोकाचे पर्याय नजरेसमोर स्पष्ट असूनही, आपल्या शास्त्रीय शोधाचं ‘पेटंट’ या दोघांनी घेतलं नाही. पतीसह नोबेल पारितोषिकाची मानकरी झाल्यावर जीवनाच्या समर्थ जोडीदाराला काळानं निर्घृणपणे ओढून नेलं. त्यानंतर ही एकाकी विधवा स्त्री आपल्या कुटुंबाला कसं सावरते, पतीबरोबरचं काम त्याच्या माघारी कसं पुढे नेते, त्यासाठी तिला कोणकोणती अग्निदिव्यं करावी लागतात त्याचा हा आलेख. ‘मान्या’पासून सुप्रसिद्ध मादाम क्युरीपर्यंतच्या खडतर जीवनप्रवासाचा तिच्या मुलीनं रेखाटलेला हा परामर्श वाचणं एखाद्या परीकथेइतकं रंजक आहे, कवितेइतकं तरल आहे.

# नाईट लाइफ नको....लाइफ हवंय

**मनीषा नित्सुरे-जोशी**

शिवसेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे यांनी नाईट लाइफचा प्रस्ताव मांडला आणि एका नव्या वादाला तोंड फुटले. मुंबई तशीही रात्रभर सुरूच असते मग वेगळ्या नाईट लाइफची गरज काय इथपासून, पुढे या निर्णयाचे काय आणि कसे परिणाम होऊ शकतील इथपर्यंत अनेक विषयांचा ऊहापोह करण्यात आला. मुंबईला नाईट लाइफ नवे नाही पण राजकीय पटलावर हा विषय मांडला गेल्याने अनेकांनी त्या वादात आपणहून उडी घेतली आणि या विषयाचे पोट भरेस्तवर राजकारण केले. मग कुणी विरोध करायचा म्हणून तर कुणी त्यांच्या विरोधाला विरोध म्हणून या विषयावर बोलू लागले. राज्य सरकारनेही त्या दृष्टीने काही पाऊले उचलण्याची तयारी सुरू केली होती. दरम्यानच्या काळात घडलेल्या काही प्रिय-अप्रिय घटनांच्या गर्दीत हा विषय जरासा मागे पडला होता. पण नुकतेच मुंबई उच्च न्यायालयाने याच विषयावरून राज्य सरकारला चार खडे बोल सुनावल्याने तो पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. या विषयाचा खरेच विचार करायचा झाला तर तो केवळ शिवसेनेच्या बाजूने किंवा मग शिवसेनेच्या विरुद्ध असा करून चालणार नाही. या विषयातील राजकारण पूर्णतः बाजूला काढून डोळसपणे या विषयाकडे पाहावे लागेल आणि तसे पहिले तर काय दिसते? हेच की मुंबई रात्रभर चालूच असते, मग जर ते आधीपासूनच तसे आहे तर नवीन काय असणार आहे? सध्या जे नाईट लाइफ चालू आहे ते आणि सर्वसामान्यांना जे अपेक्षित आहे ते - यात फार मोठी तफावत आहे. ही तफावत दूर करणे तसे कठीण आहे कारण एकीकडे सर्वसामान्यांच्या गरजा वेगळ्या आहेत तर दुसरीकडे नाईट लाइफची संकल्पना पूर्णतः भिन्न आहे आणि 'गरज' यापेक्षा ती 'एन्जॉयमेंट', 'थ्रील', 'एक्साईटमेंट' याकडे झुकणारी अधिक आहे.

मुंबई रात्रभर सुरूच असते याची अनेक उदाहरणे देता येतील. आम्ही जेव्हा सेकंड शिफ्ट संपवून रात्री १२ नंतर ऑफिसमधून घरी यायला निघतो तेव्हा रोज रस्त्याने जाताना अशी अनेक उदाहरणे पाहायला मिळतात, जी मुंबई रात्री जागीच असते याची प्रचीती देतात; किंबहुना रात्री १२ वाजता दिवस उगवला आहे असे वाटण्यासारखी दृश्ये पाहायला मिळतात. आजही काही ठिकाणी रात्री १२ नंतर पाणी येते. त्यामुळे बायका-पुरुष पाण्यासाठी रांगेत उभे असलेले दिसतात, जेव्हा नंबर लागेल तेव्हा लागेल अशी परिस्थिती असते. हे एक प्रकारचे नाईट लाइफच आहे. कुठल्याशा गल्लीत खास खवय्यांची भाऊगर्दी जमलेली असते, का तर म्हणे अमुक एक गाडी रात्रीच लागते आणि मग त्या गाडीवर मिळणाऱ्या पदार्थांवर ताव मारण्यासाठी लोक आधीपासून थांबलेले असतात.. हे सुद्धा नाईट लाइफ आहे. थोडी उच्चभ्रू वस्तीतून गाडी जाऊ लागली की तोकड्या कपड्यातील तरुण-तरुणींचे घोळके नजरेस पडतात आणि एका वेगळ्याच मुंबईचे दर्शन घडते. आपल्या अलिशान गाडीला टेकून आणि गरज नसतानाही एकमेकांना खेटून उभी राहणारी ही मंडळी एका हातात सिगारेट आणि दुसऱ्या हातात ड्रिंक्सच्या बाटल्या घेऊन स्वत:च्या धुंदीत इतकी हरवलेली असतात की बाजूने जाणाऱ्या गाड्यांचीही त्यांना शुद्ध नसते. नाईट लाइफच्या प्रस्तावात औषधांच्या दुकानांचाही उल्लेख होता, पण तशी २४ तास चालू असलेली औषधांची दुकाने अनेक आहेत. पण गंमत अशी आहे की त्या औषधांच्या दुकानांमध्येही जी गर्दी दिसायची ती औषधांसाठी नसून वेगळ्याच कारणांसाठी आलेल्या लोकांची असायची. एकदा कुतूहलाने आणि काहीशा काळजीने विचारले असता ती गर्दी औषधांसाठी नसून कोल्ड्रिंक्स, मॅगी, रेडी टू इट पदार्थ, चोकलेट, आईस्क्रीम, ब्रेड, बिस्कीट वगैरे वस्तूंसाठी होत असल्याचे कळले. म्हणजे चोवीस तास चालू राहणाऱ्या दुकानांमध्ये, मग ती केमिस्टची का असेना तिथे इतर वस्तू खरेदी करण्यासाठी रात्री उशिरा बाहेर पडणे हा सुद्धा नाईट लाइफचाच एक भाग आहे आणि नव्या प्रस्तावित नाईट लाइफमुळे यापेक्षा वेगळे काय साधणार आहे? सामान्य माणसाच्या आयुष्यात काय फरक पडणार आहे? आजही सर्वसामान्यांना अनेक ठिकाणी अनेक गोष्टींसाठी जे झगडावे लागते तो झगडा यामुळे संपणार आहे का?

काही गाड्या जशा रात्रीच लागतात तशीच मुंबईतील काही हॉटेल्ससुद्धा रात्रीच सुरू होतात आणि खावय्यांच्या जिभेचे रात्रभर चोचले पुरवत सुरू असतात. यात गरजेचा भाग किती आणि चैनीचा भाग किती हा एक प्रश्नच आहे, पण त्या हॉटेलांची एकूण शान-शौकी पाहता ती गरजूंसाठी कमी (पदार्थांच्या किंमती प्रचंड) आणि ऐय्याशी करणाऱ्यांसाठी जास्त असावीत असेच वाटते.



नाईट लाइफवरील प्रस्ताव वाचताना मला रोज दिसणारी ही सगळी उदाहरणे आठवली आणि प्रश्न पडला की नाईट लाइफ या शहरात आधीपासून आहेच. कधीही न झोपणारे शहर अशीही या शहराची ओळख आहे, मग आता याहून वेगळे काय अपेक्षित आहे? सध्या जे सुरू आहे त्यापेक्षा कोणते वेगळे अर्थकारण साधले जाणार आहे आणि जर अपेक्षा करायचीच असेल तर ती केवळ खानपान सेवा आणि औषधे याच बाबतीत करणार आहोत का? असे अनेक प्रश्न अनुत्तरीत असून त्याबाबतीत या प्रस्तावात सुस्पष्टता दिसत नाही.

मुंबईत बाहेरून विशेषतः परदेशातून येणाऱ्या लोकांपुढे आपण कुठले नाईट लाइफ ठेवतो आहोत? मध्यंतरी माझी एक जर्मन मैत्रीण इथे आली होती. तिचे मुंबईत येणारे विमान आणि मुंबईतून जर्मनीला जाणारे विमान या दोन्हीच्या वेळा मध्यरात्रीच्याच असल्यामुळे दोन्ही वेळा तिला विमानतळापर्यंत जाताना मुंबईचे नाईट लाइफ पाहायला मिळाले होते. ते पाहून ती मला म्हणाली होती की, 'हे तर मला युएस-युकेमध्येच असल्यासारखे वाटते आहे.' तिचे हे म्हणणे ऐकून मला आनंद व्हायला हवा होता कारण माझ्या देशाची तुलना ती बलाढ्य अशा पाश्चिमात्य देशांबरोबर करीत होती, पण मला वाईट वाटले, कारण त्या देशातील नाईट लाइफची एक काळी प्रतिमा तिच्या डोळ्यांसमोर होती. गुंडगिरी, व्यसनाधीनता असुरक्षितता, नशेत वेगाने गाड्या पळवणे, छेडछाड या सगळ्या गोष्टी त्या देशातील नाईट लाइफचे एक अंग होते आणि मुंबईतील नाईट लाइफ पाहिल्यावर तिला या गोष्टींची आठवण व्हावी याचे मला वाईट वाटले. मी तिला काही चांगली उदाहरणेही दिली, पण तरीही तिने केलेली तुलना मला सतत खटकत राहिली. तिने तिचे मत मांडले होते पण तिच्या बोलण्याने माझ्यासमोर अनेक प्रश्न निर्माण केले. काही वेळेसाठी तिचे मत आपण बाजूला ठेवू आणि आपला विचार करू. आपल्याकडे सुद्धा नाईट लाइफ हा शब्द उच्चारला तरी आज अनेकांच्या भुवया उंचावतात. नाईट लाइफ म्हणजे काहीतरी वाईट, चुकीचे, फाजील, अश्लील, अप्रिय अशी एक प्रतिमाच बनून गेलीये. ही प्रतिमा बदलणे म्हणजे एक फार मोठे आव्हान आहे. त्या आव्हानाचा विचार या प्रस्तावात कुठे फारसा आल्याचे जाणवले नाही, उलट आता जे चालू आहे त्यालाच आणखी प्रोत्साहन मिळेल की काय अशी भीती वाटते. म्हणजे आजकाल मुले घरी न सांगता किंवा कुठलेसे थातुरमातूर कारण देऊन रात्रीची घराबाहेर पडत असतील, पण उद्या या सगळ्याला अधिकृत केलं तर?

नाईट लाईफ च्या प्रस्तावात किंवा नाईट लाइफच्या प्रस्तावाच्याही आधी, रात्रीची सुरक्षा व्यवस्था हा मुद्दा वर आणायला हवा आणि नेमके हेच न्यायालयाने अधोरेखित केले आहे. नाईट लाइफ सुरू झाल्यास रात्रभर मद्याची दुकाने व पब सुरू ठेवणार आहात का? जर रात्रभर दुकाने उघडी ठेवली तर महिलांच्या सुरक्षेचा आढावा राज्य सरकारने घेतला आहे का? असा प्रश्न विचारीत आधी महिलांच्या सुरक्षेचा आढावा घ्या मग नाईट लाइफ सुरू करा असा सल्ला न्यायालयाने राज्य सरकारला दिला आहे.

सुरक्षितता हा कळीचा मुद्दा आहे. केवळ शाब्दिक आश्वासने नकोत तर तशी यंत्रणा कार्यरत व्हायला हवी ती कोण करणार? त्यासाठी अतिरिक्त पोलिस बळ लागेल. त्याची तरतूद सरकार करू शकणार आहे का? नाईट लाइफ म्हणजे केवळ मनाला येईल



ते करण्याचे स्वातंत्र्य असेल तर असे स्वातंत्र्य नकोय. कारण ते आजही समाजाच्या आड येतेय. त्याचा त्रास पालकांपासून समाजापर्यंत सगळ्यांना भोगावा लागतो. मुळात ज्या गोष्टी गरजेच्या आहेत त्यावर लक्ष केंद्रित व्हायला हवे आणि त्यात रात्र-दिवस असा भेद नसावा. पण ज्यांच्या खांद्यावर आपण ही जबाबदारी टाकणार आहोत अशा यंत्रणा, विशेषतः पोलिस, त्यांच्यावर या कामाचा ताण येणार असेल तर ते काम करू शकतील का? की त्यातून काही नवीन समस्या उद्भवतील? की हफ्ते वसुलीसारखे प्रकार वाढतील? तसे झाल्यास मूळ हेतूपासून फारकत घेतल्यासारखे होईल.

आजकाल दिवसाढवळ्यासुद्धा मुंबईत वावरताना अनेक गोष्टींचा अडथळा येतो तर काही सेवा-सुविधांची विशेषत्वाने कमतरता जाणवते. त्याकडे लक्ष देणे ही खरे तर काळाची गरज आहे. पण ते राहिले बाजूला आणि मधेच नाईट लाइफचा विषय पुढे आणला गेला. जे मुळातच इथे अस्तित्वात आहे ते नव्याने नजेरत आणून काय साधणार आहे? रात्री उशिरा फिरायला बाहेर पडणाऱ्या किंवा तिथून घरी परतणाऱ्या लोकांना मिळणारे वाहन, त्या वाहनातील सुरक्षितता, त्या वाहन चालकाकडून आकारले जाणारे भाडे यावर कोण आणि कसा कंट्रोल ठेवणार आहे? प्रत्येकाच्या मागे पोलिस जाऊ शकणार नाही हे आपण जाणतोच. दिवसा वाहतुकीचा प्रश्न किती जटील बनतो किंवा रिक्षा-टॅक्सीकडून दिवसा आकारले जाणारे सध्याचे भाडे, त्यानंतरही प्रवासी नाकारणे यामुळे लोकांना किती त्रास सहन करावा लागतो याची खरेच गणती नाही. हे प्रकार जर दिवसा इतके जटील बनले असतील तर नाईट लाइफ 'एन्जॉय' करायला बाहेर पडणाऱ्यांना घरी परतताना याच समस्या किती पटींनी त्रासदायक ठरतील याचा विचार होताना दिसत नाही. रात्री १२ नंतर भाडे दीडपट होणार असे असले तरी पार्ल्यातील रिक्षांमध्ये रात्री ११. ३० वाजताच मीटर दीडपट भाडे दाखवते असा अनुभव आहे. ही लूट कशी रोखणार? तशी काही यंत्रणा असल्याचे अजूनतरी दिसत नाही. नाईट लाइफ अधिकृतरीत्या सुरू झाले तर 'मुंबई व्हायब्रण्ट होईल, नाइट लाइफ एन्जॉय करता येईल' असे सांगितले जाते आहे पण मुळातील समस्या जर तशाच राहणार असतील आणि त्याकडे दुर्लक्ष करून या शहरावरचा भार अधिक वाढणार असेल तर मुंबई 'व्हायब्रण्ट' कशी होईल? मुळात ती कुणासाठी 'व्हायब्रण्ट' करायची आहे आणि कुणासाठी 'नाइट लाइफ एन्जॉय' करण्याची सोय करून द्यायची आहे हे दोन पूर्णतः वेगळे प्रश्न आहेत आणि त्याची सरमिसळ करून चालणार नाही. जर इथे येणाऱ्या विदेशी पाहुण्यांसाठी आपण ती 'व्हायब्रण्ट' करणार असू तर त्यासाठी या शहराला एक शिस्त असणे गरजेचे आहे आणि त्या शिस्तीचे पालन करणारी सक्षम, प्रसंगी कठोर यंत्रणा जबाबदारीने कार्यरत करावी लागेल. ज्यात सुरक्षितता, प्रसाधनगृहांची उभारणी-स्वच्छता आणि देखभाल तसेच पाणी, औषधे, आपत्कालीन व्यवस्था, संपर्क व्यवस्था, वाहतूक व्यवस्था या सगळ्या गोष्टींचा अंतर्भाव प्रभावीपणे केला तरच मुंबई 'व्हायब्रण्ट' म्हणता येईल आणि विदेशातून येणाऱ्या लोकांच्या मनात मुंबईतील लाइफची एक उजळ प्रतिमा तयार होइल. पण 'नाइट लाइफ एन्जॉय करता यावे' यासाठी जर हा प्रस्ताव असेल तर त्याची खरेच गरज नाही. कारण आजही लोक ते 'एन्जॉय' करतच आहेत. त्यांना मुळात जे चालू आहे त्यात बदल नकोय कारण त्यांची एन्जॉयमेंटची कल्पना वेगळी आहे. नाईट लाइफ सुरू झाल्यावर बार, अमली पदार्थांची विक्री आणि इतर गैरप्रकार (ज्यामुळे नाईट लाइफची काळी प्रतिमा

तयार झाली आहे) ते सगळ थांबून केवळ औषध, दूध, पाणी, सुरक्षित वाहतूक-प्रवास आणि आदरातिथ्यासाठी मुंबई रात्रभर जागी राहणार आहे का? हा प्रश्न सोडवावा लागेल. जर आदरातिथ्यच करायचे असेल तर त्यासाठी विमानतळांवर पुरेशी आणि चांगली सोय आहेच. नाईट लाइफमुळे रोजगार उपलब्ध होईल या म्हणण्याला काहीच अर्थ नाही. कारण जर रोजगारच उपलब्ध करून द्यायचा असेल तर तो दिवसाही उपलब्ध करून देता येतोच की.... मुळात रोजगार उपलब्ध करा मग कोणत्या शिफ्ट मध्ये काम करायचे ते ठरवता येईल, पण नाईट लाइफमुळे रोजगारनिर्मितीला चालना मिळेल हे म्हणणे अगदीच हास्यास्पद आहे. आजच्या घडीला शिक्षण, पोलीस, सुरक्षा यंत्रणा यासारख्या क्षेत्रात नव्याने भरती करण्याची फार मोठी निकड आहे, त्याकडे लक्ष दिले तरी अनेकांना रोजगार मिळेल. नाईट लाइफमुळे रोजगार निर्माण होण्याऐवजी अतिरिक्त वीजपुरवठा, अतिरिक्त पाणीपुरवठा या गोष्टींची गरज भागवताना शहरावर मोठा ताण येईल ते वेगळेच. पर्यटकांसाठी मुंबई रात्रभर जागी ठेवायची तर त्यासाठी हॉटेल्स, प्रतीक्षाकक्ष असतातच आणि पर्यटक आपल्या देशातून किंवा शहरातून मुंबईला येण्यापूर्वीच सगळी बुकिंग करून मगच निघालेले असतात. आगंतुकपणे येणाऱ्यांसाठीसुद्धा चांगली हॉटेल्स आजही आहेतच की. म्हणूनच सरसकट हा प्रस्ताव लागू करण्यापूर्वी ज्या ठिकाणी आवश्यकता आहे अशी ठिकाणे हेरून तेथे आधी प्रायोगिक तत्त्वावर काही गोष्टी सुरू करून पाहाव्या लागतील.

मुंबई हे जागतिक दर्जाचे आणि कधीही न झोपणारे शहर असूनही काही मोजक्या आस्थापना वगळता बाकी सर्व व्यवहार रात्री बंदच असतात, ते कायदा आणि सुव्यवस्थेचा आदर राखूनच. शहराला एक शिस्त हवी आणि त्या दृष्टीने हेच बरोबर आहे. पण सर्रास नाईट लाइफ सुरू केले तर ही शिस्त धोक्यात येईल आणि पर्यायाने समाजजीवन धोक्यात येऊ शकते. जिथे गरज आहे तिथे खरेच काही मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून द्यायला काहीच हरकत नाही, पण त्याचवेळी शहरातील कायदा आणि सुव्यवस्था, शहराची शिस्त बिघडून चालणार नाही. शेवटी समाजाचे हित जपणे महत्त्वाचे आहे. नाईट लाइफ ही थोड्या-थोडक्या लोकांची सोय करेलही कदाचित, पण त्यासाठी संपूर्ण शहराला हाताशी धरता येणार नाही. कारण या शहरातील कायदा, शांतता, सुरक्षितता आणि सुव्यवस्था ही इथल्या बहुसंख्य लोकांची खरी गरज आहे आणि त्याचा मान ठेवायलाच हवा. पंच्याण्णव टक्के लोकांना नाईट लाइफपेक्षा 'लाईफ' हवंय.... सुरक्षित लाइफ.


**- मनीषा नित्सुरे-जोशी**
भ्रमणध्वनी : ९८२०५३२९३९
manisha.nitsure@gmail.com

**ग्रंथाली**

# अफलातून मुंबई – सविता अमर

चार दिवस जिवाची मुंबई करण्यासाठी आलेल्या पाहुण्यांना या महानगरीची मनाजोगती सफर करण्यास मदत करणारे हे उपयुक्त असे अफलातून पुस्तक लिहून सविता अमर यांनी मोलाचे काम केले आहे. मुंबईविषयक अत्याधुनिक व तपशीलवार माहितीने समृद्ध अशी दुसरी पुस्तके मराठीत फारशी आढळणार नाहीत. महाराष्ट्राची राजधानी व मराठी मनाचा मानबिंदू असलेल्या या अफाट शहराच्या बाबतीत मराठी भाषेतील ही कमतरता प्रस्तुत पुस्तकाने भरून काढण्यास जोमदार सुरुवात केली आहे, असे म्हणावयास हरकत नाही. त्याबद्दल लेखिका सविता, प्रकाशक ग्रंथाली तसेच प्रकाशनास सहाय्य करणारे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ या सर्वांचे अभिनंदन केले पाहिजे. त्याचबरोबर नमूद करायला हवे की केवळ प्रासंगिक पाहुणे किंवा पर्यटक यांच्यासाठी असे हे पुस्तक नसून जन्मापासून इथेच राहत असलेल्या अस्सल मुंबईकरांनी देखील ते अवश्य वाचण्यासारखे आहे. म्हणजे त्यांनाही आपण न पाहिलेल्या मुंबईची मुशाफिरी करण्याची स्फूर्ती येऊ शकेल...

– अरुण साधू




**मूल्य १००० रु.**
**सवलतीत ६०० रु.**

# स्त्री-संगीतकारांचं स्वरविश्व

## तनुश्री राणे

परंपरागत कुटुंबव्यवस्थेत स्त्रीनं घरकाम करावं, चूलमूल सांभाळावं, घरातील थोरामोठ्यांची आणि नातेसंबंधांची जपणूक करावी तर पुरुषानं घराबाहेरचं जग सांभाळून पैसाअडका कमवावा अशी ढोबळ विभागणी चालत आली आहे. परंतु, अंगभूत कलागुण ही निसर्गानं फक्त पुरुषांनाच नाही तर स्त्रियांनाही दिलेली देणगी आहे.

गेल्या दीडशे वर्षांत भारतीय स्त्रीसाठी शिक्षणाच्या वाटा मोकळ्या झाल्या. त्या होतानाही स्त्रीला वेगवेगळ्या पातळ्यांवर संघर्ष करावा लागला. तोपर्यंत तिच्यात असलेल्या काव्य आणि गानप्रतिभेला ती कशी व्यक्त करत असेल? आयुष्याचे चटके सहन करताना होणारी घुसमट, तिचं स्वतःचं असं जगरहाटीचं भान, तिच्या शब्दांतून, तिच्या जात्यावरच्या ओव्यांमधून, बाळाला जोजवताना-झोपवताना म्हटलेल्या अंगाईतून, शेतात-परसदारी काम करताना गुणगुणलेल्या गाण्यांतून बाहेर पडत असेल. घर-अंगणात निसर्गातून, आजूबाजूच्या आसमंतातून, कानावर पडलेल्या आवाजांतून, स्वरांतून तिच्या कवितेला चाल मिळत असेल किंवा गाणं गळ्यातून उमटताना स्वतःची अशी चाल घेऊनच उमटत असेल.

इतिहासात मीराबाईंच्या भजनांची नोंद आहे आणि आजही त्यांची कितीतरी भजनं लोकप्रिय आहेत. आपल्या लोकविलक्षण भावांच्या बरोबरीनंच मुक्ताईचे ताटीचे अभंग, संत जनाबाईंचे अभंग यांमुळे भक्तिसंगीताचा पाया घातला गेला असावा. परंतु, घरीदारी वावरणाऱ्या साध्याभोळ्या स्त्रियांमधील अशातऱ्हेची प्रतिभा, घरातील इतरांनाच काय तिला स्वतःलाही जाणवत नसेल. आपण कविता करतो आहोत किंवा कवितेला चाल लावून त्याचं गाणं म्हणतो आहोत, हे तिचं तिलाही उमगत नसेल. स्वतःच्या हातातील काम हलकं होण्यासाठी, जीवन जगताना झालेल्या जखमांवर फुंकर घालण्याची तिची ही युक्ती असावी. याचं उत्तम उदाहरण म्हणजे बहिणाबाई. त्यांच्या कवितांना स्वतःची अशी नादमयता आहे.

संगीत नाटकांच्या काळानंतर स्त्री संगीतकारांचं स्वतःचं अस्तित्व समृद्ध करणारं आगळंवेगळं स्वरविश्व विकसित होत गेलं असलं पाहिजे. स्त्री ही कवयित्री आणि गायिका या कलागुणांनी



सरस्वती देवी

जितकी समर्थपणे व्यक्त होताना दिसते. तितक्याच समर्थपणे संगीतकार म्हणूनही व्यक्त होताना दिसते.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या काही वर्षांमधे संगीत नाटकांसाठी रचना करण्यात हिराबाई बडोदेकर आणि हिराबाई पेडणेकर यांचं काम महत्त्वाचं आहे. हिराबाई बडोदेकरांनी संगीतबद्ध केलेलं 'उपवनी गात कोकिळा' किंवा हिराबाई पेडणेकरांचं 'शूरा मी वंदिले...' ही गाणी नाट्यसंगीतातच बांधली गेली. 'कशी या त्यजू पदाला' हे 'एकच प्याला'मधील बालगंधर्वानी गायलेलं पद संगीतबद्ध केलं आहे बाई सुंदराबाई यांनी, याशिवाय जयमाला शिलेदार, जोस्त्ना भोळे आदींनी स्वरसाज चढवलेली गाणी आहेत.

शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीतप्रकारात गानसरस्वती किशोरी आमोणकर यांच्या 'रंगी रंगला श्रीरंग..' या अल्बममधील 'बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल' किंवा 'अवघा रंग एक झाला' ही गाणी स्वतःचा असा अप्रतिम ठसा उमटवून जातात. डॉ. प्रभा अत्रे यांचं 'कळीचे फूल होताना...' अशी स्वरसाज चढवलेली गाणी आहेत. हिराबाई जव्हेरी आणि मधुबाला जव्हेरी या मायलेकींची 'माझा ग बाळराजा माझा निजधाम', 'माहेराला आली गाडी ढवळ्यापवळ्याची जोडी', 'सोडोनिया निजधाम सावळिया जासि



उषा खन्ना

कुठे?' अशी कितीतरी गाणी आहेत. वीणा चिटको यांचं 'मयुरा रे...' तर सुहासिनीबाई मुळगांवकर यांचे 'जास्वंदीच्या फांदीवरले...' अशी गाणी दखल घेण्याजोगी ठरतात.

चित्रपटांचा काळ आल्यानंतर अनेक कलाकारांना स्वतःचे कलागुण दाखवण्याची, त्यांना विकसित करण्याची आणि त्यासाठी निरनिराळे प्रयोग करण्याची संधी उपलब्ध झाली. हिंदी चित्रपटसृष्टीत ज्येष्ठ अभिनेत्री नर्गिस यांची आई जद्दनबाई यांनी 'तलाशे हक़' या चित्रपटासाठी म्युझिक कंपोझर म्हणून काम केल्याची नोंद आहे. बॉम्बे टॉकीजच्या म्युझिक कंपोझरच्या टीममधून सरस्वतीदेवी यांनी'अछूत कन्या' (१९३६), 'झूला', 'नया संसार' आणि 'बंधन' अशा चित्रपटांसाठी काम केलेलं आहे. 'मैं बन की चिड़ीया बन के बन बन बोलूं रे' हे 'अछूत कन्या' या चित्रपटातील गाणं प्रसिद्ध आहे. १९४१ साली जन्मलेल्या उषा खन्ना यांनी १९५९ ते १९८३ या दीर्घ कारकिर्दीत अनेक चित्रपटांसाठी संगीतदिग्दर्शनाचं काम केलं आहे. त्यात 'दिल देके देखो' (१९५९), 'हम हिंदुस्तानी' (१९६०), 'शबनम' (१९६४) पासून 'सौतन' (१९८३) असे अनेक चांगले चित्रपट येतात. या चित्रपटांतील गाजलेली गाणी उषा खन्ना यांची संगीतकार म्हणून असलेली प्रतिभा उजळ करतात. 'बडे हैं दिल के काले...' (दिल देके देखो), 'छोडो कल की बातें कल की बात पुरानी...' (हम हिंदुस्तानी), 'जिंदगी प्यार का गीत है...' किंवा 'शायद मेरी शादी का खयाल...' (सौतन), 'मधुबन खुशबू देता है...' (साजन बिना सुहागन) यासारखी कितीतरी गाणी त्या काळात खूप गाजली होती आणि आजही ती श्रवणीय वाटतात.

मराठी चित्रपटांच्या बाबतीत स्वरसाम्राज्ञी लता मंगेशकर यांनी 'आनंदघन' या नावानं अनेक चित्रपटांना संगीत दिलेलं आहे. 'साधी माणसं', 'राम राम पाव्हनं', 'मोहित्यांची मंजुळा'पासून 'तांबडी माती'पर्यंत या चित्रपटांतील गाणी आजही खूप लोकप्रिय आहेत. साधी सरळ वाटणारी, मराठी मुलुखाचा, इथल्या लोकसंगीताचा बाज घेऊन येणारी ही गाणी गायला वाटतात तेवढी सोपी नाहीत. त्यातील कितीतरी गाण्यांत आनंदघनांनी सुंदर प्रयोग करून अनवट चाली बांधल्या आहेत. उदाहरण द्यायचे झाल्यास 'राजाच्या रंग म्हाली... गडणी सजणी ग', 'वाट पाहुनी जीव शिणला...' किंवा 'अखेरचा हा तुला दंडवत...' ही गाणी. उषा मंगेशकर यांनी संगीतबद्ध केलेलं 'मला हिरव्या पालखीत मिरवा...' असं गाणं प्रसिद्ध आहे. मीनाताई खडीकरांनी स्वरबद्ध केलेली 'असावा सुंदर चॉकलेटचा बंगला...' किंवा 'सांग सांग भोलानाथ...' अशी बालगीतं आजच्याही काळातील लहान मुलांच्या भावविश्वाचा भाग आहेत. नुसती बालगीतंच नाही तर 'ये जवळी घे जवळी प्रियसखया भगवंता...' अशी स्वररचना मीनाताईंचीच.

ज्या काळात स्त्रिया घराबाहेर फारशा पडत नसत, त्या काळात स्त्रियांच्या अशा कामाचं श्रेय त्यांच्या घरातील किंवा इतर पुरुषांना दिलं गेलं आहे, म्हणजे काम एखाद्या स्त्रीचे आणि आज ते गाणं दुसऱ्याच व्यक्तीच्या नावानं नोंदवलं गेलं अन् ती अंधारातच राहिली. कालांतरानं संगीतकार म्हणजे पुरुषांची मक्तेदारी हा गैरसमज दूर होत गेला, आणि अनेक स्त्रियांनी संगीतक्षेत्रात आपल्या असामान्य प्रतिभेला सांगीतिक रूप प्राप्त करून दिले. अशा स्त्री संगीतकारांची संख्या जरी मोजकी असली तरी दखल घेण्याजोगी निश्चितच आहे. त्यातील काही नावे– आशा खाडिलकर, रंजना प्रधान, नीला भागवत, सुमन माटे, मालती अलुरकर, कुमुद भागवत, शशिकला अभ्यंकर, माणिक भिडे, शामल कुलकर्णी, शुभदा तांबट, वर्षा भावे, वर्षा आंबेकर, वत्सला कुमठेकर, कुमुद हिरूरकर, चारूशीला बेलसरे, प्रवरा लिमये, सरिता भावे, सुखदा भावे, नीला सत्यनारायण, मधुराणी प्रभुलकर इ.इ. अजूनही कितीतरी स्त्रियांची नावे प्रकाशात येऊ शकतील.

गेल्या २०–२५ वर्षांच्या काळात पद्मजा फेणाणी–जोगळेकर यांचे स्त्री संगीतकार म्हणून नाव प्रकर्षानं घ्यावं लागतं. मराठी साहित्यातील ज्येष्ठ श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, कवयित्री इंदिरा संत आदींच्या कवितांना चाली लावून 'घर नाचले नाचले' सारखा अल्बम, अटलबिहारी वाजपेयी यांच्या कवितांना चाली लावून 'गीत नया गाता हूँ' हा अल्बम, प्रसिद्ध आहेत.

'अल्फा मराठी गौरव पुरस्कारा'साठी 'चंद्र चंदनाचा' या अल्बमसाठी ५ नामांकनं मिळवलेल्या संगीतकार माधुरी नाईक संगीत दिग्दर्शनाच्या क्षेत्रात वैविध्यपूर्ण, निरनिराळे प्रयोग करताना दिसतात. त्यांनी संगीत दिलेले 'प्रतिबिंब', 'साद' आणि 'कतरा कतरा' हा सूफी गीतांचा, असे अल्बम प्रकाशित झाले आहेत. माधुरी नाईक यांनी शेतकरी गीतं, स्त्री गीतं, लोकगीतं, भारतमातेची आरती, स्त्री गौरव गीत, 'राजा शिवछत्रपती' या मालिकेतील लावणी, बाबासाहेब पुरंदरे रचित महानाट्याच्या हिंदीकरणाच्या वेळी त्यातील कवितांच्या चाली, 'माझा देव गणराज' या अल्बमसाठी ज्योतिर्भास्कर जयंतराव



**किशोरी आमोणकर**

साळगांवकर रचित गणेश पूजा आणि गणेश गीतं अशी असंख्य प्रकारातील गाणी संगीतबद्ध केलेली आहेत. ‘स्वप्न विकसित भारताचे’ या ध्वनिफितीच्या निमित्तानं माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या साहित्यावर गीतलेखन व संगीतदिग्दर्शन त्यांनी केलं आहे. याशिवाय ‘आनंदमयी – स्त्री संगीतकारांचे स्वरविश्व’ असा आतापर्यंतच्या स्त्री संगीतकारांना मानाचा मुजरा देणारा कार्यक्रम त्या सादर करतात, ज्याची संकल्पना आणि बांधणी माधुरी नाईक यांचीच आहे. त्यांची धाकटी बहीण साक्षी देशपांडे हिंनसुद्धा ज्येष्ठ कवी ना.घ. देशपांडे यांच्या नादमधुर कवितांना संगीतबद्ध करून ‘लतिकांच्या सावलीत’ हा अल्बम प्रकाशित केला आहे. माधुरी नाईक यांच्या आई रजनी शंकर अकोलीकर यांनी रचलेल्या ‘रामायण’ या महाकाव्यावरच्या कवितांचा ‘मनभावन रामायण’ हा अल्बम नुकताच प्रकाशित झाला, त्यातील संगीतरचनाही अकोलीकर यांच्याच आहेत.

२०१२च्या सुमारास प्रसिद्ध झालेल्या ‘ओ वुमनिया...’ या ‘गँग्ज ऑफ वासेपूर’ हिंदी चित्रपटगीताला स्नेहा खानवलकर या तरुण संगीत दिग्दर्शिकेचं मार्गदर्शन लाभलं आहे. त्यांनी ‘ओय लकी लकी ओय’ आणि ’गँग्ज ऑफ वासेपूर’ भाग १ व २ यांना संगीत दिलेलं आहे. तर प्रसिद्ध गायिका वैशाली सामंतसुद्धा संगीतक्षेत्रात नव्यानं प्रयोग करताना दिसते आहे. अशा अनेक प्रयोग करणाऱ्या स्त्री संगीतकारांना त्यांच्या पुढील प्रवासासाठी शुभेच्छा.

**– तनुश्री संदेश राणे**

दूरध्वनी – ०२२– २८६९ ३६३६


**ग्रंथाली**

**अतुल घाग** लिखित

**दुर्गराज रायगड**





एका पाश्चात्य फिरस्त्याने रायगड पाहून म्हटले की रायगडइतका अजिंक्य आणि अतुलनीय डोंगरी किल्ला मी जगात दुसरा पाहिला नाही. खरोखरच रायगड हे एक महाकाव्य आहे. त्याचे सार्थ वर्णन करण्यासाठी हवेत महर्षी वाल्मीकी आणि व्यासच. प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडाची स्तुती केली आणि सार्वभौम हिंदवी स्वराज्याच्या राजधानीचा मान, बत्तीस मण सोन्याचे रत्नजडित सिंहासन रायगडाच्या हृदयातच स्थापन करून दिला.

पुढे केवळ फितुरीमुळेच रायगड शत्रूच्या कब्जात गेला, नाहीतर तो शंभर औरंगजेबांनाही गवसला नसता. अशा या रायगडाचे नितांत सुंदर दर्शन श्री. अतुलराव घाग यांनी आम्हाला घडविले आहे. रायगड कसा आणि कोठून कोठून पाहायचा असतो ते अतुलरावांनी आज आम्हाला शिकवले आहे.

**– बाबासाहेब पुरंदरे**

**मूळ किंमत ४०० रु.**

**सवलतीत २५० रु.**

# मराठी भाषा केवळ अस्मितेशी नव्हे तर अस्तित्वाशी जोडा!



बदलापूर येथे 'ग्रंथसखा' वाचनालयाचे प्रणेते श्याम जोशी, श्रीधर पाटील यांच्या प्रयत्नातून स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव असलेले स्वायत्त मराठी विद्यापीठ स्थापन झाले आहे. डी.एस. कुलकर्णी त्याचे कुलपती असून ज्येष्ठ साहित्यिक द.भि. कुलकर्णी कुलगुरू आहेत. बदलापुरातील प्रवीण हेर्लेकर यांच्यासारख्या नामवंत उद्योगपतींचे लेखक जनसामान्यांचेही सहकार्य या विद्यापीठास लाभत आहे.

तीन दिवसांच्या या कार्यक्रमात विविध चर्चासत्रे झाली. प्रसिद्ध अनुवादक उमा व विरूपाक्ष कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. पंजाबमधील घुमान येथे होत असलेल्या ८८ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांची विशेष मुलाखत प्रा. मिलिंद जोशी यांनी घेतली. यावेळी मोरेसरांनी एकूणच मराठी साहित्याच्या प्रवाहाचा आढावा घेतला. त्यातील संपादित अंश-

प्रा. मिलिंद जोशी : सर, आपण एक भूमिका नेहमी मांडत आलेले आहात की, संत साहित्य हा इथल्या साहित्याचा मूळ स्रोत असताना सुद्धा एकूणच जागतिक पातळीवर जी काही स्थित्यंतरं झाली, त्यांचं अनुकरण मोठ्या प्रमाणात मराठीमध्ये झालं आणि त्यालाच खरं साहित्य मानण्याची मोठी परंपरा मराठी सहित्यामध्ये निर्माण झाली. आपण त्याविषयी काही बोलावं असं वाटतं.

डॉ. सदानंद मोरे : मुद्दा असा आहे की, पहिल्यांदा आपण मराठी साहित्याचा इतिहास थोडक्यात बघू या, मग मला तुमच्या प्रश्नाचं उत्तर देता येईल. तो इतिहास आपल्याला काय सांगतो की, साधारणपणे १३ व्या शतकामध्ये मराठी साहित्याची निर्मिती होण्याची सुरुवात झाली. आणि ही निर्मिती करणाऱ्यांच्यामध्ये मुख्यत्वेकरून दोन धर्म, पंथ होते. एक महानुभाव होता आणि एक वारकरी पंथ होता. या दोन्ही सांप्रदायिकांनी साहित्यनिर्मिती केली. सुरुवात महानुभावांनी केली. लीळाचरित्रासारखा अत्यंत उत्कृष्ट पद्य ग्रंथ आहे. नंतर काही निर्मिती गद्याची आहे. याचबरोबर थोड्याच काळात ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली. अमृतानुभव लिहिला आणि कितीतरी मराठी संतकवींनी अभंग लिहिले. १३ व्या शतकापासून मराठी साहित्याची अशी सुरुवात झाली. १२९० हा ज्ञानेश्वरीचा लेखनकाळ आहे. त्यानंतर जवळजवळ १७५०पर्यंत म्हणजे वारकरी पंथाचे अखेरचे संत संत निळोबा यांचे निर्वाण झाले ते वर्ष. तर तिथपर्यंत लिहिणारे जे लोक होते ते मुख्यत्वे संतकवी आहेत. त्यामुळे त्यांचे साहित्य हाच इथल्या साहित्याचा मुख्य प्रवाह. या दरम्यान दोन-चार चांगले पंडित कवी होऊन गेले. वामन पंडीत असतील, रघुनाथ पंडीत असतील. पण त्यांचे साहित्य फक्त त्याच लोकांपर्यंत मर्यादीत होतं ज्यांना संस्कृत समजतं. सर्वसामान्य मराठी भाषिकाला त्यांचं साहित्य समजत नव्हतं. त्यामुळे ते साहित्य काही मुख्य प्रवाहाचा भाग होऊ शकलं नाही. ते तेव्हाही बाजूलाच राहिलं. म्हणजे त्या काळातल्या लिहिणारी लोकं कोण होते, तर पाचशे वर्षं तरी कमीतकमी, म्हणजे १२९० ते साधारणपणे १७५० पर्यंत जे साहित्यनिर्मिती करणारे लोक हे संत होते. माझ्या दृष्टीने इतिहासामधला १७५० हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. या वर्षी निळोबारायांचे निर्वाण झाले आणि दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राने भारतीय राजकारणाचा ताबा घेतला. दिल्लीचे तख्त मराठ्यांच्या ताब्यात येण्याची प्रक्रिया सुरु झाली. १७५२ मध्ये दिल्लीचा बादशहा आणि पेशव्यांच्यात झालेला कराराचा मसुदा आहे. दिल्लीच्या बादशहाचं रक्षण त्याच प्रशासन हे मराठ्यांनी करायचं आणि त्याच्या मोबदल्यात मराठ्यांना काही विशिष्ट भूमी मिळणार, काय इनाम मिळणार, चौथाई हक्क मिळणार वगैरे. तर एकदम मराठे हे भारताचे सत्ताधारी झाले. त्यांच्यामुळे त्या विशिष्ट करारामुळे त्यामुळे त्यांच्याअगोदरपर्यंत मराठ्यांचा स्वतःचं रक्षण करण्यासाठी स्वतःचा बचाव करण्यासाठी वेळ जायचा, शिवाजी महाराजांनंतर तर जवळजवळ तीस वर्ष मराठे घोड्यावरतीच होते. खाली उतरायलाही त्यांना स्कोप नव्हता. आता स्थैर्य आलं. त्यामुळे झालं असं की ते भारतभर पसरले. उत्तरेत पसरले, स्थैर्याबरोबर आलं, पैसा आला,



**बदलापूर येथे स्वायत्त मराठी विद्यापीठ स्थापन झाले. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी श्याम जोशी, ज्येष्ठ साहित्यिक व या विद्यापीठाचे कुलगुरू द.भि. कुलकर्णी आणि कुलपती डी.एस. कुलकर्णी.**

---

सगळी पैशाची गंगा पुण्यातून वाहायला लागली. असं नानासाहेब पेशव्यांनी म्हटले आहे. त्यामुळे दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. मी तुम्हाला वाङ्मय विचार सांगतोय हा थोडक्यात. त्यातली पहिली गोष्ट की, मराठ्यांच्या पराक्रमाचं वर्णन करणारं साहित्य म्हणजे पोवाडे. ते विपुल प्रमाणात निर्माण झाले. दुसरी गोष्ट अशी की मराठी सैनिक ज्यावेळेला समृध्द झाले त्यावेळेला त्यांना आपोआपच काही रंगढंग सुचले. श्रृंगार करायला थोडासा वेळ मिळाला. त्यामुळे लावणी निर्माण झाली. लावणीचे दोन प्रकार आहेत एक सन्मुख शृंगार आणि विपलब्ध शृंगार. तर मराठी सैनिक ज्यावेळेला महाराष्ट्र सोडून बाहेर मोहिमेला जायचे त्यावेळेला मोहिमेवर गेलेला सैनिक हा कधी परत येईल किंबहुना येईल किंवा न येईल याची खात्री नसायची. त्यामुळे त्यांच्या बायका झुरणीला लागायच्या. त्या विरही भावावस्थेचं वर्णन करणारं साहित्य लिहिलं गेलं त्या लावण्यांमधून दोन्ही प्रकार आले. एक शृंगार आणि दुसरा विरह असा प्रकार आला. म्हणजे मुद्दा असा की हे जे साहित्य आहे ते संतसाहित्याचं पर्व संपल्यानंतर मराठी लोकांच्या गरजेपोटी त्यांच्या जगण्यातून निर्माण झालेले आहे. लावणी आणि पोवाडे हे त्यांच्या जगण्याचा भाग आहे. तर हे कुठपर्यंत चाललं तर मराठेशाही संपेपर्यंत चाललं. १८१८ ला अधिकृतपणे संपली आणि इंग्रजांच्या ताब्यात आपले राज्य गेलं. तरी देखील काही शाहीर १८५० पर्यंत तग धरून होते. १८४८ ला शाहीर परशुराम गेला ज्याने पेशवाई लिहिली. दरम्यानच्या काळात हळुहळू मराठी लोकांना इंग्रजी भाषा समजायला लागली. शाळा सुरु झाली. विद्यापीठाची स्थापना झाली आणि इंग्रजी साहित्य ते वाचू लागले आणि मग इंग्रजी साहित्याचं अनुकरण करून ते लिहायला लागले. त्याचा कवितेवर प्रभाव पडला. त्यांच्या कादंबरी नावाचा एक नवीन फॉर्म आपल्या लोकांनी निर्मिला. हे साहित्य आहे १८५० नंतर सुरू झाले. आता मधल्या काळात जे शाहीर लिहित होते ते स्वतःला शाहीर म्हणवत नव्हते. आपण त्यांचं तसं नामकरण केलं होतं. ते स्वतःला कवीच म्हणतात, कवीश्रेष्ठ म्हणतात, कवीराज म्हणतात. कुठल्याही so called मराठी शाहीरांनी आपला उल्लेख शाहीर म्हणून केलेला नाही हे मी मुद्दाम तुम्हाला सांगतो.

जेव्हा त्यांनी युद्धरम्य शृंगाराच्या विराण्या लिहिल्या, त्याच्यावरती तुम्हांला ज्ञानेश्वरांपर्यंत मागे जाता येईल. तो एक अविच्छिन्न असा धागा आहे. संतसाहित्य आणि शाहिरांच्यामध्ये. शाहिर शब्द आता वापरतो मी. कारण तो आता रूढ झालेला आहे. इतकंच नव्हे तर, असा एकही मराठी शाहिर नाही की, ज्यांनी ज्ञानेश्वर, तुकारामांच्याबद्दल चार ओळी लिहिलेल्या नाहीत. होनाजी बाळा असू देत. किंवा आणखी कोणी. बरं. सगळेच संतपरंपरा मान्य करून फक्त विठोबावरती लिहीतात किंवा फक्त पंढरीवर लिहितात. पंढरीच्या विरण्या आहेत. म्हणजे ही परंपरा १८५० पर्यंत चालत राहिली. इतिहास मराठी साहित्याचा स्वाभाविक इतिहास आहे. मधल्या काळात इंग्रज आले. आपण इंग्रजी शिकलो. आपण इंग्रजीत लिहायला लागलो, ते अनुकरण करून लिहायला लागलो. तो आपल्या जगण्याचा भाग नव्हता. म्हणजे, प्रेम न करता, प्रेमकविता लिहायला लागलो. केशवसुत वगैरे लिहायचे, तेव्हा प्रेमबीम करायला फारसा स्कोप नव्हता, आपल्या समाजामध्ये. मी सांगतो ती अतिशयोक्ती नाहीय. त्या काळामध्ये एका बाजूला सगळ्या संतांच्या कविता त्यामध्ये आल्या. पंडितांच्याही होत्या. आणि दुसऱ्या बाजूला हे इंग्रजी साहित्याच्या गोल्डन इरामधले. ते वाचून लिहायला लागले. तो त्यांचा स्वतःचा संवेदन स्वभाव होता का? तो नव्हता. म्हणजे त्याचा इतिहास किती आहे? त्याचा वयोगट वयोगट म्हणजे एकूण काल. खूपच कमी आहे तसं ते साहित्य अनुकरणातून पुढे आलेलं आहे. ते तुमच्या जगण्यातून आलेलं नाहीय. जसे, लावण्या आल्या, पोवाडे आले!

प्रा. मिलींद जोशी : श्याम जोशींनी हे जे स्वायत्त मराठी विद्यापीठ सुरु केले आहे या विद्यापीठाविषयी आपल्याला काय वाटते?

डॉ. सदानंद मोरे : ही अत्यंत अद्‌भुत अशी गोष्ट आहे, जिला केवळ अफलातून असे म्हणता येईल. प्रत्येकाचा (डोळा) कुठल्या तरी अवधानावर असतो.एकूण महाराष्ट्राची आणि देशाची परिस्थिती लक्षांत घेतली तर ते पुढे ठेऊनच लोक आपल्यापरी उपक्रम करीता असतात.ते आधीच ठरलेले असते की, आपण काय मागायचे? कुठे मागायचे? आणि कितीपट मागितले पाहिजे, यातील काहीही न करता श्याम जोशी यांनी जे उभे केले त्याला तड नाही.

प्रा. मिलींद जोशी : अस्मिते पेक्षा अस्तित्वाचा प्रश्न अधिक मोठा वाटतो का?

डॉ. सदानंद मोरे : भाषेचा प्रश्न एकप्रकारे अस्तित्वाशी जोडलेला असतो. त्याला आपण अस्मितेचा प्रश्न हा बाजूला काढता येत नाही. जर तुम्हाला मराठीला तुमच्या अस्तित्वाशी जोडता आले नाही तर, नुसता अस्मितेचा मुद्दा केला तर ते राजकारण होईल. त्यांनी मराठी पुढे जाणार नाही.

●

# दि.बा. मोकाशी जन्मशताब्दीनिमित्त परिसंवाद

## अजित आचार्य

'ग्रंथाली' आणि 'तुलसी आर्ट्स ग्रुप', पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १५ मार्च २०१५ रोजी बालगंधर्व -कलादालन, पुणे येथे 'ग्रंथाली'चा चौथा वाचकदिन संपन्न झाला. चित्रप्रदर्शन, प्रात्यक्षिक, या विविध यांच्या आयोजनासह दि.बा. मोकाशी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. तसेच किसन चव्हाण यांच्या 'आंदकोळ' या (पारधी समाजाच्या) आत्मचरित्राचे आणि विजय सावंत या कवीचे 'तिचे दोन डोळे' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रसिद्ध चित्रकार सुहास बहुळकर यांच्या हस्ते झाले.

अजित आचार्य यांनी 'ग्रंथाली'च्या उपक्रमाबद्दल व वाचकदिनाबाबतची माहिति दिली व परिसंवादाचे सूत्रचालन केले. दि.बा. मोकाशी यांच्या चार दशकांतील लेखनप्रवासातील एकूण अकरा कथासंग्रह, चार कादंबऱ्या, प्रवासवर्णन, ललितलेखन, बालवाङ्मय याबद्दल सविस्तर माहिती विशद केली व त्यावर भाष्य करणाऱ्या चारही वक्त्यांचा परिचय करून दिला.

दि.बा. मोकाशी यांच्या कथाविश्वाबद्दल आपले मनोगत मांडताना डॉ. रेखा इनामदार-साने दोनशेहून अधिक कथा, त्यातील काही कथांचे अकरा कथासंग्रह, दोन निवडक कथासंग्रह, वाचकांना सातत्याने देऊनही मोकाशी हे लेखक म्हणून उपेक्षितच राहिले. रेडिओ रिपेअरींगचे तांत्रिक शिक्षण व त्या व्यवसायाबरोबर कथांचे लेखन करताना, स्वत:च्या समस्या व भोवतालचे निरीक्षण या बरोबर जगण्याचा हेतू काय, आणि आयुष्याचा खेळ कशासाठी, अशा तत्त्वज्ञानी विचारांतून मोकाशींच्या लघुकथांना सखोलता व व्यापकता लाभली. शंभर वर्षांतील जर उत्तम लघुकथा निवडल्या तर मोकाशींची 'अमोद सुनासि आले' या कथेचा समावेश करणे आवश्यक ठरेल.''

डॉ. गजानन अपिने यांनी दि.बा. मोकाशी यांच्या कांदबऱ्यांचा आढावा घेताना म्हटले, 'देव चालले', 'आनंद ओवरी', 'पुरुषांना १०० गुन्हे माफ' व 'कामसूत्राचे वात्सायान' या सर्व कादंबऱ्या १९६० नंतरच्या आहेत. १९६० नंतर मराठीत नवनिर्मित व वास्तवतावादी साहित्य उदयाला आले.' त्याचे दाखले देताना ते पुढे म्हणाले, मधु मंगेश कर्णिक यांचे 'माहीमची खाडी', जयवंत दळवींची 'चक्र' व भाऊ पाध्ये यांची 'वासुनाका' अशा प्रक्षोभक परंतु शहरी जीवनातील वास्तवतावादी कांदबऱ्यांमुळे मोकाशी यांच्या कादंबऱ्या दुर्लक्षित राहिल्या. 'देव चालले' व 'आनंद ओवरी' यावरील नाट्यरूपांतरामुळे त्या वाचकांना माहीत झाल्या.' कादंबरीकार म्हणून मोकाशी यांना वाचकांनी प्रतिसाद दिला नाही असे समीक्षात्मक मत डॉ. अपिने यांनी मांडले.

प्रा. रूपाली शिंदे यांनी मोकाशींच्या प्रवासवर्णनातील 'पालखी', 'अठरा लक्ष पावले', 'स्थळयात्रा' यांचे सखोल विवेचन केले, की प्रवासवर्णनात निरीक्षण हे अत्यंत महत्त्वाचे असते, जे मोकाशींना अत्यंत प्रकर्षाने अवगत होते, त्यामुळे प्रवासवर्णनातील बारकावे, सामाजिक परिस्थिती, समस्या व प्रवासाचे मजल-दरमजल वर्णन यांनी वाचकांना मोहीत केले. 'अठरा लक्ष पावले' या प्रवासवर्णनात अन्नधान्यांच्या आयातीमुळे होणाऱ्या सामाजिक व आर्थिक परिणामांवर प्रवासवर्णन आधारीत झाल्यामुळे वाचकांचे तसे शासनाचेही लक्ष वेधून घेतले.

डॉ. ज्योती कानिटकर या मोकाशींच्या धाकट्या कन्या. त्यांनी वडिलांच्या सहवास व लेखनप्रवासाबद्दल सांगितले, की 'वडिलांचा सहवास फारच कमी लाभला कारण माझा जन्म व मोठ्या बहिणीचा जन्म यांत खूप अंतर आहे. मी जेव्हा नऊ वर्षांची झाले तेव्हा बाबा प्रथितयश लेखक म्हणून प्रसिद्ध होते. घरात अत्यंत आनंददायी वातावरण असे व आम्हाला सर्व बाबतीत मोकळीक होती. वडिलांचा कोणताही दबाव नव्हता. नवीन लेखन बाबा वाचून दाखवत व आमची मते समजावून घेत, कधी कधी बदलही करत.' बाबांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'ग्रंथाली'ने आयोजित केलेल्या कार्यक्रमाबद्दल व प्रेक्षकांच्या प्रतिसादाबद्दल त्यांनी धन्यवाद दिले.

या वाचकदिनाच्या निमित्ताने सुहास बहुळकर यांच्या 'बॉम्बे स्कूल : आठवणीतले, अनुभवलेले' या पुस्तकाचे प्रकाशन प्रसिद्ध व्यंगचित्रकार शि.द. फडणीस यांच्या हस्ते झाले. त्यादंतर आनंद हर्डीकर यांनी सुहास बहुळकर यांच्या कलाप्रवासाची व पुस्तकासंबंधीची मुलाखत घेतली. ●



**कथा युगभानाची –**
अरुण साधू यांच्या निवडक कथा
संपदान : मीना गोखले
मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.

**बॉम्बे स्कूल : आठवणीतले, अनुभवलेले**
सुहास बहुळकर
मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु.





**काळा तुकतुकीत उजेड**
किशोर पाठक
मूल्य १२० रु. सवलतीत ७५ रु.

**थांबवू शकत नाही कविता लिहिणं**
सायनम मार्टिन
मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.





**भाषाग्रहण आणिभाषाशिक्षण**
रमेश पानसे
मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.

**दीपदान**
चंद्रशेखर सानेकर
मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.





**चंदेरी सृष्टी, सोनेरी गोष्टी**
प्रकाश चांदे
मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.

**वांझुठाव**
भाऊ गावंडे
मूल्य ५०० रु. सवलतीत ३०० रु.





**आनंदनक्षत्र**
प्रल्हाद जाधव
मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.


**लांबा उगवे आगरीं**
म.सु. पाटील
मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.





**अमीरबाई कर्नाटकी**
प्रशांत कुलकर्णी
मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.


**चाला, पळा, धावा**
डॉ. पी.एस. रामाणी
मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.






**माझे अंतरंग**
डॉ. दाऊद दळवी
मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.

**भारतातील मुस्लिम स्थापत्यकला**
डॉ. दाऊद दळवी
मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु.





**नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१४**
नंदिनी/सुधीर थत्ते
मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.

नाशिक, सोलापूर आणि मुंबई येथे ग्रंथाली वाचकदिनी
प्रकाशित झालेल्या १५ पुस्तकांचा संच
मूळ किंमत ४१०० रु. सवलतीत २५०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १५० रुपये




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

आपल्याला अरुण साधू माहीत आहेत ते कादंबरीकार म्हणून. 'सिंहासन' आणि 'मुंबई दिनांक' यांनी आपल्यावर जी झडप घातलेली आहे, तिच्या खुणा अद्यापही स्मरणात कायम रुतलेल्या आहेत. 'शोधयात्रा' ही आणखी एक भलीथोरली कादंबरी. ती लक्षात राहिली ती तिच्या तंत्रासाठी. पुढे आणखी कादंबऱ्या आल्या, शापित, त्रिशंकू, झिपऱ्या, मुखवटा, तडजोड, विप्लवा, स्फोट आणि बहिष्कृत. तसे त्यांचे कथासंग्रहदेखील प्रकाशित झाले. तेही जवळपास सहा आहेत. त्यातले 'मंत्रजागर' आणि 'ग्लानिर्भवती भारत' ही नावे पटकन आठवतात. त्याचे कारण त्यांच्यातले वेगळेपण. हे वेगळेपण आहे कथानकाचे, आशयाचे, मांडणीचे, दृष्टिकोनाचे, तंत्राचे, आणि शैलीचे देखील. दर्जेदार दिवाळी अंकांतूनही त्यांच्या कथा आपल्या भेटीला नियमितपणे येतातच. त्यांच्या एकूण कथेच्या पसाऱ्यातून निवडलेल्या कथांचा संग्रह प्रकाशित झाला आहे. सांधूच्या साठ कथांपैकी तेरा कथांची निवड या संग्रहात करण्यात आलेली आहे. ही निवड करण्याची आणि संपादनाची अवघड जबाबदारी पेलली आहे मीना गोखले यांनी. अवघड हा शब्द मुद्दाम योजला आहे. त्याची सार्थकता तपासायची तर त्यासाठी त्यांनी लिहिलेली प्रस्तावना वाचायला हवी. प्रत्येक कथा त्यांनी कशी निवडली आहे, पिंजाऱ्याने कापसाचा एकेक तंतू पिंजून काढावा तशी, याचा प्रत्यय या प्रस्तावनेत आल्याशिवाय राहणार नाही. इतकेच नव्हे, तर प्रत्येक कथा वाचत असताना वाचकाने कथेत काय शोधायला हवे याचे उत्तम विवेचन त्यात आढळते. लेखकाला काय अपेक्षित आहे, त्याचे विवेचन करते. कथेकडे पाहण्याची वाचकाची नजर तयार करण्याचेच सूत्र ती जणू उलगडत जाते.




सत्य दडपून मुजोर आणि भ्रष्ट अधिकाऱ्यासमोर प्रामाणिक आणि बुद्धिमान अशोक नेनेला कसे पराभूत व्हावे लागते, याचे अस्वस्थ करणारे चित्रण 'ग्लानिर्भवती भारत'मध्ये आहे. स्वार्थ, दांभिकता, अमानुषता, भ्रष्टाचार आणि कौटुंबिक नाते यांचे दर्शन 'फुलपाखराच्या स्वप्नातील माणूस' या कथेत होते. विश्वासला आठवणारी चिनी तत्त्ववेत्त्याची गोष्ट तर विसरताच येणार नाही. स्वप्नात त्याला आपण फुलपाखरू असल्याचे दिसते. जाग आल्यावर त्याला प्रश्न पडतो, माणूस म्हणून आपण स्वप्नात फुलपाखरू पाहिले, ते वास्तव – की याक्षणी आपण खरे फुलपाखरू असून, त्या फुलपाखराच्या स्वप्नात माणूस म्हणून स्वतःला पाहत आहोत? उच्चभ्रूंच्या गगनचुंबी इमारती, त्यांच्यात राहणाऱ्यांची मानसिकता आणि त्या इमारतीच्या तळाशी अस्तित्वात असलेली झोपडपट्टी आणि तिथल्या मजुरांची मानसिकता यातली प्रचंड तफावत वाचायला मिळते ती 'बेचका आणि आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या इमारती' या कथेत. गंमत म्हणजे, ज्या मजूर बाईला उघड्यावर एक नंबर करताना एक बाई तिला शिव्या घालते, तीच तशी वेळ स्वतःवर आल्यानंतर वागते. दोघींमध्ये फरक आहे तो गरीब–श्रीमंतीचा. कालिदासाच्या मेघदूताची आठवण करून देणारी कथा 'मान्सूनस्य प्रथम दिवसे', विज्ञानाचे भान देणारी 'वेळ थोडा उरला आहे...' ही कथा, ध्येय आणि निष्ठेची कास धरलेल्या वसंताची कथा असलेली 'वसंत बिरेवारचा एक दिवस', प्रल्हाद पात्रीकर या तरुणाच्या वैचारिक पातळीवर 'त्याच्या प्रखर सामाजिक जाणिवांचे निखारे' अशा विविधांगी कथा या संग्रहात आहेत. एक सूत्र समोर ठेवून त्यांची निवड झालेली दिसते. आणि ते सूत्र आहे युगभानाचे. जे लेखकाला गवसलेले आहे. जे वेगवेगळ्या कथासंग्रहांत विखुरलेले होते. त्यांचा हा संग्रह, 'कथा युगभानाची'.

कथा दीर्घस्वरूपाच्या वाटतात. परंतु त्यांच्यातला आशय मनाला भिडला की वाचताना त्यांच्यातले अंतर लक्षात येत नाही. पात्राशी जवळीक झाल्याने, वाचून संपल्यानंतरही त्या मनात तशाच रेंगाळत राहतात. त्यांच्या भोवतीचे वातावरण आपले वाटू लागते. कथा आताच्या युगाशी नाते सांगणाऱ्या आहेत, त्यामुळे त्यांच्या तोंडी सहजपणे इंग्रजी, हिंदी शब्द येतात. कधी कधी पूर्ण वाक्ये येतात. जशी,'नो मॅडम,आयम् बिईंग व्हेरी चॅरिटेबल. अँड आयम् टॉलरेटिंग यू', ' यू स्टूपिड, कॉवर्ड– यू आर इन्सल्टिंग मी', 'दो घंटे तक भल्लासाबकी मुलाकात हो गयी.' 'खरं? आपके मुहमें शक्कर...' ही वाक्ये परकी वाटत नाहीत. ती पात्राचे व्यक्तिमत्त्व ठळकपणे व्यक्त करतात, त्याला उजाळा देतात. सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठही युगभानाच्या कल्पनेशी जुळणारे आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**




# ग्रंथपान




सायमन मार्टिन याची भेट झाली ती नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानमध्ये. त्यांच्याच कवितासंग्रहाचे प्रकाशन होते. त्यामुळे अपेक्षा अशी होती, ते भरभरून बोलतील स्वतःच्या कवितेविषयी. स्वतःच्या पुस्तकाचे जाहीरपणे प्रकाशन होणे ही कवीसाठी आनंदाची पर्वणी. अशावेळी त्याला भरते येणे ही स्वाभाविक प्रतिक्रिया. ती ऐकण्यासाठी कान आतुरले. तसे सायमन बोलले देखील. पॅरिसमध्ये 'चार्ली हेब्दो'वर झालेल्या अतिरेकी हल्ल्याविषयी. मृत पावलेल्या व्यंगचित्रकारांविषयी. नव्हे आपल्याच कुळातले गेले त्यांच्याविषयी. व्याकूळ मनाने. ओथंबलेल्या भावनांनी. कवीची संवेदना, त्याची स्पंदने किती हळुवार असतात, ओल्या जिव्हाळ्याची असतात, याची अनुभूती श्रोत्यांनी घेतली. तिथेच कवीची ताकद लक्षात आली. आणि असा कवी 'थांबवू शकत नाही कविता लिहिणं' असे जाहीर करीत असेल तर त्यात वावगे ते काय? सभोवताल जर असाच क्रूर असेल तर कवीने थांबून कसे चालेल?

*घोर जंगलात हिंस्र श्वापद*
*अंगावर यावं धावून*
*तशी भीती चाल करून येते माझ्यावर.*

याच हिंस्रपणाचे निर्दालन करणे कसे सोपे आहे हे देखील कवी कवितेतून सांगतो,

*एकदा समोरच्या माणसाला*
*देव म्हणून हाक मारा*
*आपल्यातला सैतान मरून जातो.*

सायमन मार्टिनच्या कविता वाचत असताना जाणवते ते त्यांचे निरीक्षण, आंतरिक तगमग, मानवी मूल्यांच्या होत असलेल्या ऱ्हासाबद्दलची चीड, देवाविषयीच्या कल्पना आणि उफाळून येणारा आशावाद .

*पूर्तता भेटीत असते की शोधण्यात?*
*मी कधीच थांबवला नव्हता तुझा शोध*
*म्हणूनच आयुष्य सुंदर झालं.*

वरवर प्रेयसीसाठी ही भावना व्यक्त होताना दिसते. परंतु ती आहे येशूसाठीची. येशूचे अस्तित्व कुठे आहे?

*तलवार ज्यांच्या काळजातून आरपार गेलेली असते*
*त्यांच्याच मांडीवर येशू असतो.*

माणसाच्या वागण्याला धरबंद राहिलेला नाही. त्याच्या काळजातली ओल आटत चालली आहे. तो फक्त स्वतःपुरतेच जग निर्माण करू पाहतो आहे. डेरेदार वृक्षाची कत्तल करून घरात कॅक्टस फुलवतो आहे. अशा माणसाला कवी विचारतो,

*पृथ्वी झाली आहे उजाड*
*कसं रचणार आहे माणूस सरण झाडाशिवाय?*

कवी नुसते प्रश्न निर्माण करून थांबत नाही. त्याला यात बदल घडवून आणायचा आहे. पण तो सहजासहजी होणार नाही याची त्याला कल्पना देखील आहे. म्हणून तो म्हणतो,

*काहीतरी करायला हवं.*
*हिंमत करून आपली राठ झालेली*
*कातडी सोलायला हवी.*
*गरज आहे एका धारदार चाकूची.*


कवितांचा आवाका मोठा आहे. प्रेम, जन्म, मृत्यू, येशू, देऊळ, दगड, झाडी, यांची प्रतिके कवितेत आलेली आहेत. वरवर ती स्वतःशी संवाद साधते आहे असे वाटते. परंतु त्याचवेळी ती आत्ममग्न करते. तिचे प्रवाहीपण आपल्याला अणुरेणूपर्यंत पाझरत जाते. तिच्यातले रुपक आणि प्रतिमा आपल्या कधीकधी चकवाही देतात. तरीही ही कविता आपली प्रत्येकाची वाटते.

रेखाचित्रेही सोबतीला दिलेली आहेत. त्यातून व्यक्त होणारे दृश्यभाव आणि प्रत्येक रेषेच्या तळाशी खोलवर दडून बसलेले संचित कवितेच्या डोहाशी उभे करतात. मुखपृष्ठावरील वेदनेचा सल जिवंत ठेवणारा त्वचेत ठोकलेला खिळा, आपल्याच त्वचेत ठोकला गेला आहे असे जाणवत राहते. सतीश खानविलकर यांची रेखाचित्रे व मुखपृष्ठ कवितांच्या आशयाला उठाव देतात.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

भारत, अमेरिका आणि स्कँडिनेव्हिया या तीन देशांवरील लेखांचा समावेश असलेले पुस्तक म्हणजे 'समाजरंग'. लोकशाहीचा पाया हा या तीनही देशातील समान धागा. अमेरिका सर्वात जुनी आणि धनवान, भारत सर्वात मोठी आणि प्रगतीशील, तर स्कँडिनेव्हिया ही सर्वात लहान आणि आदर्श, असे या देशांच्या लोकशाहीचे वर्गीकरण. परंतु लेखांचा विषय केवळ लोकशाही नाही, तर एकूण सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय चढउतारांचाही त्यात समावेश आहे. प्रत्येक क्षेत्रात होत असलेली प्रगती आणि अधोगती, त्यातले सौंदर्य आणि कुरूपता, उच्चता आणि विषमता यांचे निरीक्षण म्हणजे हे लेख. प्रदेश वेगळा, भौगोलिक रचना वेगळी, लोकजीवन वेगळे, मूल्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आणि मानसिकताही वेगळी. या सगळ्यांचा जो दृश्य अनुभव लेखक द्वयीला आला, त्याचे चित्रण वाचकांच्या समोर ठेवणारे लेख म्हणजे 'समाजरंग'. लेखकद्वय उच्च विद्याभूषित, विविध ज्ञानशाखांचे कलासक्त उपासक. मूळ पिं भारतीय तरी सध्या अमेरिकन नागरिकत्व धारक. उच्च शिक्षण, जागतिक पातळीवरील व्यवसाय आणि परिणामी होणारे देशाटन, हे सर्वच त्यांच्यासाठी ठरलेले वरदान. या वरदानाचा स्पर्श झालेला हा लेखसंग्रह.




सदर लेखांचा एकूण बाज पाहिला तर तर ते प्रवास वर्णन वाटायला हवे. परंतु ते तसे नाही. हे लेख आहेत निरीक्षणावरील, चिंतनावरील आणि अनुभवावरील टिपणे. त्यासाठी लेखकांनी प्रत्येक विषय हाताळताना त्यांचे वेगवेगळे पैलू समोर ठेवले आहेत. उदाहरणार्थ, 'सध्याचा भारत.' भारताबद्दल काहीही म्हणता येते. जशी त्याची परिवर्तनशीलता, विरोधाभास, प्रगती, ऱ्हास. तरीही त्यात आढळणारे दहा गुणतत्त्वे आहेत. ती इंग्रजी 'सी' या अक्षरात सामावलेली आहेत. त्यांचे मराठी रूप म्हणजे : दळणवळण आणि संवाद, संगणक, बांधकाम, उपभोगशाही, संस्कृती, क्रिकेट, सिनेमा, भोगवाद, भ्रष्टाचार, विषमभाव/विरोधाभास. यातून भारत कसा दिसतो याचे हे पैलू. मग यावर काही उपाय आहे की नाही? तर लेखक त्याचेही उत्तर होकारार्थी देतात, अकराव्या 'सी'द्वारे. हा सी आहे, परिवर्तनाचा. सी फॉर चेंज–परिवर्तन. परंतु सावधानतेचा इशाराही देतात, परिवर्तन म्हणजे स्वप्नरंजन नव्हे.

बंगलोर, कोलकाता आणि मुंबई या शहरांवरील लेखांत लेखक नमूद करतात, या तीनही शहरांची मूळ इंग्रजी नावे बदलली म्हणजे संपूर्ण परिवर्तन झाले असे नाही. बंगलोरचे बंगळुरू केले परंतु त्याच शहरात मोठ्या दिमाखात उभ्या राहिलेल्या नव्या इमारतींची नावे पाहा, हाईड पार्क, डॉर्चेस्टर, बेलग्रेव्हिआ. तीच अवस्था कोलकाता व मुंबईची. मग लेखक विचारतात, आपला ज्वलंत अभिमान असा मध्येच दम का सोडतो?

दुसऱ्या भागात अमेरिकेविषयी जाणवलेली, अनुभवलेली मते त्यांनी अतिशय स्पष्टपणे मांडलेली आहेत. जगावर नियंत्रण ठेवू पाहणारी अमेरिका एका बाजूने खरोखर सुंदर आहे. तिचे एक उत्तम उदाहरण म्हणजे विद्यापीठ. जगातल्या सर्वोत्तम पन्नास विद्यापीठांत छत्तीस अमेरिकन आहेत. तर सर्वोत्तम दहापैकी आठ विद्यापीठे अमेरिकन आहेत. परंतु अवास्तव अट्टहासापायी ती आज संभ्रमित अवस्थेला येऊन ठेपली आहे. 'आज रोख उद्या उधार' नाही, 'आज उधार, उद्याही उधार!' हे वाक्य त्यामुळेच सूचक ठरते.

स्कँडिनेव्हिया हा देश उत्तर ध्रुवाजवळचा. लेखक या देशाच्या वैभवाने, सौंदर्याने भारावून गेले नसते तरच नवल. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, 'या देखण्या भूखंडाने आदर, सन्मान, आनंद, संवेदना, शिकवण, आश्चर्य अशा निखळ जाणिवांतून जे जीवन दाखवलं, त्याचा हा आलेख म्हणजे हे लेख.' त्यांना जाणवलेले सौंदर्य भौगोलिक आहे तसे मानवीदेखील आहे. स्कँडिनेव्हियातले लोक हुबेहूब एका रंगाचे. एकासारखे एक गोरेपान. उंच, बांधेसूद, सोनेरी केसांच्या ब्लाँड मुली बनवण्यात तर त्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे, असे लेखक नमूद करतात.

एकूणच हे लेख अतिशय रंजक आणि खुमासदार पद्धतीने लिहिलेले आहेत. त्यात विनोद आणि विरोधाभास यांची कलात्मकता उत्तम राखली आहे. नव्हे तीच शैली म्हटले तर वावगे ठरू नये. तीनही देशांची प्रतिके घेऊन मुखपृष्ठ सजवल्याने आतील संदर्भाचा परिचय त्यातून होतो. आपल्याला दिसणाऱ्या दृश्य घटनांकडे वेगळ्या नजरेने पाहता येते याचे भान हे लेख देतात.

सुप्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांची प्रस्तावना पुस्तकाला लाभली आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**




# ग्रंथपान

'घोड्याच्या शर्यतीत जिंकण्यासाठी रेसकोर्स मैदानावर घोडे जसे अगदी जीव घेऊन पळतात, त्याप्रमाणे मी माझे आयुष्य आनंदी करण्यासाठी सर्व दुःखे बाजूला सारून माझ्या जीवनप्रवाहात धावत आहे. अशी धावत असताना घोडा मीच झाले. धावण्याच्या वाटाही मीच शोधल्या. माझी स्पर्धकही मीच बनले. घोडेस्वारही मीच झाले. घोडेस्वार होऊन अयोग्य ठिकाणी मीच माझ्या मनाला लगाम घालत गेले अन् खाच-खळग्यांशी सामना करतकरत आयुष्याच्या सेकंदा सेकंदावर टापा टाकतटाकत आज येथपर्यंत येऊन पोचले आहे.'




ही आहे लेखिकेची जगण्याची ऊर्मी. अंतःकरणापासून जगण्यावर प्रेम करण्याची. दुःखाला कवटाळून बसण्याऐवजी जगण्याला सामोरे जाणारी, फुलवणारी. 'जगायचंय... प्रत्येक सेकंद' हे शीर्षकच प्रेरक आणि आकर्षक. जगण्याची उभारी देणारे. कुतूहल जागृत करणारे. यावरूनच लेखिकेच्या लेखनाचा पोत लक्षात यायला हरकत नसावी.

ही कहाणी आहे डॉक्टर झालेल्या यशवंत केवळेची. दिवसभर दोन हात राबले तरी सायंकाळी दोन घास पोटाला मिळतीलच याची शाश्वती नसलेल्या परिस्थितीची. वाटेल ते कष्ट उपसून तिच्यावर मात केलेल्या झुंजीची. झुंजीतही आपलेपण जोपासणाऱ्या नात्यांची. ही कहाणी आहे त्याची सहधर्मचारिणी मंगला केवळेची. ध्यानीमनी नसताना सुखावर कोसळलेल्या आकाशाची. आणि त्याही क्षणातून स्वतःवर मात करण्याची. जगण्याची. जगविण्याची.

यशवंत ग्रामीण भाग आणि गरिबीचा पुत्र. जगण्याची आणि शिक्षणाची कास धरलेला. कुठल्याही कष्टाला मानाने स्वीकारणारा. त्यामुळे बुटपॉलिश करणे, कंगवाफणी विकणे, नाशिकचा चिवडा आणि लोणावळ्याची चिक्की रेल्वेडब्यात विकणे, मिळेल त्या ठिकाणी मिळेल ते काम करणे ही निकडीची गरज. लाज न धरता तिला सामोरा गेला. करता येईल ते सारे केले. पण शिक्षणाचा ध्यास सोडला नाही. त्यात रेल्वेचा अपघात. दवाखान्यात भरती व्हावे लागले. आणि सेवा करणाऱ्या डॉक्टरांना पाहून मनात स्फुल्लिंग फुलले, आपणही डॉक्टर व्हायचे. ध्यास घेतलेल्या माणसाने कष्ट घेतले तर अशक्य काहीच नसते. यशवंत डॉक्टर यशवंत होतो. आपल्याप्रमाणे पत्नी, मुले यांना ध्यासाचा मार्ग शिकवतो. निसर्गाची ओढ लावतो. पर्यटनाच्या आनंदाची ओळख करून देतो. आणि अचानक एक दिवस अपघातात कायमच्या प्रवासाला निघून जातो, जगण्याचा प्रवास अर्ध्यावर सोडून. नीता आणि निनादच्या जबाबदारीत मंगला धैर्याने दुःखाला मागे टाकते. कात टाकल्यासारखी उसळून उठते. यशवंतने दाखवलेल्या मार्गावरून मुलांसोबत प्रत्येक सेकंद भरभरून जगण्याचा प्रयत्न करत राहते. महाराष्ट्र बँकेच्या सावलीत कारकून ते साहेब अशी स्वतःची सावली मोठी करत जाते. अध्यात्म आणि मनशांतीच्या प्रवाहात स्वतःला शांत करत राहते.

संसार आणि सासूसासरे, गरिबी, यात येणारे ताणतणाव, स्वार्थ आणि हक्क यांचे काटे लेखिकेच्या वाट्याला येतात. तरीही त्यांचा बाऊ केलेला नाही. स्वतःच्या परिस्थितीचा स्वीकार करताना आलेल्या अनुभवांना अव्हेरले नाही. त्यामुळेच जगण्यातला आनंद कायम राहिला. हे चरित्र वाचत असताना संगीता धायगुडे यांचे 'घुमान' हे पुस्तक आपोआप आपल्या आठवणीत येऊन उभे राहते. कर्तृत्व आणि ठामपणा अंगी असेल तर परिस्थितीवर मात करणे अवघड नाही, हेच ही चरित्रे दाखवून देतात. प्रस्तुत पुस्तकात लेखिकेने मन उघड करताना स्वतःवर संयमाचे पांघरूण घातले आहे. माणसांच्या वागण्यामागची प्रेरणा शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. वास्तव दाहक असूनही त्यात आपलेपण हरवणार नाही याची काळजी घेतलेली आहे. त्यामुळे आपल्याला जे सांगायचे आहे, त्याचा कणा शाबूत राहिलेला आहे. संवादातला मूळ स्वर आणि लय कायम ठेवल्याने भाषेतला सच्चेपणा चटकन भावतो. त्यात भर घातली आहे ती नीता-निनादच्या मनोगतांनी. शिवाय पुस्तकाच्या सुरुवातीलाच वाचकांच्या अभिप्रायांतील काही सूचक वाक्यांची नोंद प्रमाणपत्रासारखी सजवलेली आहे. मूळातच हाती आलेल्या पुस्तकाची प्रत ही चार आवृत्त्या आणि सात पुनर्मुद्रणानंतरची आहे. त्यामुळे या पुस्तकाला लाभलेला वाचकाश्रय किती आहे याची यावरून कल्पना येते. अनुभवाच्या सच्चेपणाला वाचकांनी दिलेली ही पावतीच नव्हे काय?

- **मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.**

## ग्रंथाली पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे



सुहास बहुळकर लिखित
'बॉम्बे स्कूल : आठवणीतले, अनुभवलेले'
पुस्तक प्रकाशनसमयी आनंद हर्डीकर,
लेखक सुहास बहुळकर,
व्यंगचित्रकार शि.द. फडणीस,
दीपक घारे आणि सुप्रिया लिमये



विजय सावंत लिखित 'तिचे दोन डोळे' पुस्तक प्रकाशनसमयी
विजय सावंत, सुहास बहुळकर, किसन चव्हाण आणि प्रभाकर भिडे



'शब्द रुची' २०१३च्या दिवाळी अंकास मिळालेला 'मुंबई पत्रकार संघ
आणि रामशेठ ठाकूर' द्वितीय पुरस्कार स्वीकारताना सुदेश हिंगलासपूरकर

किसन चव्हाण लिखित 'आंदकोळ' पुस्तक प्रकाशनसमयी
सुहास बहुळकर, किसन चव्हाण आणि प्रभाकर भिडे





सुरेश गोखले लिखित 'हेलिकॉप्टर आणि मी' पुस्तक प्रकाशनसमयी
मनीषा गोखले, श्रीकांत कोटणीस, सुरेश गोखले, दिनकर गांगल,
आणि सुदेश हिंगलासपूरकर




'स्वप्न' पुस्तक प्रकाशनसमयी लेखिकेच्या मातोश्री, प्रवीण पाटील,
श्री. सामंत, हितेंद्र ठाकूर, लेखिका हर्षला पाटील, विजया वाड,
सुदेश हिंगलासपूरकर आणि मयुरेश वाघ

RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.